

महाराष्ट्राचे
शिल्पकार
महर्षी
धोंडो केशव कर्वे
RAJA BADSAL
न. म. जोशी
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

अनुक्रमणिका

# महर्षी धोंडो केशव कर्वे

डॉ. न. म. जोशी

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

अनुक्रमणिका

प्रथम आवृत्ती : २००३
दुसरी आवृत्ती : २००७
महाराष्ट्राचे शिल्पकार : क्र. १९

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई ४०० ०१४

©प्रकाशकाधीन

मुद्रक :
प्रमोद भोगटे,
स्नेहेश प्रिंटर्स,
३२०-ए, शाह अँड नाहर इंड. इस्टेट अ-१
धनराज मिल आवार, सीताराम जाधव मार्ग,
लोअर परळ, मुंबई-१३. (दूरध्वनी : २४९४५६१५)

मुखपृष्ठ : राजा बडसल

किंमत : रु. ३५/-

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

अनुक्रमणिका

# निवेदन

महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक व वैचारिक जडणघडणीत ज्या दिवंगत महनीय व्यक्तींचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे अशा व्यक्तींची साधारणतः शंभर ते सव्वाशे पानांची सुबोध मराठी भाषेत चरित्रे लिहून ती "महाराष्ट्रातील शिल्पकार"या योजनेअंतर्गत पुस्तकरूपाने प्रकाशित करण्याची मंडळाची योजना सध्या सुरू असून या चरित्रग्रंथमालेतील "महर्षी धोंडो केशव कर्वे"हा एकोणिसावा चरित्रग्रंथ आहे.

शेतातल्या पिकाची नीट वाढ होण्यासाठी वेळीच त्यातल्या तणाचं निर्मूलन करावयास हवं. तणाचं निर्मूलन करण्याचे दोन मार्ग आहेत. तणाचा प्रतिबंधक औषधाने फवारणी करणे हा एक मार्ग व खुरपणं करून ते तण काढून टाकणे हा दुसरा मार्ग. महर्षी धोंडो केशव कर्वे यांचं कार्य दुसऱ्या प्रकारचं आहे.

समाजातल्या अनिष्ट रुढी नष्ट करण्यासाठी त्यांनी विचारांचा प्रहार करण्याऐवजी प्रत्यक्ष कृतीचा अवलंब केला. त्या काळात विधवा विवाहाचा नुसता विचार करणे हे पाप मानलं जात होतं त्या काळात त्यांनी एका विधवा स्त्रीशी विवाह केला.

निराधार स्त्रियांना आधार देणे, शिक्षणाची दारं त्यांना खुली करणे हे महर्षी कर्वे यांनी आपलं जीवित कार्य मानलं. केवळ मानलं नाही तर या कार्याला त्यांनी अखेरच्या क्षणापर्यंत स्वतःला वाहून घेतलं.

प्रस्तुत ग्रंथाचे लेखक श्री. न. म. जोशी यांनी "अनाथबालिकाश्रम ते महिला विद्यापीठ असा कर्वे यांच्या स्वप्नांचा विस्तार झाला"असं त्यांचं सार्थ शब्दात वर्णनकेलं आहे. महर्षी कर्वे यांनी समता संघ, जातिनिर्मूलन संस्था, ग्रामशिक्षण मंडळ इत्यादी संस्थांची कामे उभी केली असली तर त्यांची खरी ओळख स्त्रियांच्या संदर्भातील केलेल्या कामामुळे होते.

महर्षी कर्वे यांनी केलेल्या समाजकार्याचा विशेष असा की, त्यांनी आपल्या संसाराकडे पाठ फिरवून हे समाजकार्य केलेले नाही तर आपला संसार नीटनेटका करीत हे समाजकार्य केले.

हे समाजकार्य करण्याची महर्षी कर्वे यांची पद्धत कशी होती याचं अतिशय समर्पक वर्णन श्री. न. म. जोशी यांनी या ग्रंथात केलेलं आहे.

प्रवाहाच्याविरुद्ध पोहताना शक्य तो प्रवाहाशी जमवून घेऊन आणि प्रवाहात काही भोवरे व डोह असतील तर ते टाळून अण्णासाहेबांनी आपल्या समाजसुधारणेची नौका पैलतीराला नेण्याचा नेहमीच प्रयत्न केला. याबाबत त्यांची स्वतःची इच्छाशक्ती, दुर्दम्य आकांक्षा, कमालीची सहनशीलता आणि शातंपणे कार्य करण्यासाठी लागणारी स्थिरबुद्धी यांचा त्यांना नेहमीच उपयोग झाला. आक्रमक नसूनही सक्रिय व सफल समाजसुधारक होता येते याचे हे मूर्तिमंत उदाहरण आहे.

अनुक्रमणिका

हे उदाहरण महर्षी कर्वे यांच्यापुरतचं मर्यादेत राहावे यातच त्यांचं मोठेपण सामावलेलं आहे.

**रा. रं. बोराडे**

अध्यक्ष

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मुंबई

दिनांक : ४ डिसेंबर, २००३

अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका


शेरवली ते मुंबई ( द्वारा मुरूड, पुणे) ........ ७
बहिष्कार, स्वीकार आणि आकार ........ १३
-वेलु गेला गगनावरी◦ ........ १८
स्वप्न : पूर्ती आणि विस्तार ........ २२
साता समुद्रापलीकडे ........ २९
कसोटीचे क्षण ........ ३४
ग्रामशिक्षण आणि समता संघ ........ ३९
साक्षी शतकाचा ........ ४३
जीवनप्रसंग ........ ४८
भारतरत्न ........ ५७
परिशिष्ट क्र. १ ........ ७०
परिशिष्ट २ ........ ७१
जीवनाचा कालपट ........ ७३
संदर्भग्रंथ सूची ........ ७५

# शेरवली ते मुंबई ( द्वारा मुरूड, पुणे)

एकोणिसाव्या शतकाचा उत्तरार्ध सुरू झाला होता. अठराशे सत्तावनचं स्वातंत्र्ययुद्ध शमून त्याच्या निखाऱ्यांवर राख धरली होती; आणि इंग्रजी सत्तेचा भारतावरील विळखा घट्ट आणि पक्का झाला होता. इंग्रजानं राजसत्तेबरोबरच इथं रुजविलेल्या शिक्षणपद्धतीची मुळं अंकुरू लागली होती. भारतातला सर्वसामान्य माणूस हतबल अवस्थेत जगत होता. 'शेतकऱ्याचा आसूड' अजून आकाराला यायचा होता. अशा या निपचित कालखंडात कोकणातल्या शेरवली गावी एका मुलाचा जन्म झाला. नाव ठेवलं धोंडू. थोरला भाऊ भिकू. आधीची तीन भावंडं अल्पवयातच गेली. त्यामुळे केशवराव कर्वे यांनी आपल्या मुलांची नावं भिकू आणि धोंडू अशी ठेवली. केशवरावांना सारे केसोपंत म्हणत. पत्नी लक्ष्मीबाई यांचं माहेर शेरवलीचे परांजपे. याच घराण्यातले रँग्लर र. पु. परांजपे पुढे प्रख्यात गणिती व शिक्षणतज्ज्ञ म्हणून नावारुपास आले.

कर्वे घराण्याचं मूळ गाव मुरूड. निसर्गरम्य परिसर, विशाल समुद्रकाठ, नारळीपोफळीच्या बागा आणि कोकणातल्या धुंवाधार पावसाशी खालच्या मानेनं सामना करणारी उतरत्या छपरांची टुमदार घरं, असं हे मुरूड! भिकू आणि धोंडू यांचं बालपण या मुरूडमध्येच व्यतीत झालं. मुरूडचं नाव अनेक कर्तबगार व्यक्तींनी मोठं केलं होतं. नामवंत वकील आणि गव्हर्नर जनरलच्या लेजिस्लेटिव्ह कौंसिलवर नियुक्त झालेले पहिलेच भारतीय प्रतिनिधी विश्वनाथ नारायण मंडलिक, शिक्षणतज्ज्ञ वामन आबाजी मोडक इ. व्यक्ती मुरूडच्या मातीच्या होत्या. धोंडू म्हणजेच 'स्त्रीशिक्षणाचं महाद्वार' महाराष्ट्रातील स्त्रियांसाठी खुलं करून देणारा कृतिशील कर्मवीर; महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या बालपणाची जडणघडण मुरूडमध्ये झाली. घरची परिस्थिती बेताची होती. भिकू, धोंडू आणि बहीण अंबा या भावंडांचा सांभाळ आई लक्ष्मीबाई कोंड्याचा मांडा करून करीत होत्या. धोंडोपंतांचे पणजोबा रघुनाथभट कर्वे आणि त्यांचे बंधू केशवभट कर्वे यांनी पेशवाईच्या काळात दुकानदारीत चांगली कमाई केली होती. खुद्द पेशवेच त्यांचे ग्राहक होते. या दोघा भावांनी मुरूडला बरीच जमीन खरेदी केली. एक प्रशस्त वाडा बांधला. त्याकाळी सहा हजार पाचशे रुपये खर्च करून गावासाठी एक तळं बांधलं. दुर्गादेवीचं मंदिर बांधलं. केसोपंताच्या बालपणापर्यंत कर्वे घराण्याची सुस्थिती होती. पण पुढं उतरती कळा लागली आणि केसोपंत कर्वे यांनी आपल्या गावाच्या शेजारीच कोरेगावला बर्वे कुटुंबाच्या जहागिरीचे व्यवस्थापक म्हणून नोकरी पत्करली. काटकसरीनं राहून त्यांनी व लक्ष्मीबाईंनी संसाराचा गाडा पुढं रेटला. कुणापुढंही हात पसरला नाही किंवा स्वाभिमानाला धक्काय लागू दिला नाही.

बडोद्याचे महाराज गायकवाड दानशूर होते. त्यांचे प्रतिनिधी ब्राह्मणांना दक्षिणा वाटण्यासाठी मुरूडमध्ये आले होते. छोट्या भिकूलाही वाटलं की, आपण दक्षिणा मिळवावी. प्रत्येकी दहा रुपये दक्षिणा मिळत होती. भिकूनं आईला विचारलं. . . .

"आई, अनेक ब्राह्मण दक्षिणा घेत आहेत. मी पण जाऊन घेऊन येतो."

"बाळा, इतर ब्राह्मणांची आणि आपली गोष्ट वेगळी आहे. आज आपली परिस्थिती खालावलेली असली तरी आपलं घराणं नामांकित आहे. पूर्वजांचा नावलौकिक चांगला आहे. तुझे मामा तर विद्वान दशग्रंथी ब्राह्मण आहेत. अशी दक्षिणा घेण्यासाठी त्यांचे हात कधीही पुढं नव्हते. तुही दक्षिणा घेऊ नको."भिकू दक्षिणेला गेला नाही. हा सगळा संवाद धोंडू ऐकत होता. या घटनेचा आणि आईच्या

उपदेशाचा धोंडूच्या मनावर परिणाम झाला. स्वाभिमानाची आणि परिश्रमाची दीक्षा लहानपणीच मिळाली. इतर अनेक मुलांप्रमाणेच धोंडूही बालपणी हट्टी आणि खेळकर होता. कर्वे यांच्याकडं आत्म्या नावाचा एक गडी होता. तो दिसायला उग्र होता. धोंडू रडून हट्ट करू लागला की, आत्म्या त्याला घेऊन जाई आणि परशाजवळ (शेगडीजवळ) बसवून ठेवी. एकदा तर सकाळच्या जेवण्याच्या वेळी 'मला कडवे वाल भाजून दे' असा हट्टच धोंडूने केला. आत्म्याची भीती होती. पण प्रमेळ आईनं मुलाचा हट्ट पुरा केला.

खणखणीत वाणी, शुद्ध उच्चार आणि चांगले वाचन यामुळे बालपणापासून धोंडोपंतांना उत्तम ज्ञानसाधना करता येऊ लागली. त्यांचा गळाही गोड होता.समाराधनेची जेवणं झाली की कुणीतरी श्लोक व पदे म्हणण्याचा आग्रह करी. धोंडूच्या गोड आवाजातले श्लोक लोकांना आवडत. पुढं फर्ग्युसन कॉलेजच्या स्नेहसंमेलनप्रसंगीही कर्वे यांनी श्लोक म्हटले, हे त्यांच्या समकालीनांना चांगले आठवते.

मुरूडमध्यें त्यावेळी दोन शाळा होत्या. एक सरकारी शाळा आणि दुसरी शेणवी पंतोजींची खाजगी शाळा. धोंडूचे सुरूवातीचे शिक्षण या पंतोजींच्या शाळेत झाले. त्यावेळी आतासारखे कागद, वह्या लेखनासाठी मिळत नसत. धूळपाटीवर लिहावे लागे. दर रविवारी या पाट्या माजवायच्या. म्हणजे काय करायचं? पाटी स्वच्छ धुवून ओल्या मातीचा किंवा खडूचा पातळ लेप द्यायचा. आणि तो वाळल्यावर गिरवून लिहायचं. सुमारे सहा महिने या शाळेत धोंडू शिकला. त्याही वयात खणखणीत आवाजात भूपाळ्या म्हणून धोंडूने आपल्या स्वच्छ वाणीचा अनुभव मुरूडकरांना दिला होता.

बेताच्या दर्जाच्या सरकारी नोकऱ्या मिळवण्यासाठी त्याकाळी चौथीची परीक्षा आवश्यक मानली जात असे. या परीक्षेत भाषा विषयाला दुय्यम स्थान असे. कविता तर नव्हत्याच. गणित आणि मोडी अक्षर यांवर भर असे. गणित हा विषय धोंडूचा-अण्णासाहेब कर्वे. यांचा - आवडता असला तरी या चौथीच्या परीक्षेत ते नापास झाले. यावेळी अण्णांचं वय होतं अकरा वर्षे. योगायोग असा की, त्यानंतर ही परीक्षाच बंद झाली. तिच्याऐवजी सहाव्या इयत्तेची परीक्षा सुरू करण्यात आली. क्रमिक पुस्तके बदलली. अण्णांची उमेद खचली. पण ते निराश मात्र झाले नाहीत. प्रयत्न सोडायचे नाहीत, असं त्यांनी ठरवलं.

याचवेळी मुरूडला सरकारी शाळेत सोमण नावाचे मास्तर आले. सोमण मास्तरांनी धोंडूला पुन्हा चौथीत घेतलं. त्याच्या काजळी धरलेल्या मनावर आशेची फुंकर घातली. आपल्या या विद्यार्थ्याचं नावं धोंडूं असलं तरी तो बृहस्पती आहे हे सोमण मास्तरांनी ओळखलं होतं. अण्णांनी मन लावून अभ्यास केला आणि ते चौथीची परीक्षा उत्तीर्ण झाले. सोमण मास्तरांनी शाबासकी दिली. आता पुढच्या शिक्षणाचा प्रश्न आला. मुरूडपासून १० किलोमीटर अंतरावर दापोली. तिथं इंग्रजी शाळा होती. धोंडूला तिथं शिकण्याची तीव्र इच्छा होती. पण थोरला भाऊ भिकू तिथं शिकत होता. दोघांचं शिक्षण परवडण्यासारखं नव्हतं. धोंडू घरीच अभ्यास करीत राहिला. त्या भागात रायजीशास्त्री देवकुळे नावाचे एक शिक्षक होते. त्यांची गणित या विषयावरची टिपणे धोंडूला मिळाली. मग काय! खजिनाच हाती लागला.गणित हा आवडता विषय. शाळेत न जाताही धोंडू अभ्यास करीत राहिला. दरम्यान थोरल्या बंधूंनी दापोलीचं शिक्षण सोडलं. खेड तालुक्यात प्राथमिक शिक्षकाची नोकरी धरली. या जागेवर कायम होण्यासाठी सहावीची परीक्षा अनिवार्य असे. धोंडूने दादाला-भिकूला-याबाबतीत मदत केली.

धोंडू घरी अभ्यास तर करत होताच, पण कुलदेवतेची मनोभावे पूजा, पुराणे हरिविजय, रामविजय, गुरुचरित्र या ग्रंथांची त्याने पारायणे केली. पाठांतर आणि मनन-चिंतन यात अण्णा सदैव मग्न

असत. सोमण मास्तरांच्या घरीच बरेच विद्यार्थी अभ्यासाला जात. कधीकधी झोपायलाही जात. अण्णाही जात असत. कालिदासाचं रघुवंश हे महाकाव्य अण्णा शिकले. अमरकोश पाठ झाला.

रिकाम्यावेळी अण्णा इतर विद्यार्थ्यांना गणित शिकवत असे. अण्णांना आता सहाव्या इयत्तेची परीक्षा द्यायची होती. या परीक्षा जिल्ह्याच्या ठिकाणी सप्टेंबर महिन्यात होत असत. रत्नागिरीला जायचं म्हणजे आंजर्ल्याची खाडी पार करून मुंबईकडं जाणाऱ्या गलबतानं जायचं. त्यापेक्षा सातारा इथं जाऊन परीक्षा द्यायची असं ठरलं. कारण मुंबईला जाणारं गलबतच धुवाधार पावसामुळं रद्द झालं होतं. अण्णा आणि त्यांचे चार सोबती निघाले. साताऱ्यास जाण्यासाठी पायी जायचं.

बरोबर आवश्यक तेवढं सामान घेतलं. खांद्यावर पडशा टाकल्या. आणि हे शिक्षणयात्री निघाले. पहिल्याच दिवशी ४८ किलोमीटर चालून दुसऱ्या दिवशी पहाटे चिपळूणला पोचले. मूळचा मुरूडचा असलेला एक पोलीस अधिकारी भेटला. त्याला या मुलांची दया आली. कौतुकही वाटलं त्यांच्या धडपडीचं. त्यानं एक घोडा करून दिला. चिपळूण पाटण ५८ किलोमीटर आणि पाटण सातारा ५८ कि. मी... एवढं अंतर दोन दिवसांत पार करायचं होतं. पाटणनंतर जवळच्या रस्त्यानं म्हणून दऱ्याखोऱ्यातून जाताना हाल होत होते. मुसळधार पावसानं झोडपलं होतं. बोचरी थंडी चावत होती. तशात काळोख्या रात्री घोडा दमून बसला, तो उठेचना. रात्री अकराच्या सुमारास एका धनगराच्या झोपडीत येऊन तिथंच विश्रांती घेतली. आणि... ज्या दिवशी परीक्षा सुरू होणार त्याच दिवशी संध्याकाळी पाच वाजता ही मुलं साताऱ्याला पोचली. इतकी पायपीट करून यशाची आशा मावळली होती पण एक अंधुक दिवा लुकलुकला. मुरूडच्याच एका ओळखीच्या गृहस्थानं परीक्षासमितीच्या अध्यक्षांची भेट घडवली. त्यांनी परवानगी दिली. पण अध्यक्षांनी स्वतः धोंडूला बघितलं तेव्हा त्याच्या लहानशा चणीवरून हा १७ वर्षांचा आहे यावर त्यांचा विश्वासच बसेना. त्यांनी इतर चौघांना परीक्षेची परवानगी दिली. पण धोंडूलानाकारली. पुन्हा एकदा दैवानं ठोकर दिली. तरी धोंडू निराश नाही झाला. धोंडूचे चुलत भाऊ गंगाधरपंत कर्वे त्याच्यापेक्षा १४ वर्षांनी मोठे. ते याच परीक्षेला कोल्हापूरला बसणार होते. धोंडूही कोल्हापूरला गेला. परीक्षा झाली. उत्तीर्ण झाला. आणि इतक्या दिवसांची धडपड कारणी लागली.

एक टप्पातर गाठला. आता यापुढं काय करायचे? इंग्रजी आवश्यक होतं. पण इंग्रजीचा तर गंध नव्हता. पांडुरंग दाजी बाळ या नावाच्या शिक्षकांनी मुरूडमध्येच इंग्रजीचा एक वर्ग सुरू केला होता. अण्णा त्या वर्गाला गेले. इंग्रजीचा अभ्यास पूर्ण केला. आणि मग पुढील शिक्षणासाठी अण्णा मुंबईच्या रॉबर्ट मनी स्कूलमध्ये दाखल झाले. पण त्यापूर्वी रत्नागिरीच्या शाळेत जाऊन, आजारी पडल्यामुळे अण्णांना नाईलाजानं परत यावं लागलं होतं. काही काळ मुरूडच्याच शाळेत मासिक ५ रु. पगारावर शिक्षकाची नोकरी केली होती. धोंडोपंत मंडलिक यांनीही अण्णांना पुस्तकांची मदत केली. आणि वयाच्या १८व्या वर्षानंतर विशीत असलेला हा तरुण शिक्षणासाठी मुंबईत दाखल झाला.

## मुक्काम पुणे : द्वारा मुंबई

मुंबईत मुगभाटातील आंग्रयांच्या चाळीत मुरूडचे परशुरामपंत दामले रहात होते. अण्णा मुंबईला शिकण्यासाठी गेले, तेव्हा सुरुवातीला इतर मुलांबरोबर एका खोलीत राहात होते. पण मग दामले यांनी आसरा दिला आणि खाणावळीत जेवून अण्णा शाळेत जाऊ लागले. मुरूडचा धोंडू आता मुंबईसारख्या महानगरीत विद्यासाधनेसाठी कष्ट करू लागला.

भरपूर कष्ट करायचे, अभ्यास करायचा आणि लवकरात लवकर ध्येय साध्य करायचं या एकाच ध्यासानं अण्णा मुंबईत अथक काम करू लागले. आपल्या आवडीनिवडी त्यांनी बाजूला ठेवल्या. अण्णांना लहानपणापासून गाण्याची आवड होती. मुंबईला आंग्रयांच्या चाळीसमोरच एक श्रीमंत गृहस्थ होते. त्यांच्याकडं त्या काळच्या ख्यातनाम गायिका कृष्णा झुल्फी आणि तिची मुलगी शामा यांच्या मैफली होत. अण्णांना तिथं जाता आलं असतं. पण त्यांनी मनाला आवर घातला. समोरून ऐकू येणाऱ्या संगीताचे सूर आठवत आणि आळवत त्यांनी आपला अभ्यास सुरू ठेवला.

रॉबर्ट मनी हायस्कूलमध्ये असताना अण्णांनी आपलं हस्ताक्षर सुधारण्याचा प्रयत्न केला. सुधारलं. शाळेचे प्राचार्य जॅक्सन हे कडक स्वभावाचे पण विद्याप्रेमीशिक्षक होते. धोंडू सातवीत गेला. म्हणजे आजची शालान्त परीक्षा. याच सुमारास त्यांना एक चांगला मित्र मिळाला. त्याचं नाव नरहर बाळकृष्ण जोशी. नरहरपंतांना दैवगतीमुळं मॅट्रिकच्या (शालान्त) परीक्षेत अपयश आलं. त्यांची इंग्रजीची उत्तरपत्रिकाच हरवली. पुन्हा परीक्षेला बसताना धोंडूची भेट झाली. ही जिवाशिवाची भेट उरली. नरहरपंतही खिशात दमडी नसतांना ध्येयपूर्तीसाठी मुंबईला आले होते. एका वसतीगृहात खोली मिळवून ते रहात होते. तिथंच अण्णा जात. दोघं बरोबर अभ्यास करीत. नरहरपंतांचा सहवास अण्णांना आवडे. प्रत्यक्ष अभ्यासाबरोबरच अन्य विषयांवर चर्चा असत. ख्रिश्चन धर्म स्वीकारलेले एक मुस्लिम गृहस्थ रे. अली आणि प्राचार्य कार्स यांच्याबरोबर नरहरपंतांची चाललेली चर्चा धोंडोपंत मन लावून ऐकत. तिथलं पाणी पितानाही प्रथम अवघड वाटलं. पण नंतर धोंडोपंतही या चर्चांमध्ये सामील झाले आणि मूळचेच मोकळ्या मनाचे असलेले धोंडोपंत अधिक मोकळेपणाने विचार करू लागले.

केसोपंताचं देहावसान झालं आणि मुंबईतील शिक्षणाला विराम द्यावा लागणार अशी चिन्हं दिसू लागली. पण अत्यंत काटकसरीनं राहून आपलं शिक्षण पुढं सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. संगीताची व नाटकांची आवडही काही काळ दूर ठेवावी लागली.

धोंडोपंत कर्वे आणि नरहरपंत जोशी दहा वर्षे एकत्र राहिले. नरहरपंतांनी धोंडोपंतांना वाचनाची आवड लावली. 'इन ट्यून विथ द इन्फिनिटी' हे ट्राइन यांचं पुस्तक त्यांना फार आवडलं. याच कालखंडात धोंडोपंतांचा जीवनविषयक दृष्टिकोण आकारास आला. त्यांच्या जीवनशैलीला तर्कशुद्ध वैचारिक अधिष्ठान लाभले. प्रसिद्ध आंग्ल कवी वर्ड्स्वर्थ यांचे नातू डॉ. वर्डस्वर्थ हे एल्फिन्स्टन कॉलेजचे प्राचार्य होते. त्यांच्या हाताखाली शिकावं म्हणून कर्वे जोशी इ. विद्यार्थ्यांनी विल्सन कॉलेज सोडले. अत्यंत काटकसरीने राहून ही महानगरातील शिक्षणयात्रा कर्वे यांनी सुरू ठेवली होती. एल्फिन्स्टनमध्ये त्याकाळी थोर गणितज्ज्ञ शिक्षणतज्ज्ञ गोपाळ कृष्ण गोखले, प्रसिद्ध कायदेतज्ज्ञ चिमणलाल सेटलवाड, चिं. ग. भानू इ. नामांकित प्राध्यापक होते. १८८४ साली गणित विषय घेऊन कर्वे बी. ए. झाले. त्याकाळच्या रीतीप्रमाणे कर्वे यांचा विवाह आधीच दहा वर्षे झाला होता. त्यांना अडीच वर्षांचा मुलगा होता. रघुनाथ त्याचं नाव. कर्वे यांनी नंतर पत्नी राधाबाई आणि मुलगा रघुनाथ यांना मुंबईला आणलं. कर्वे यांनी राधाबाईनाही मुंबईत शिकवायला सुरुवात केली. घरकाम सांभाळून राधाबाई शिकू लागल्या. न अडखळता मराठी दोन पुस्तकं वाचू लागल्या. इंग्रजीही शिकू लागल्या. कर्वे यांनी स्त्री शिक्षणाची सुरूवात अशी घरापासूनच केली होती.

मुंबईमध्ये असताना कर्वे दोन भूमिका करीत होते. ते विद्यार्थीही होते आणि शिक्षकही होते. एल्फिन्स्टन हायस्कूलमध्ये त्यांनी वर्षभर शिक्षकाची नोकरी केली. त्यानंतर कॅथेड्रल गर्ल्स हायस्कूल आणि अलेक्झांड्रा गर्ल्स हायस्कूल या दोन्हीही ठिकाणी अर्धवेळ अध्यापनाचे काम केले. या दोनही

शाळांतील विद्यार्थिनी प्रामुख्याने युरोपीय व पारशी कुटुंबातील असत. या शाळांमध्ये काम करताना कर्वे यांना वेषांतर करावं लागलं. धोतराऐवजी ते पँट वापरू लागले. पगडी, पँट आणि बंद गळ्याचा कोट असा त्यांचा पोशाख या कालखंडात असे.

कै. राजारामशास्त्री भागवत यांच्या आमंत्रणावरून कर्वे भागवतांनीच स्थापन केलेल्या मराठा हायस्कूलमध्ये शिक्षक झाले. पगार कमी होता. तरीही त्यांनी ध्येयवादाच्या सिद्धीसाठी ही नोकरी स्वीकारली. शिकवण्याही कराव्या लागतच होत्या. पण स्वतःचा मुंबईतील संसार, घरी करावी लागणारी मदत आणि भविष्यातील कार्यासाठी थोडी शिल्लक या त्रिविध उद्देशाने कर्वे सूर्योदयापासून सूर्यास्तानंतरपर्यंत काम करू लागले. माझगावला त्यांनी एक खाजगी वर्ग सुरू केला होता. बिऱ्हाड गिरगावात होतं. पहाटे साडेचारला उठून, दहिभाताची न्याहारी करून, चालत माझगावला जात. अशा तऱ्हेने पहाटे ४ ते रात्री १० पर्यंत कर्वे अथकपणे कामात असत. रघुनाथाला शिक्षणासाठी दापोलीला ठेवले होते. पण त्यांची मुंज मुंबईतच अत्यंत साधेपणाने त्यांनी केली. एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये शिकत असल्यापासूनच त्यांनी आपल्या कमाईतील एक रुपयाला एक पैसा याप्रमाणे काही रक्कम समाजसेवेसाठी म्हणून बाजूला ठेवली होती. भविष्यातील कार्यासाठीच जणु ही तरतूद होती. मुंबईसारख्या महानगरीनं दापोलीच्या या कोकणपुत्राला नवे मित्र, नवा विचार, नवी कार्यपद्धती यांचा परिचय करून दिला. एवढेच नव्हे तर नवी जीवनशैली आणि जीवनाला नवा आशय प्राप्त करून दिला. या महानगरनिवासात त्यांचा परदेशी शिक्षकांशी परिचय झाला. मित्रांचा सहवास लाभला आणि मूळच्याच उद्यमशीलतेला खतपाणी मिळून कर्वे यांच्या भविष्यकाळातील समाजकार्याची बैठक मुंबईत तयार झाली.

१८९१ मध्ये पत्नी राधाबाईंचा मृत्यू झाला आणि कर्वे यांच्या वैवाहिक जीवनातील पहिले पर्व संपले. मुंबईला असतानाच मुरूड गावाच्या सुधारणेसाठी कर्वे आणि त्यांची मित्रमंडळी विशेष प्रयत्न करीत होती. मुंबईला मराठाहायस्कूलमध्ये आपल्याला काही विशेष करता येईल असे त्यांना वाटत होते. पण याच सुमारास कै. गोपाळ कृष्ण गोखले यांच्याकडून त्यांना पुण्यात येण्याविषयी पत्र आले. 'फर्ग्सनसारख्या नामांकित संस्थेचे निमंत्रण'. आपण केवळ बी. ए. आहोत, तेव्हा हे आव्हान पेलेल का नाही असे कर्वे यांना वाटत होते. पण गोखले यांनी त्यांना धीर दिला आणि १५ नोव्हेंबर १८९१ रोजी कर्वे डेक्कन एज्युकेशन सोसायटीत दाखल झाले.

पुण्यात आल्यानंतर प्रथम दीड वर्ष त्यांनी अगदी एकमार्गीपणे काम केले. रोज पाचसहा मैल फिरणे, अभ्यास करणे आणि शिकवणे यामध्ये कर्वे मग्न असत.याचकाळात त्यांनी पूना नेटिव्ह इन्स्टिट्यूशनच्या गोखले यांच्याबरोबर गणिताचा अभ्यास केला. उत्तम शिक्षकाला ज्ञान आणि आत्मविश्वास यांची आवश्यकता असते. त्याकाळी डेक्कन एज्युकेशन सोसायटी ही नाणावलेली संस्था होती. टिळक-आगरकर यांचे वलय त्या संस्थेमागे होते. या संस्थेच्या फर्ग्सन महाविद्यालयात पुढे रँ. परांजपे येईपर्यंत कर्वेच गणिताचे मुख्य प्राध्यापक होते.

आपल्या भावी उत्तुंग कार्याची मुहूर्तमेढ अण्णासाहेब कर्वे यांनी याच कालखंडात पुण्यात रोवली. विष्णुशास्त्री पंडित यांचे पुनर्विवाहासंबंधीचे लेख बालपणीच कर्वे यांनी मुरूड येथे वाचले होते. तेव्हाच विधवाविवाह, पुनर्विवाह, परित्यक्ता या प्रश्नासंबंधी त्यांच्या मनात विचारांचे काहूर माजत असे. पुण्यात त्यांच्या या विचारांना पुन्हा एकदा चालना मिळाली. कै. सीतारामपंत देवधर यांनी रचलेले एक पद केसरीत प्रसिद्ध झाले होते. ते अण्णांना फार आवडे. हे पद ते वारंवार गुणगुणत. पंडिता रमाबाई यांनी

शारदासदन ही संस्था प्रथम मुंबईला काढली होती. विधवांचे शिक्षण व पुनर्वसन हीच या संस्थेची कामे होती. ही संस्था पुढे पुण्याला हलवली. तेथून तिचे पुण्याजवळच केडगावला स्थलांतर झाले. मुंबईत असतानाच या संस्थेच्या कार्याविषयी अण्णासाहेब उत्सुक होते. अनाथबालिकाश्रमाची कल्पना आधीच मनात रुजली होती. विधवाविवाहोत्तेजक मंडळ सुरू करायचं असं मनातं होतं. त्याला आता आकार आला. एकीकडे नोकरी आणि दुसरीकडे सुटीच्या काळात संस्थेचा प्रचार करण्यासाठी ठिकठिकाणी दौरे असा कर्वे यांचा क्रम सुरू झाला. विधवाविवाहाच्या पुरस्कर्त्यांची संमेलने भरविणे या उपक्रमालाही चांगली चालना मिळाली. अण्णांचे कार्य चहूबाजूंनी फुलत गेले.

गणिताचे प्राध्यापक या नात्याने कर्वे पुण्यात आले. परंतु मूळची समाजसेवकाची भूमिका त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. महाविद्यालयाच्याअभ्यासक्रमातील गणितांबरोबरच अण्णा समाजसेवेची अनेक गणिते मांडत चालले होते. आणि एक महत्त्वाची गोष्ट! त्यांना नुसती दुसऱ्याला गणिते शिकवायची नव्हती. तर स्वतःच ती गणिते सोडवायची होती. यातलं एक महत्त्वाचं गणित अण्णांनी मांडलं आणि प्रयत्नपूर्वक सोडवलंही. ते म्हणजे पुनर्विवाहाचं गणित.

कर्वे यांचे मित्र नरहरपंत जोशी यांची बहीण गोदूबाई ही अकाली विधवा झाली होती. तिला भावानं मुंबईला नेलं. ती रमाबाईंच्या शारदासदनात राहू लागली. शारदासदन पुण्याला आले. गोदूबाईंच्या वडिलांनीच कर्वे यांना गोदूबाईबद्दल विचारले. ११ मार्च १८९३ रोजी कर्वे यांनी गोदूबाईंशी विवाह केला. येथपासून त्या आनंदीबाई कर्वे या नावानं ओळखल्या जाऊ लागल्या. एका विधवेशी विवाह करण्याचे धाडसी पाऊल टाकून कर्वे यांनी त्यावेळच्या समाजमनाला धक्काच दिला होता. त्याबद्दल त्यांना बरंच काही सहन करावं लागलं. पण कर्वे शांत होते. अविचल होते. उपेक्षेच्या काटेरी बाणांना फुले समजून त्यांनी त्यांचा शांतपणे स्वीकार केला. आणि पुणे शहरातील त्यांच्या उज्ज्वल कार्याची नांदीच या घटनेनं झाली.

# बहिष्कार, स्वीकार आणि आकार

अण्णांनी पुनर्विवाह केला. हे एक धाडसी पाऊल होतं. अण्णा स्वतः अविचल होते. या विवाहाची चर्चा त्याकाळच्या वृत्तपत्रांतून भरपूर झाली. काही पत्रांनी अभिनंदन केलं. पण बऱ्याच वृत्तपत्रांनी निषेध केला. काहींची भाषा फारच कठोर होती. पण अण्णा शांतपणे हे हलाहल पचवून शांत राहिले. विवाहानंतर अण्णा नेहमीप्रमाणे एकदा आनंदीबाईंसह मुरूडला गेले होते. मुरूडला वेगळाच अनुभव आला. मुरूडला गावकीची सभा भरली. आणि गावकीनं तीन ठराव केले-

-एका बैठकीवर धोंडोपंतांना घेऊन बसू नये.
-ज्या सभेत धोंडोपंत असतील त्या सभेत इतरांनी जाऊ नये.
-यानंतर ते पुन्हा आपल्या गावात, कवाडीत, पाऊल टाकतील तर त्यांचे बंधू भिकाजीपंत यांच्यावर बहिष्कार घालावा.

पहिल्या दोन ठरावातील आशय अण्णांना मान्य होता. ते लोकांपासून दूर व्हायला तयार होते. पण तिसरा ठराव अप्रत्यक्षपणे त्यांचे कौटुंबिक नातेसंबंध तोडणारा होता. तो ठराव अण्णांना असह्य व जाचक वाटला. पुनर्विवाहबाबत त्यावेळी लोकांच्या प्रतिक्रिया तीव्र होत्या.

“तुम्हा काळतोंड्यांचं पुन्हा दर्शन नको.”
“व्यभिचारावर पांघरूण घालण्याकरिता पुनर्विवाह केला.”
“हे लग्न फार काळ टिकणार नाही.”

अशा अनेक कडवट प्रतिक्रियांना अण्णा शांतपणे सामोरे गेले. तेरा महिन्यानंतर या दांपत्याला मुलगा झाला. त्याचं नाव शंकर ठेवलं. अण्णांवरलोकांनी घातलेला बहिष्कार अण्णांनी स्थितप्रज्ञवृत्तीने सहन केला. बंदुकीची गोळी कापसाच्या गाठीवर मारली व तिची तीव्रताच कमी होते. अण्णा कापूस झाले होते. त्यांनी मनाशी ही खूणगाठ बांधली होती की या विरोधाची धार बोथट होईल. बहिष्काराचं रुपांतर होईल. आणि या स्वीकारातूनच आपल्या इच्छित कार्याला आकार येईल. हळुहळु तसंच होत गेलं.

नागपूरचे कै. वामनराव कोल्हटकर यांनी पुनर्विवाहास उत्तेजन देण्यासाठी कार्य सुरू केले होते. अण्णांनी प्रथम ‘पुनर्विवाहोत्तेजक मंडळ’ स्थापन करण्यासाठी कोल्हटकरांना सहकार्य केले. या नावातही थोडी सुधारणा करून‘पुनर्विवाह-प्रतिबंध-निवारक मंडळी’ असा बदल झाला. अण्णा या संस्थेचे इ. स. १९०० पर्यंत कार्यवाह होते. शेकडो गांवी गेले, भाषणे केली, निधी गोळा केला आणि त्यांनी संस्था नावारुपाला आणली. १८९५ साली त्यांनी सुटीच्या कालखंडात एकूण १३० दिवस प्रवास केला. नागपूर, भंडारा, रायपूर येथपासून बेळगावपर्यंत दौरा केला.

विधवाविवाहासारख्या चळवळीला लोकांपर्यंत नेणे गरजेचे होते. लोकप्रबोधनाच्या मार्गातून या चळवळीला असलेला विरोध मावळेल हे कर्वे यांनी जाणले होते. प्रबोधनबरोबरच एखादा कृतिकार्यक्रम आवश्यक होता. एखादा विवाह जुळवून आणता आला तर ते उदाहरणच प्रबोधनासाठी उपयुक्त ठरेल याबद्दल कर्वे याची खात्री होती. पाच-सात वर्षांत त्यांनी अशाप्रकारचे सुमारे पाच विवाह जुळवून आणले. त्यातला एक विवाह खुद्द त्यांच्या पुतणीचाच होता. मनूताई ही त्यांची पुतणी. तिचे पती भिकू बिवलकर

अकाली गेले. अण्णांचे फर्ग्सनमधले एक सहकारी प्रा. गोविंद चिमणाजी भाटे हे विधुर होते. त्यांना अण्णांनी विवाहास उद्युक्त केलं. १८९९ मध्ये हा पुनर्विवाह पुण्यात झाला. या घटनेमुळे विधवाविवाह कार्याला चांगली चालना मिळाली. आपल्या निरनिराळ्या भाषणांत अण्णा एक मुद्दा तळमळीने मांडत असत.

"गृहस्थाश्रमी जीवन स्त्रीसाठी तसेच पुरुषांसाठी सर्वोत्तम व इष्ट असते. म्हणून दुर्दैवाने विधवा झालेल्या आणि गृहिणीचे जीवन पुन्हा लाभावे अशी स्वाभाविक इच्छा बाळगणाऱ्या कोणत्याही मुलीवर व स्त्रीवर कायमचे वैधव्य लादले जाऊ नये."

कर्वे उत्तम वक्ते नव्हते. पण त्यांच्या भाषणात तळमळ इतकी होती की, या विचारानेच लोक भारावून जात. स्वतः विधवाविवाह करणे आणि पुढेविधवाविवाहाचा सतत पुरस्कार करणे यामुळे कर्वे केवळ स्वकीयांच्याच नव्हे तर अनेक परिचितांच्या रोषास पात्र झाले होते. आप्तजन दुरावले. उपेक्षा झाली. जन्मदात्या आईच्या मनातही पुत्राच्या या कृत्याबद्दल नाराजी होती. पण ध्येयपथावरील व्यक्तीचा दृढनिश्चय वादळवाऱ्यातही ढळत नाही. अण्णा तसे होते. कालांतराने वातावरण निवळत गेले. पण त्यासाठी वर्षानुवर्षे सतत कार्य करीत रहावे लागले.

विधवाविवाहाला विरोध होण्यामागे जी अनेक कारणे होती, त्यापैकी महत्त्वाचे कारण धर्मकल्पना हे होते. विधवाविवाहाच्या मार्गातली मोठी धोंड म्हणजे धार्मिक कारणास्तव होणारा विरोध. हा विरोध मोडून काढणे सहजासहजी शक्य नव्हते. धर्मकल्पनांतून निर्माण झालेल्या रुढींची मुळे इतक्या खोलवर रुजलेली असतात की, ती सहजी उखडून टाकणे शक्य नसते. यासाठी प्रयत्नांचे सातत्य आवश्यक असते. धर्मकल्पनांच्या जोखडाखालून समाजाला मुक्त करायचं असेल तर आणखी भरीव अशा कामाची गरज आहे हे कर्वे यांनी जाणले.

पंडिता रमाबाई आणि त्याचं शारदासदन यांबद्दल कर्वे यांना आदर होता. शारदासदनमधील बारा विद्यार्थिनी ख्रिश्चन धर्म स्वीकारल्याची वार्ता आली आणि शारदासदन संस्थेबद्दल लोकांची नाराजी व्यक्त झाली. कलकत्त्याजवळ बरानगर इथं शशिपाद बॅनर्जी यांनी एक विधवाश्रम सुरू केला होता. अशा संस्थांची माहिती कर्वे यांना होतीच. अशा प्रकारच्या संस्थांमध्ये ज्या उणीवा आहेत, त्या टाळून विधवाशिक्षणासाठी एखादी संस्था सुरू करणे आवश्यक आहे असे कर्वे यांना वाटू लागले.

प्रथम ही योजना अगदी छोट्या स्वरुपात होती. पाचदहा विधवांसाठी छोटा आश्रम! पण त्यांची निवास भोजनाचीही सोय करायची होती. त्यासाठी व निधीसंकलनासाठी एखादं छोटंसं मंडळ तयार करायचं होतं. याशिवाय एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे अण्णांची कोणतीही कृती 'लोकां सांगे ब्रह्मज्ञान' अशा स्वरुपाची नव्हती. त्यांनी स्वतः आपल्या बचतीतून या कामासाठी एक हजार रुपये दिले. १४ जून १८९६ रोजी त्यांनी वि. मो. भिडे यांच्या वाड्यात एक बैठक भरविली सोळा मित्रमंडळी आली होती. डॉ. रा. गो. भांडारकर यांची अध्यक्षपदी निवड झाली तर कर्वे यांची चिटणीस म्हणून नियुक्ती झाली. या संस्थेच्या निधीसंकलनासाठी कर्वे यांनी दौरे केले. त्यांना भरघोस पाठिंबा मिळाला. केवळ पुण्यातून गोळा झालेल्या देणग्यांमुळे संस्थेला सात विधवांची सोय करता येणे शक्य झाले. १८९७ च्या अखेरीस मंडळीकडे ५६३३ रु. ११ आणे, ४ पै एवढी रक्कम शिल्लक होती.

अनुक्रमणिका

मुलींच्या शाळांच्या वसतिगृहात आतापर्यंत अशा विधवांची सोय करण्यात येत होती. आता संस्थेला स्वतःची इमारत असणे आवश्यक आहे असे सर्वांनाच वाटले. इथंही कर्वे यांनी स्वतःपासूनच सुरुवात केली. त्यांच्याजवळ त्यांचं एक विमापत्र ( पॉलिसी) होतं. यावर कर्ज काढून नव्या इमारतीसाठी निधी उभा करता येईल असे त्यांना वाटले. १८ एप्रिल १८९९ रोजी त्यांनी आपले विमापत्र विश्वस्तांच्या हवाली केले. आश्रमाच्या वार्षिक अहवालात मात्र 'एका सद्‌गृहस्थांकडून देणगी' एवढाच उल्लेख आहे. पुण्याच्या सदाशिवपेठेत पेरूगेटजवळच्या एका भाड्याच्या जागेत 'अनाथबालिकाश्रम' या संस्थेची स्थापना करण्यात आली. गोरे यांच्या मालकीच्या या घरात अण्णासाहेब कर्वे यांनी आपलेही बिऱ्हाड नेले. पण अनाथबालिकाश्रम नेहमी दूरच असावा, भरवस्तीत नसावा असे कर्वे यांचेच मत होते. १८९९ मध्ये प्लेगच्या साथीत आश्रम काही काळापुरता गोखले यांच्या हिंगणे येथील शेतात हलविला होता. या जागेत सुमारे चार महिने आश्रम चालविला. तेव्हा कर्वे यांना वाटू लागले की, हे ठिकाणच आश्रमाला चांगले मग हीच जागा अनाथबालिकाश्रमासाठी निश्चित झाली.

जून १९०० मध्ये हिगंणे येथील या जागेत एक पर्णकुटी बांधण्यात आली. लहानशी झोपडीच. तिला त्याकाळी पाचशे रुपये खर्च आला. या पर्णकुटीत त्यावेळी आठ विधवा रहात होत्या. आश्रमाची व्यवस्था बघायला कुणीतरी हवं होतं. दोन अविवाहित मुलीही तिथंच अशी व्यवस्था पाहण्यासाठी रहात होत्या.

कर्वे यांच्या प्रथम पत्नीची थोरली बहीण नर्मदाबाई याही आश्रमाच्या कामात सहभागी झाल्या. स्वयंपाकपाणी आणि मुलींच्या सुखसोयी यांकडे लक्ष देत. फर्ग्सन कॉलेजमधील काम होतेच. दिवसभर कॉलजचे काम करून सायंकाळी जेवूनच कर्वे हिंगण्याच्या वाटेला लागत. रात्री आणि पहाटे मुलींना शिकवून पुन्हा कॉलेजच्या कामाला उपस्थित होत. कॉलेज आणि आश्रम यांतच सारा वेळ जात असल्याने साहजिकच संसाराचा सारा भार आनंदीबाईंना उचलावा लागे. त्यांची प्रकृतीही बरी नसे. तरीही त्या ही कसरत कसोशीने करीत होत्या. आपल्या मदतीसाठी त्यांनी ज्यांना घेतले होते, त्यांच्या जातीपातीचा विचार न करता त्यांना कामे दिले होते. पंडिता रमाबाई यांची शिकवण आणि पतीच्या उदात्त कार्याचे आदर्श उदाहरण या दोन्ही गोष्टीमुळे आनंदीबाईही कर्वे यांच्याच कार्यात पर्यायानेसहभागी झाल्या होत्या असे दिसते. आनदीबाईनी संसाराची आघाडी उत्तम रीतीने सांभाळून कर्वे यांच्या कार्यास होईल तेवढी मदत केली. आश्रमाच्या नावाला कोणत्याही प्रकारे कलंक लागणार नाही याची खबरदारी त्या घेत असत. त्यामुळे बायाचे घर ... आनंदीबाईचे घर. हे लोकांना आश्रमासारखेच वाटत होते.

अण्णासाहेब कर्वे अहोरात्र कायावाचामनाने आश्रमासाठी काम करीत होते. अनंत अडचणींचे डोंगर पार करण्यासाठी अपार कष्ट करावे लागत होते. पुणे ते हिंगणे अंतर सहा किलोमीटरचं. आजच्यासारखे गुळगुळीत रस्तेही नव्हते. पावसाळ्यात चिखल तुडवीत जावे लागे. वाटेतले नाले तुडुंब भरून वाहू लागत. आणि हे सारं करीत असतानाच पाठीवर मोठं गाठोडं असे. हिंगण्याला ज्या वस्तू उपलब्ध होत नसत, त्यांचं ओझं असे. अशा दुहेरी श्रमांची मुळीच पर्वा न करता कर्वे हिंगण्याची वाट चालत होते.

अनाथबालिकाश्रमाच्या कामाला गती मिळाली. कर्वे यांची पायपीट सुरूच होती. घरची काळजी नसली तरी घरात कुणी आजारी असेल तर बाया अण्णांच्या वाटेकडं डोळे लावून असत. हा सर्व त्रास वाचविण्यासाठी हिंगण्याला जी पर्णकुटी बांधली होती त्याच पर्णकुटीच्याजवळ मोठी इमारत बांधली असं

ठरलं. प्रथम आठ हजार रुपये खर्च करून मुख्य चौकाची दक्षिणेकडील बाजू आणि तिला लगत पूर्वपश्चिम बाजूंच्या दोन दोन खोल्या अशी इमारत तयार झाली. अनेकांनी या विस्तारासाठी देणग्या दिल्या, वर्गणी दिली. १९०२ च्या उत्तरार्धात ही इमारत तयार झाली. मग स्वतः कर्वे कुटुंबासह तिथं रहायला गेले. सुरुवातीला हिंगण्याची वाटही चांगली नव्हती. खडबडीत रस्ते, दगडगोटे वर आलेले, मुलांना शाळेत पोचविण्यासाठी कर्वे यांनी बैलाच्या छकड्याची योजना केली. पुढे आश्रमाचे बरेच काम तेथील स्त्रियांनी अंगावर घेतले. काही वर्षानंतर कर्वे पुन्हा पुण्यात रहायला आले.

१९०५ सालापासून संस्थेला बरे दिवस आले. संस्थेला प्रसिद्धी मिळू लागली. दूरवरून लोक येत, संस्था पाहून समाधान व्यक्त करीत. त्याकाळी सामान्यपणे दरवर्षी एक हजार स्त्रीपुरुष ही संस्था बघायला येत. यांमध्ये सामान्यजनांपासून मोठमोठे अधिकारी, अमंलदार, धनिक, विद्वान असेही लोक येत... पण कर्वे यांच्या कुटुंबातील ... विशेषतः आई व वडील बंधू या आश्रमात आतापर्यंत आले नव्हते.

१९०२ मध्ये कर्वे यांचे वडील बंधू आणि त्यांच्या वृद्ध मातुःश्री पंढरपूरच्यायात्रेला गेले होते. मुरूड गावच्या लोकांनी अण्णा कर्वे यांच्यावर विधवाविवाहानिमित्त बहिष्कार घातला होता. तेव्हापासून गाव आणि घर तुटले होते. कर्वे यांना ही बोच होती. त्यांनी बंधूंना लिहिले...

“पंढरपूरच्या यात्रेसाठी जात आहात. परत जाताना दोन दिवस पुण्यात यावे. माझ्याच घरी उतरावे असा आग्रह नाही. पण कसेही करून आश्रम बघावा अशी माझी इच्छा आहे.”भावाचं मन गलबललं. आईलाही मनातून आनंदच झाला. भिकाजीपंत व मातोश्री पंढरपूरला गेले. येताना पुण्यात उतरले. त्यांच्याबरोबर आईची बहीण ... मावशी येईल असे कर्वे यांना वाटले होते. पण मावशी येऊ शकली नाही. मावशीचं या भाच्यावर फार प्रेम होतं. पण पुनर्विवाहानंतर ते प्रेम आटलं. आईबरोबर मावशीही यात्रेला आली होती. ती पुण्यातही आली. पण ती आश्रम बघायला आली नाही. आईचं मन द्रवलं. पण मावशीचं नाही द्रवलं. कर्वे यांना या घटनेमुळं वाईट वाटलं. पण करणार काय? तरीही आई आणि वडील बंधू भेटले यामुळं त्यांना गहिवरून आलं.

धोंडूनं विधवेशी पुनर्विवाह केल्यापासून जे वातावरण गढूळ झालं होतं ते आता पुष्कळ निवळलं होतं. आई आणि भाऊ भेटले पुत्रभेटीनं मातेला मनस्वी आनंद झाला. डोळ्यांतून मायेचा पाझर स्रवू लागला. कर्वे यांचाही कंठ दाटून आला. पण कर्वे यांना विशेष समाधान झालं ते याचं की, आईनं आणि भावानं आश्रम बघून समाधान व्यक्त केलं.

कर्वे सारं भरून पावले.

समाजात त्यांचा बोलबाला झाला होता. कुठंकुठं विरोध आणि उपेक्षा यांना तोंड द्यावं लागत होतं. तरी सामान्यपणे त्यांच्या कार्याचा सर्वत्र स्वीकार झाला होता. लोक देणग्या देत होते. कौतुक करीत होते. पण घरच्यांची शाबासकी मिळाली यामुळं कर्वे कृतार्थ झाले.

मुरूडच्या लोकांनी सुरुवातीला कर्वे यांच्यावर बहिष्कार घातला. त्याच लोकांनी यथावकाश कर्वे यांचा स्वीकार केला. कारण त्यांच्या कार्याला आता चांगला आकार आला होता. लोकमान्यता लाभली होती. बहिष्काराचं रुपांतर स्वीकारात होणं आणि कार्य आकारास येणं यासाठी कर्वे यांना वर्षानुवर्षे

स्थितप्रज्ञवृत्तीने, ‘अेकला चलो रे’ पद्धतीने वाटचाल करावी लागली. ही वाटचाल म्हणजे अक्षरशः पायपीट होती. पण या पायपिटीतून एक मंदिर साकारलं होतं.

अनुक्रमणिका

# ‘वेलु गेला गगनावरी’

वडील बंधूंची आश्रमाला पहिली भेट! त्यानंतर बारा वर्षांनी त्यांनी आश्रमाला पुन्हा भेट दिली. या बारा वर्षांच्या, म्हणजेच एक तपाच्या कालावधीत, कर्वे यांची तपश्चर्या फळाला आली होती. त्यांच्या कार्याचा समाजानं स्वीकार केला होता. दिनकर हा पुत्र मोठा झाला होता. कर्वे यांचे मामामामी.. रॅंग्लर र. पु. परांजपे यांचे आईवडील, यांनीही कर्व्यांच्या कार्याला समाधानाची पावती दिली होती. याच सुमारास कर्वे आता पन्नाशीला पोचले होते. डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्य या नात्याने संस्थेच्या कामाचा पसाराही वाढला होता. आश्रमाचा व्यापही खूप वाढला होता. डेक्कन एज्युकेशन सोसायटी या संस्थेतून निवृत्त व्हावं असा विचार मनात घोळत होता. वीस वर्ष पूर्ण होण्यापूर्वीच निवृत्ती घेतली तर निवृत्तीवेतन मिळणार नव्हते. बाया कर्वे म्हणत, “घरखर्च कसा चालवायचा?”संस्थेच्या अन्य सभासदांनी कर्वे यांच्या निवृत्तीला नापसंती दर्शविली. उलट १९०४ मध्ये त्यांनी तीन वर्षे विनावेतन रजा घ्यावी असा पर्याय सुचविला.

तशात आणखी एका घटनेने कर्वे यांच्या विचारांना वेगळीच चालना मिळाली. १८९९ मध्ये रत्नागिरीच्या एका गृहस्थांनी कर्वे यांना पत्र लिहून विचारणा केली. त्यांच्या १४, १२ आणि १० वर्षांचा तीन मुलींना बालिकाश्रमात प्रवेश हवा होता. थोरली १४ वर्षांची विधवा होती. या तिघींनाही शिक्षण मिळावे अशी त्या गृहस्थांची इच्छा होती. कर्वे यांनी त्या विधवेला आणि अन्य दोन अविवाहित बहिणींना आश्रमात प्रवेश दिला. अविवाहित मुलींना आश्रमांत प्रवेश देण्याचा हा प्रारंभ होता. अशा अविवाहित मुलींची संख्या वाढू लागली. १९०६ पर्यंत आश्रमात एकूण ७५मुली होत्या. त्यापैकी १९ मुली अविवाहित होत्या. अविवाहित मुलींची संख्या एकूण मुलींच्या पंचवीस टक्के संख्येपेक्षा जास्त असू नये असे धोरण होते. ते योग्यच होते. पण त्यामुळे अनेक अविवाहित मुलींना प्रवेश देणे अशक्य होत होते. त्यांना चांगले जीवन जगण्याची संधी नाकारली जात होती.

पुण्यातली हुजुरपागा शाळा आणि आणखी एक ट्रेनिंग कॉलेज एवढीच मुलींच्या शिक्षणाची सोय पुण्यात त्यावेळी होती. बालिकाश्रमाने केलेल्या कार्याचे लोकांना कौतुक होते. पण अधिक मुलींना संधी हवी असेही लोकांना व खुद्द कर्वे यांना वाटत होते. अविवाहित किंवा विधवा नसलेल्या विवाहित स्त्रियांसाठी निवासभोजनासह शिक्षणाची सोय आणखी एखाद्या संस्थेद्वारे करणे आवश्यक आहे हे कर्वे यांनी अनाथबालिकाश्रमाच्या व्यवस्थापन मंडळाला पटवून दिले. अशी सोय केली तर जो आर्थिक भार सोसावा लागेल तो स्वतः सोसण्याची तयारी कर्वे यांनी दाखवली.

कर्वे यांनी धीराने पुढचे पाऊल टाकले.डेक्कन एज्युकेशन सोसायटीनेलकडीपुलाजवळ असलेल्या आपल्या वाड्यात महिला विद्यालय सुरू करण्यासाठी सहकार्य केले.

आणि महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील महिलांच्या प्रगत शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली गेली. मार्च १९०७; रंगपंचमीचा दिवस, सहा विद्यार्थिनींचे महिला विद्यालय सुरू झाले. सहापैकी तीन विद्यार्थिनी अनाथबालिकाश्रमातील होत्या. काही विद्यार्थिनींनी काही काळ अविवाहित रहावे आणि शिक्षण पूर्ण करावे यासाठी दानशूर देणगीदारांच्या मदतीने शिष्यवृत्ती सुरू केली. कर्वे यांचेच शिक्षक वि. ल. सोमण या महिला विद्यालयात शिक्षक झाले. नर्मदाबाईंनी ( राधाबाईंची बहीण ) स्वयंपाकघर व अन्य व्यवस्थापनाची जबाबदारी घेतली. महिला विद्यालयाला लोकांची सहानुभूती मिळू लागली.

अनुक्रमणिका

मुंबईतील एका महिलेने घरोघर हिंडून धान्य जमविले आणि ते विकून आलेली रक्कम कर्वे यांच्या संस्थेला दिली. 'मुष्टीफंड' या नावाने ही योजना लोकप्रिय झाली. सुरुवातीला कर्वे यांना या फंडातून फक्त सात रु. चार आणे मिळाले. पण या मागची भावना मोठी होती कळकळ होती. कर्वे यांचा त्यामुळेच कामाचा उत्साह वाढला.

एका गृहस्थांच्या आठ मुली आणि या मुलींची आत्या यांनी या महिला विद्यालयात शिक्षण घेतले. श्रीमती गंगाबाई गोखले या विधवा महिलेने'ज्ञानप्रकाश' मध्ये महिला विद्यालयासंबंधी लेख वाचला. त्यांनी दरमहा एका मुलीसाठी पाच रुपये शिष्यवृत्ती देऊ केली.

महिला विद्यालयासाठी आता नव्या इमारतीची आवश्यकता होती. १९११ मध्ये यासंबंधी योजना आखण्यात आली. त्यावेळी एकूण खर्च किमान पंचवीस हजार रुपये येणार होता. एकतृतियांश खर्च एन. एम. वाडिया ट्रस्टने देऊ केला. यासाठी जो चेक दिला होता, त्यावर चुकून 'बालविधवा शाळा' असं लिहिलं होतं. दुरुस्तीनंतर चेक वटला. या खटाटोपात एक वेगळीच अडचण उभी राहिली. महिला विद्यालयासाठी जमा होणारा निधी ज्या बँकेत ठेवला होता ती बँक बुडाली. नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनी भारत सेवक समाजाच्या राखीव निधीतून पाच हजार रु. काढले आणि कर्वे यांना कर्जाऊ दिले.

हिंगणे येथे अनाथबालिकाश्रमाच्या शेजारीच निवासाची सोय असलेली महिला विद्यालयाची नवी इमारत १९११ मध्ये बांधण्यात आली. कर्वे यांची मेहुणी पार्वतीबाई आठवले या कोकणात देवरुख येथे होत्या. त्या कर्वे यांच्या कामात सहभागी झाल्या. त्यांचा मुलगा नाना याला चांगले शिक्षण मिळाले. अनाथबालिकाश्रम सुरू करताना केवळ स्त्रियांचा उद्धार एवढेच मर्यादित उद्दिष्ट कर्वे यांच्यासमोर नव्हते. तर राष्ट्रउभारणीच्या कार्यात समाजसुधारणांद्वारा आपलाही वाटा असावा असे त्यांना वाटले. शिक्षण हे परिवर्तनाचे महत्त्वाचे साधन असते. 'एक पुरुष शिकला तर एक व्यक्तीच शिकते, पण एक स्त्री शिकली तर संपूर्ण कुटुबं शिकते' या तत्त्वास अनुसरून कर्वे यांनी स्त्रीशिक्षणाच्या कार्याकडे आपले लक्ष केंद्रित केले.

अनाथबालिकाश्रमाच्या हेतूबाबात त्यांनी एक निवेदन प्रसृत केले होते. त्यात १९०२ साली त्यांनी काही विचार स्पष्ट केले आहेत. ते असे-

"आश्रमातील विद्यार्थिनींनी विद्या संपादन करून नीतीने आपला चरितार्थ चालवावा एवढाच केवळ आश्रमाचा हेतू नाही. तर त्यांनी तसे करून शिवाय आपल्या देशभगिनींच्या उपयोगी पडावे. त्यांच्या उन्नतीला सहाय्य करावे हा आश्रमाचा हेतू आहे. याशिवाय विद्या संपादन करून द्रव्याची अपेक्षा न करता संपादित विद्येचा उपयोग केवळ परोपकारार्थ काम करणाऱ्या व या आश्रमासारख्या संस्था आपल्या सामर्थ्यावर चालविणाऱ्या काही स्त्रिया आश्रमातून तयार होतील अशी आश्रमाला फार उमेद आहे."

आपल्या सामाजिक कार्याला आध्यात्मिक अधिष्ठान मिळाले पाहिजे असे कर्वे यांना सतत वाटत राहिले. यासाठी त्यांनी 'निष्काम कर्म मठाची' स्थापनाकेली. गीतेचा संदेश प्रत्यक्ष कार्यवाहीत आणावा या उद्देशाने ही संस्था स्थापन झाली. 'न मे कर्मफले स्पृहा' हा भगवत्‌गीतेचा संदेश. स्त्रीशिक्षणाच्या कार्यातही फळाची आशा न धरता काम करणाऱ्या व्यक्ती सहभागी व्हाव्यात असे कर्वे यांनी ठरविले.

४ नोव्हेंबर १९०८ रोजी कर्वे यांनी त्यांचे दोन सहकारी ... ना. म. आठवले आणि मथुराबाई उचगावकर यांचासह निष्काम कर्म मठाची शपथ घेतली. त्या शपथेची शब्दावली अशी होती.

"आश्रमाचे, विद्यालयाचे व अशासारख्या लोकोपयोगी संस्थांचे काम करण्यासाठी जे इंडियन लेडीज मिशन स्थापावयाचे आहे, त्या कामी मी आपले जीवित, या विश्वाचा चालक जो परमात्मा, त्याला स्मरून अर्पण करीत आहे. माझ्या जीवितावर आता माझा हक्क नाही. त्याचा उपयोग संस्थेने वाटेल तसा करून घ्यावा. माझ्या स्वतःच्या कुटुंबाच्या खर्चासंबंधाने संस्था जे ठरवील ते मला मान्य आहे."

निष्काम कर्म मठ ही अण्णांच्या सेवालीन अंतःकरणाची सुंदर साक्ष होती. मठाचे प्रत्यक्ष कार्य लगेच सुरू झाले नसले तरी कार्यकर्त्यांच्या मनात सेवाभाव प्रेरित करण्यासाठी अण्णांनी बरेच प्रयत्न केले. आश्रमाशेजारी एक टेकडी होती. टेकडीवर निवान्त वातावरण होते. वरून निळंभोर आकाश, अवतीभवतीचा विस्तीर्ण परिसर, शांतता... अशा वातावरणात आश्रमातील सर्व मुलींना आणि कार्यकर्त्यांना त्यांनी एकत्र केलं. तळमळीनं बोलले. अण्णांचा प्रत्येक शब्द भावनेत चिंब भिजलेला होता. यात कोणावरही कसलीही सक्ती नव्हती. होती ती स्फूर्ती. काहींची मनं मिळाली, मतं मिळाली. कार्यकर्ते मिळाले आणि निष्काम कर्म मठ ही उदात्त कल्पना आकारास आली.

कार्यकर्त्यांच्या पहिल्या तुकडीत चार पुरुष होते. चौदा स्त्रिया होत्या. कौलगेकर आणि गाडगीळ ही दोन दांपत्ये निष्काम कर्म मठाच्या कार्यात सामील झाली. श्री. व सौ. कौलगेकर आणि श्री. व सौ. गाडगीळ हेच मठाचे पहिले चार कार्यकर्ते. या कल्पनेला काही विरोधही झाला. विधवाश्रमातीलच श्रीमती देवधर व श्रीमती नामजोशी यांचा या कार्याला विरोध होता. आश्रमातील मुली या कार्याकडे वळल्यास आश्रमाचे नुकसान होईल असे त्यांना वाटत होते.

साधेपणा, निरपेक्षवृत्ती, भिक्षा मागून मिळालेल्या अन्नावर गुजराण आणि अहर्निश सेवावृत्ती या गोष्टी मठाच्या कार्यकर्त्यांसाठी बंधनकारक होत्या. कर्वेयांच्या टीकाकारांच्या मते ही अव्यवहार्य कल्पना होती. व्यवहारातः ही कल्पना अव्यवहार्य होतीच. पण भारतसेवक समाजाला किंवा मिशनरी लोकांना जसे निष्ठावंत कार्यकर्ते मिळाले, तसे निष्काम कर्म मठ या संस्थेला मिळाले नाहीत हे सत्य आहे. १९१२ मध्ये मठात सेवक व सेविका म्हणून ९ व्यक्तींची नोंद होती. निष्काम कर्म मठाबाबत कर्वे यांची भूमिका उदात्त होती. पण या मठाला आतून व बाहेरून होत असलेला विरोध त्यांच्या मनाला मनस्वी दुःख देणारा होता.

मठाच्या एका अहवालात कर्वे यांनी आपली व्यथा व्यक्त केली आहे. ते लिहितात-

"निष्काम-कर्म-मठाचा पाया घातला गेला आहे. यावर सुंदर व भव्य इमारत उठते अगर याचाच एकेक दगड कोसळून तो जमीनदोस्त होतो हे भविष्यकाळी ठरावयाचे आहे. असल्या संस्था सुरळीत चालण्याला केवळ पैशाचा स्वार्थत्याग करून भागत नाही. अहंकार, स्वमताचा फाजील अभिमान, परमत असहिष्णुता वगैरे अनेकवृत्ती सहकार्याच्या आड येतात. कार्यकारी माणसे असल्या मनोवृत्तीच्या तडाख्यात सापडल्यामुळे संस्था लयाला गेल्याची उदाहरणे आपल्या देशात सध्याच्या काळी हवी तेवढी सापडतील."

१९१४ मध्ये कर्वे डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या सेवेतून निवृत्त झाले. आपल्या संसाराला आणि चरितार्थाला जेवढे पैसे लागतील तेवढेच ठेवून, बाकीचे सर्व त्यांनी निष्काम-कर्म-मठ या संस्थेला दिले. कौटुंबिक जबाबदाऱ्या त्यांनी आता कमी केल्या होत्या. तीन मुले आणि पती यांचा संसार उत्तम रीतीने

सांभाळण्यासाठी बायाने मन घट्ट केले. कर्वे यांनी तर आता वानप्रस्थाश्रमात जाण्याचे ठरविले होते. पण त्यांच्या हातून यापेक्षा अधिक भव्यदिव्य कामगिरी व्हायची होती.

निष्काम कर्म मठ, विधवाश्रम आणि महिला विद्यालय या तीनही वेगवेगळ्या संस्था महिलांच्या उद्धाराचेच कार्य करीत होत्या. मठाची काही उद्दिष्टे 'तऱ्हेवाईक' होती आणि सर्वसामान्य लोकांना ती पेलवणारी नव्हती हे कर्वे यांना मान्य होते. त्याचप्रमाणे मुलींना उच्चशिक्षण देऊन त्यांची विवाहाची वयोमर्यादा वाढविणे हे महिला विद्यालयाचे उद्दिष्ट! पण अशा उद्दिष्टानुरुप कार्य करणाऱ्या आणखीही काही संस्था देशात सुरू झालेल्या होत्या. त्यामुळेच १९१५ च्या सुरुवातीला या तीनही संस्थांचे एकत्रीकरण करून'महिलाश्रम' असे यथार्थ नाव या नव्या संस्थेला देण्यात आले. डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या घटनेवर आधारित, पण महिलाविकासाची उद्दिष्टे समोर ठेवून नवी घटना महिलाश्रमासाठी तयार करण्यात आली.तीनही संस्थांच्या एकत्रीकरणामुळे संस्थेच्या प्रगतीला मदत झाली. विधवा नसलेल्या मुली व स्त्रिया यांच्या शिक्षणाचे मार्ग खुले झाले.

या मार्गांचा अधिक विस्तार व्हायचा होता.

१९१५च्या ऑगस्ट महिन्यातील सकाळ. कर्वे प्राध्यापकपदावरून मुक्त झाले होते. आता ते बराचवेळ आश्रमाला देत. रोजचं टपाल बघत होते. एकेक पत्र उलगडून वाचत होते. एक जाड लिफाफा हाती आला. उघडला. वाचू लागले. त्यामध्ये जपानमधील महिला विद्यापीठाची माहिती होती. आणि अण्णांच्या कल्पनाशक्तीला अधिक चालना मिळाली. विधवाश्रम झाला. अनाथ बालिकाश्रम झाला, महिला विद्यालय आकारास आले. निष्काम कर्म मठाच्या रुपाने कार्यकर्ते मिळाले. संस्थांचे एकत्रीकरण करून महिलाश्रम तयार झाला. पण विद्यापीठ?

महिलांसाठी विद्यापीठ?

ही कल्पनाच वेगळी होती. जपानमधील महिला विद्यापीठाच्या माहितीपत्रकाच्या वाचनाने या कल्पनेचे बीजारोपण झाले. उच्च शिक्षणाबाबत समाजाचा महिलासंबंधी दृष्टिकोन हा एक प्रश्न तर होताच, पण शिक्षणाच्या माध्यमाबाबतचा प्रश्नाही तितकाच महत्त्वाचा होता. मातृभाषेतून उच्च शिक्षणाची सोय होणे महिलांच्या दृष्टीने हितकर होते. याबाबतही ठोस पावले उचलणे आवश्यक आहे, असे कर्वे यांना वाटले. यासाठी महाराष्ट्र महिला विद्यापीठ स्थापन करणे हे कर्वे यांचे स्वप्न होते. ते स्वप्न त्यांनी साकार केले. महिला विद्यापीठाची स्थापना झाली आणि...

अनाथबालिकाश्रम ते महिलाविद्यापीठ असा कर्वे यांच्या स्वप्नाचा विस्तार झाला. अनाथबालिकाश्रमाचं लावलेलं इवलंसं रोप ... महिला विद्यापीठाच्या रूपानं या रोपाचा वेल गगनावरी गेला...

# स्वप्न : पूर्ती आणि विस्तार

'महर्षी कर्वे हे पदवीनं नंतर महर्षी झाले. पण कार्याच्या रूपानं ते सुरुवातीपासूनच महर्षी होते. या महर्षीनं एक स्वप्न पाहिलं. हे स्वप्न सत्यात उतरविण्यासाठी त्यानं अथक परिश्रम केले. अनाथबालिकांना आणि विधवांना शिक्षणाद्वारे समाजात प्रतिष्ठा प्राप्त  करून देण्याच्या रूपानं या स्वप्नाची सुरुवात झाली. सर्वसामान्य मुलींनाही शिक्षण मिळालं पाहिजे या उद्देशानं महिला विद्यालयाची स्थापना झाली. पण एवढ्यानं ही स्वप्नमालिका थांबली नाही. स्त्रीशिक्षणाचं पताकास्थान म्हणजे महिला विद्यापीठ. अनेकांच्या मनात असा प्रश्न होता की १८५७ सालीच भारतात विद्यापीठांची स्थापना झाली होती. मुंबई विद्यापीठ होतेच. या विद्यापीठात स्त्रियांना उच्च शिक्षणासाठी मज्ञाव होता असे नाही. मग कर्वे यांना महिलांसाठी वेगळे विद्यापीठ असावे असे का वाटू लागले?

आपल्या आत्मवृत्तात कर्वे यांनी स्त्रीशिक्षणाबाबत आपली तात्त्विक भूमिका स्पष्ट केली आहे.
त्यांनी मांडलेले मुद्दे असे-

- स्त्रिया म्हणजे मानवजातीचे घटक व स्वत्वविशिष्ट व्यक्ती  आहेत हे ओळखून त्यांना शिक्षण द्यावे.
- सुपत्नी व सुमाता होण्याची पात्रता स्त्रियांच्या अंगी येईल असे शिक्षण त्यांना देणे.
- आपल्या प्रापंचिक जीवनाचा राष्ट्राच्या उन्नति-अवनतीशी, अस्फुट असला तरी, निकट संबंध आहे असे त्यांच्या नेहमी ध्यानात राहील अशा प्रकारचे शिक्षण त्यास देणे.

निरनिराळे पाश्चात्य व पौर्वात्य विचारवंत, शरीरशास्त्रज्ञ, डॉक्टर, वंशशास्त्रज्ञ यांचे स्त्रीपुरुषभेदासंबंधी व समानतेसंबंधी विचारांचे समालोचन करून कर्वे यांनी याबाबत भूमिका तयार केली. स्त्रियांना वेगळ्या शिक्षणाचीच गरज आहे येथपासून स्त्रियांना वेगळेच काय, पण कुठलेच शिक्षण असण्याची मुळीच गरज नाही असे विविध वादीसंवादी सूर त्याकाळी समाजात प्रचलित होते. या सर्व विचारांचा ऊहापोह करून कर्वे यांनी स्त्रियांच्या उच्चशिक्षणाबाबत आपली चार प्रमेये मांडली.

- आपण जबाबदार मानवी व्यक्तीआहोत ही भावना व आपल्या सामर्थ्याविषयी आत्मविश्वास ज्याच्या योगाने उत्पन्न होईल असे पुरुषसामान्य शिक्षण स्त्रियांना देणे.
- स्त्रिया या कुटुंबाच्या सूत्रधार असतात. 'गृहिणी गृहमुच्यते' यातील गर्भितार्थाप्रमाणे तशी गृहिणी बनविण्याचे सामर्थ्य ज्या शिक्षणाच्या योगाने स्त्रियांमध्ये उत्पन्न होईल असे शिक्षण त्यांना देणे.
- आपण राष्ट्राचा घटक आहो ही भावना ज्या शिक्षणाने उत्पन्् होईल असे शिक्षण स्त्रियांना दिले पाहिजे.
- काही कारणांनी आपण संसारात पडू नये असे ज्या स्त्रियांना वाटत असेल त्यांनी आपापली ध्येये ठरवून, ती साध्य होण्याला ज्या शिक्षणाची जरूर असेल, ते शिक्षण त्यांना दिले पाहिजे. अशा स्त्रियांचा लहानसा वर्गही राष्ट्राच्या स्थैर्याला व प्रगतीला आवश्यक आहे. कोणत्याही स्त्रीला आपण

अमुक विद्या शिकावी असे वाटून, अमुक उद्योग करावा असे वाटत असेल, तर कायद्याची अथवा समाजाची बंधने तिच्या मार्गात आडवी येऊ नयेत. सामान्यतः स्त्रियांनी कोणते शिक्षण घ्यावे याविषयी विचार होणे अत्यंत गरजेचे आहे. त्या विचारांचे प्रतिबिंब कृतीत उठविणारी माणसे तयार झाली पाहिजेत. अशा विचारांच्या व कृतीच्या झगड्यातूनच उत्क्रांतीची वाट गेली पाहिजे.

निष्काम-कर्म-मठ या चळवळीत सहभागी असणारे श्री. महादेव गाडगीळ यांनी महिला विद्यापीठाच्या कार्यासाठी पहिली दहा हजार रुपयांची देणगी देण्याचे ठरविले. 'महाराष्ट्र वुइमेन्स युनिव्हर्सिटी' ही स्थापन होऊन तिचे पहिले कॉलेज हिंगणे येथे असावे अशी गाडगीळ यांनी इच्छा व्यक्तकेली. याच सुमारास राष्ट्रीय सामाजिक परिषदेचे अधिवेशन मुंबईत भरले. परिषदेचे सरचिटणीस होते सर नारायण चंदावरकर. परिषदेचे अध्यक्ष म्हणून कर्वे यांची निवड झाली. राष्ट्रीय सामाजिक परिषदेचे अध्यक्ष या नात्याने कर्वे यांनी महिलाशिक्षणाविषयी आपलेमूलभूत विचार अत्यंत तळमळीने मांडले. स्त्रियांच्याबाबतीत शिक्षणाची गरज, महत्त्व, नैतिक अधिष्ठान, संधी, उपेक्षा, व्यक्तिमत्त्वविकास, शिक्षणाचे माध्यम इ. अनेक मुद्यांना स्पर्श करून, स्त्रीशिक्षणाविषयी आस्था असणाऱ्यांना मोठेच खाद्य पुरविले. स्त्रीशिक्षणाविषयी ज्यांची मते प्रतिकूल होती, त्यांची मते काही प्रमाणात अनुकूल होण्याचा मार्ग खुला झाला.

हे भाषण काही लोकांना इतके आवडले की, कर्वे यांना परदेशातील ब्रॅडफर्ड येथील मुलींच्या शाळेच्या मुख्याध्यापिका कु. मार्गारेट इ. रॉबर्ट्स् यांचे एक पत्र आले. त्यांनी त्यांच्या भाषणाच्या दीडशे प्रतींची मागणी केली होती. आपल्या देशातील शिक्षणसंघटनेच्या सदस्यांना वाटण्यासाठी त्या प्रती त्यांना हव्या होत्या. येणारा खर्चही देण्याची तयारी त्यांनी दाखविली.

राष्ट्रीय सामाजिक परिषदेहून कर्वे पुण्याला परतले. आता काही ठोस पावले उचलण्याचा त्यांनी निर्धार केला होता. फर्ग्सन महाविद्यालयात आपल्या मित्रमंडळींची एक बैठक त्यांनी घेतली. कर्वे यांच्या या कल्पनेला विरोधासाठी नव्हे, पण सावधगिरीचा इशारा म्हणून परांजपे यांनी प्रतिकूल मत व्यक्त केले होते. डॉ. र. पु. परांजपे त्यांचे आप्त. म्हणूनच कर्वे यांच्या चळवळीविषयी त्यांना जी काळजी वाटत होती, ती त्यांनी उघडपणे व्यक्त केली. "जाणीवपूर्वक उत्क्रांती साध्य करताना घाई टाळणे आवश्यक असते"असे परांजपे म्हणाले. फर्ग्सनमधील बैठकीला डॉ. परांजपे, हरिभाऊ आपटे यांच्याबरोबरच प्रा. केशवराव कानिटकर, लिमये इ. सहानुभूत व्यक्ती उपस्थित होत्या. महाराष्ट्र महिला विद्यापीठ स्थापन करण्याची कल्पना या बैठकीत मान्य करण्यात आली. प्रा. कानिटकरांनी सभा संपताच या कार्यासाठी तीनशे रुपयांची देणगी दिली.

यानंतर या योजनेला अंतिम स्वरूप देण्यापूर्वी कर्वे यांनी विविध क्षेत्रांतील व्यक्तींच्या भेटी घेतल्या. गव्हर्नर जनरल यांच्या कार्यकारी मंडळातील शिक्षणविषयक सदस्य सर शंकरन नायर, डॉ. अनी बेझंट, गुरुवर्य रवींद्रनाथ टागोर, शेफिल्ड विद्यापीठाचे डॉ. फिशर यांच्यासमवेत त्यांनी चर्चा केली. रवींद्रनाथ टागोर यांना तर ही कल्पना खूप आवडली. त्यांनी स्वतः दीडशे रुपये देणगी दिली. भारताच्या उन्नतीसाठी कार्य करणारे सर विल्यम वेडरबर्न हे 'इंडिया बेनिफिट फंड' या निधीद्वारे हे काम करीत असत. श्री. वेडरबर्न यांनाही कर्वे यांनी आपल्या महिला विद्यापीठ उपक्रमाची माहिती दिली होती. वेडरबर्न यांच्या देहावसानंतर या निधीतून अनाथबालिकाश्रमासाठी १५० पौंड आणि भारतीय महिला विद्यापीठासाठी १०० पौंड देणगी मिळाली.

अनुक्रमणिका

इंडियन सोशल रिफॉर्मरचे संपादक श्री. नटराजन यांनी मात्र कर्वे यांच्या या कल्पनेला प्रथमपासून विरोध केला होता. नटराजन यांनी एका लेखात लिहिले होते-

“अनाथबालिकाश्रमाला जे स्थान लाभले आहे, ते कर्वे यांचा असीम त्याग व त्यांची तळमळ यामुळे. पण असा एखादा उपक्रम पुढे चालविताना यशाऐवजी प्रगतीच्या मार्गात अडथळेच निर्माण होण्याची शक्यता आहे. महिला विद्यापीठाची नवी योजना यश मिळण्याच्या लायकीची नाही.”

म.गांधी यांचीही पुणे येथे कर्वे यांनी भेट घेतली. महिला विद्यापीठातील शिक्षण मातृभाषेत देणार असल्याबद्दल म. गांधी यांनी प्रथम कर्वे यांचे अभिनंदन केले. मात्र गांधीजी यांना ‘इंग्रजी विषय सक्तीचा’ ही कल्पना आवडली नाही. इंग्रजी हा ऐच्छिक विषय असावा असे म. गांधी यांचे दृढ मत होते. कर्वे मात्र इंग्रजी विषय सक्तीचा ठेवण्याबाबत आग्रही होते. कर्वे यांनी म. गांधी यांना मृदु आवाजात सांगितले-

“इंग्रजी हा विषय ऐच्छिक असावा असा आपला आग्रहच असेल, तर आपल्या सहानुभूतीवाचून हा प्रकल्प सुरू करणे हे आम्ही आमचे दुर्दैव समजू.”गांधीजी म्हणाले-

“तुम्ही आहात म्हणून मी माझ्या मताचा आग्रह धरीत नाही. मात्र माझे मत तेच आहे.”या संकल्पित विद्यापीठासाठी म. गांधी यांनी द. म. १० रु. वर्गणी देण्याचे ठरविले. म. गांधी यांच्यासमवेत कर्वे अहमदाबाद येथे गेले आणि त्यांनी तेथील सभेत महिला विद्यापीठाची माहिती दिली.

या कार्याच्या प्रचारासाठी विविध ठिकाणी प्रवास करून कर्वे यांनी विविध क्षेत्रातील व्यक्तींच्या भेटी घेतल्या. सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचे श्रीनिवास शास्त्री यांची मद्रास इथे भेट घेतली. ‘हिंदु’ या इंग्रजी दैनिकाचे संपादक कस्तुरी रंगा अय्यर यांचा पाठिंबा मिळाला. कलकत्ता, लाहोर, जालंधर या ठिकाणीही त्यांनी आपल्या या कार्याचा प्रसार केला. कर्वे यांचे अन्य सहकारीही बाहेर पडले. वेणूताई नामजोशी विदर्भ आणि मध्यप्रांतात गेल्या, पार्वतीबाई आठवले यांनी बेळगाव, धारवाड, हुबळी, गदग या कर्नाटकातील शहरांना भेटी दिल्या. कृष्णाबाई ठाकूर यांनी मध्यभारतात प्रचार केला. विद्यापीठ स्थापन करण्यासाठी सुमारे १२०० मतदारांचा पदवीधर संघ तयार झाला.

कर्वे पुण्याला परत आले आणि नियोजित विद्यापीठासाठी त्यांनी सेनेटच्यानिवडणुकीचे आयोजन केले. विद्यापीठाच्या सेनेट ( अधिसभा) वर ६० सभासद निवडून आले. यापैकी ५ महिला होत्या. महिला विद्यापीठीच्या अधिसभेची पहिली बैठक ३ व ४ जून १९१६ रोजी झाली. विद्यापीठाचे पहिले कुलगुरु म्हणून कर्वे यांचे मार्गदर्शक व गुरु डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांचे नाव त्यांच्या मनात आले. डॉ. भांडारकर कुलगुरु आणि उपकुलगुरु म्हणून डॉ. र. पु. परांजपे ही नावे निश्चित झाली. परांजपे यांचा या योजनेला आधी विरोध होता. तरी नंतर त्यांनी पदवीधर मतदार यादीत आपले नाव नोंदवले आणि ५०० रु. देणगीही दिली.

जपानमधील महिला विद्यापीठासंबंधी, ज्या कोणा अज्ञात व्यक्तीने केवळ माहितीसाठी, जे परिपत्रक पाठवले होते ते या विद्यापीठाचे उगमस्थान होते. या पत्रकाने जी स्फूर्ती दिली ती कर्वे कधीही विसरले नाहीत. प्रत्येक वार्षिक अहवालात या पत्रकाची दखल घेण्यात येत असे. यातूनच पुढे नावारुपाला

अनुक्रमणिका

आलेले महिला विद्यापीठ ३ जून १९१६ रोजी भारतातील पहिले महिला विद्यापीठ म्हणून आकारास आले. भारतात महिलांच्या उच्चशिक्षणाबाबत नवे क्रांतिपर्व सुरू झाले.

६ जुलै १९१६!

नवे महाविद्यालय सुरू झाले. पहिले प्राचार्य म्हणून विद्यापीठाच्या सेनेटने कर्वे यांचीच नियुक्ती केली. पण कर्वे यांना निधी संकलन व कार्यप्रसार यासाठी बरेच हिंडावे लागणार होते. हिंगणे येथे राहून प्राचार्यपद सांभाळणे आणि कार्यप्रसार ही दोन्ही कामे होणे अवघड होते. म्हणून प्राचार्यपदी ना. म. आठवले यांची नियुक्ती झाली. विद्यापीठाचे रजिस्ट्रार म्हणून ह. रा. दिवेकर यांचे नाव निश्चित झाले. महाविद्यालयातील प्रथम वर्षात महिलाश्रमातीलच चार मुलींना परीक्षा घेऊन प्रवेश देण्यात आला. मुंबई विद्यापीठातून मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झालेली रेवती केतकर ही विद्यार्थिनीही या महाविद्यालयात आली.

कर्वे यांनी विद्यापीठाच्या प्रसारासाठी आपली भ्रमणयात्रा सुरू ठेवली. गावोगाव दौरे केले. अविश्रांत श्रम व अथक कार्य यामुळे स्थापनेपासून केवळ चार वर्षांच्या कालखंडात विद्यापीठाकडे दोन लाख सोळा हजार एक्केचाळीस रु. पासष्ट पैसे इतकी जमा होती. अनेक श्रीमंत, बरेच मध्यमवर्गीय आणि काही सामान्य व्यक्तींनीही या कार्यासाठी आपुलकीने मदत केली.

पहिल्या चार वर्षांत विद्यार्थिनींची संख्या मात्र फारशी वाढली नाही. १९१९ मध्ये विद्यापीठाची पहिली पदवीधर विद्यार्थिनी बाहेर पडली. १९२० मध्ये ही संख्या केवळ तीनच होती.

विद्यापीठाच्या प्रगतीबाबत काही तांत्रिक व बऱ्याच आर्थिक अडचणी होत्या. सरकारकडून या विद्यापीठाला अजून अधिकृत मान्यता मिळालेली नव्हती. आणि विद्यापीठाच्या पदवीला समाजात व व्यवहारी जगतात मानमान्यता नव्हती.

विद्यापीठाची प्रगती गजगतीने नव्हे तर मुंगीच्या पावलांनी चालली होती. काही मुलींनी तर महिलाश्रम सोडून हुजुरपागेच्या शाळेत प्रवेश मिळविला होता. त्या मुली विद्यापीठाकडे येणाऱ्यांपैकी होत्या.

असे असले तरी कर्वे हे नाउमेद होणाऱ्यांपैकी नव्हते. परदेशातील अनेक देणगीदारांनी त्यांच्या या कार्यासाठी लहानमोठ्या देणग्या दिल्या. डॉ. विठ्ठल राघोबा लांडे हे युगांडा येथे असत. त्यांच्या मृत्यूपत्रातील इच्छेनुसार कर्वे यांना ४०,००० रु. त्यांच्या विश्वस्तांनी पाठवून दिले. ही गोष्ट १९१७ सालातील होय. अशा काही आश्वासक घटनांमुळे कर्वे यांचा उत्साह वाढत गेला.

आता अण्णासाहेब कर्वे साठीकडे झुकले होते. १८ एप्रिल १९१८ रोजी कर्वे यांची एकसष्ठी करावी अशा विचारांनी अनेक व्यक्ती प्रेरित झाल्या. स्त्रीला मानाचं स्थान मिळावं म्हणून साठीतही उत्साहानं व निरपेक्षपणे काम करणाऱ्या अण्णांचा देशभर वेगळ्या पद्धतीने गौरव व्हावा असे अनेकांना वाटत होते. त्याकाळी लोकप्रिय असलेलं मासिक मनोरंजन यांचे संपादक का. र. मित्र यांनी कर्वे यांच्यासंबंधी एक विशेषांक प्रकाशित केला. या विशेषांकात अण्णासाहेब कर्वे यांच्या जीवनचरित्राबरोबरच त्यांच्या कार्याचा विस्तृत आलेख देण्यात आला होता.

कर्वे यांनी महिलांच्या उच्च  शिक्षणासाठी जे विविधांगी प्रयत्न केले ते आधी लोकांना स्वप्नवत् वाटत होते. पण या स्वप्नाचे सत्यात रुपांतर झाले हे दिसले आणि त्यांचे डोळे दिपले. कर्वे यांनी याबाबत काही विशेष प्रयोग केले. उदा. पार्वतीबाई आठवले यांना इंग्रजी भाषेच्या विशेष प्रशिक्षणासाठी त्यांनी इंग्लंड व अमेरिका इथं पाठविण्याचा घाट घातला. ४६ वर्षांच्या आजी असलेल्या पार्वतीबाई आठवले ५ ऑक्टोबर १९१८ रोजी जपानमार्गे अमेरिकेला गेल्या. सुरुवातीला पार्वतीबाईंनाही क्षणभर वाटले की, आपण अंधारात उडी घेत आहोत. पण ही अंधारातली उडी लख्ख प्रकाश देणारी ठरली.

कर्वे यांच्या एकसष्टाव्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्रातील महिलांनी कर्वे यांना एक थैली दिली. या थैलीतील २५०० रु. मध्ये स्वतःचे २०० रु. भर घालून हे सर्व पैसे कर्वे यांनी पार्वतीबाई आठवले यांना प्रवासखर्चासाठी दिले. पार्वतीबाईनी अमेरिकेहून परतताच आपल्या विधवाश्रमाच्या कार्याला पुन्हा वाहून घेतले.परदेशातील व्यापक अनुभवांचा फायदा त्यांनी कर्वे यांच्या संस्थेला करून दिला.

अण्णासाहेबांची साठी सर्वत्र निरनिराळ्या प्रकारे साजरी करण्यात आली. विद्यापीठाची कल्पना मूर्त स्वरूपात साकारली होती. तरीही अजून हा वृक्ष बहरायचा होता. त्याला डौलदार व्हायचं होतं. त्याला आणखी खतपाण्याची आवश्यकता होती.

मुंबई नगरीत अनेक दानशूर गर्भश्रीमंत होते. त्यांच्या उदारतेतून मुंबईत व महाराष्ट्रात काही संस्थांना जीवनसत्त्व मिळालेले होते. अशांपैकीच एक होते सर विठ्ठलदास ठाकरसी. ठाकरसी यांनी आपल्या मातुःश्रीच्या नावे शिष्यवृत्त्या देण्यासाठी विद्यापीठाकडे दरसाल एक हजार रुपये देणे मान्य केले होते. सर विठ्ठलदास ठाकरसी, त्यांचे कुटुंबीय व काही मित्रमंडळी परदेशपर्यटनास जाणार होती. कर्वे विद्यापीठासाठी मदत मागायला त्यांच्याकडे गेले होते. त्यांच्या मागणीवरून कर्वे यांनी आश्रमातीलच सीताबाई अण्णेगिरी यांना या गटाबरोबर प्रवासास पाठविले. ही सर्व मंडळी चीन व जपान या देशांत जाऊन आली. त्यांनी टोकियोतील महिला विद्यापीठाला भेट दिली. सातशे विद्यार्थिनी विद्यापीठाला जोडून असलेल्या वसतिगृहात राहून शिक्षण घेत होत्या. ठाकरसी मंडळींना ही गोष्ट भावली. त्यांच्याही मनात यासंबंधी विचारचक्र सुरू झाले. परतीच्या प्रवासात बोटीवर सीताबाई अण्णेगिरी यांच्याशीही त्यांनी चर्चा केली. कर्वे यांच्या महिला विद्यापीठाच्या विद्यमानस्थितीविषयी माहिती घेतली.

ठाकरसी परतले तेव्हा त्यांना भेटण्यासाठी कर्वे बंदरावरच गेले होते. ठाकरसी यांनी कर्वे यांना मुद्दाम वेगळ्या वेळी पाचारण केले आणि महिला विद्यापीठाच्या विकासासाठी उदार देणगी देण्याचा मनोदय व्यक्त केला. कर्वे त्यांना भेटले. आणखी एकदा महाबळेश्वरला जाऊन भेटले तेव्हा त्यांच्याबरोबर डॉ. परांजपे आणि प्रिं. केशवराव कानिटकर हेही होते. या बैठकीत असे ठरले की, सर विठ्ठलदास ठाकरसी आणि त्यांचे वारस यांनी विद्यापीठाला प्रतिवर्षी साडेबावन हजार रु. निरंतर देत रहावे. याशिवाय विद्यापीठाचे नाव ‘श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी भारतवर्षीय महिला विद्यापीठ’ असे ठेवावे असे ठरले. पुण्यात ताबडतोब एक हायस्कूल सुरू करणे, हिंगण्याचे कॉलेज लवकरच शहराच्या जवळ नेऊन तेथे वसतिगृह सुरू करणे, शक्य तितक्या लवकर मुंबईस एक कॉलेज काढून त्यात मराठी व गुजराती या दोन शाखा सुरू कराव्यात. सेनेटच्या सभा शक्यतो मुंबईत आयोजित कराव्यात, पुण्यातले हायस्कूल व पुण्यातली शाळा यांना अनुक्रमेश्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी कन्याशाळा व श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला पाठशाळा अशी नावे द्यावीत. ठाकरसी वा त्यांचे वारस यांनी सूचित केलेले पाच सदस्य सेनेटवर असावेत अशा स्वरूपाच्या अटी मान्य करण्यात आल्या.

सर विठ्ठलदास ठाकरसी यांच्याप्रमाणेच त्यांचे स्नेही मूलराज खटावशेठ यांच्याकडून ३५,००० रु. ची देणगी मिळाली. पुण्यातील महाविद्यालयाला जोडून वसतिगृह बांधण्यासाठी या देणगीचा उपयोग करता आला. नव्या शाळेची स्थापना करून असलेल्या शाळा विद्यापीठाला जोडून घेणे हे कार्य आता कर्वे यांना लगोलग करावयाचे होते. मुंबईच्या वनिता विश्राम या संस्थेला विद्यापीठाला जोडून घेणे हे कार्य आता कर्वे यांना लागोलाग करावयाचे होते. मुंबईच्या वनिता विश्राम या संस्थेने विद्यापीठाला आपली शाळा संलग्न करण्यास संमती दिली. सातारा येथेही मुलींची शाळा स्थापन करण्यात आली. विद्यापीठाच्या पदवीधर विद्यार्थिनीला 'गृहितागमा' अशी पदवी दिली जात होती. विद्यापीठाच्या विकासासाठी महाराष्ट्रभर मुलींच्या शाळाचे जाळे तयार झाले. बेळगाव व सांगली इथं शाळा सुरू झाल्या.

'श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठ' या विद्यापीठाला केवळ महाराष्ट्रापुरतीच समाजमान्यता न राहता त्याला देशपातळीवर समाजमान्यता मिळावी यासाठी कर्वे आता प्रयत्नशील होते. विद्यापीठाला भारतीय महिला विद्यापीठ असे जे नाव देण्यात आले होते, ते त्यामुळेच. अहमदाबादमधील स्त्री केळवणी मंडळी या संस्थेने आपली शाळा विद्यापीठाशी संलग्न केली. १९२२ मध्ये सुरतचे महिला विद्यालय विद्यापीठाला जोडण्यात आले. १९२७ साली भावनगरचे महिला विद्यालय एस. एन. डी. टी. या विद्यापीठाशी संलग्न झाले. देशभर विद्यापीठाचे नाव झाले.

विद्यापीठाचा वेलविस्तार आता चांगलाच वाढला. विद्यापीठाचे संघटक या नात्याने कर्वे यांनी आपले कार्य अखंडपणे सुरू ठेवले होते. विद्यापीठाच्या कुलसचिवांनी आपल्या एका वार्षिक अहवालात विलक्षण आत्मविश्वासाने लिहिले होते-

"महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठ असणे इष्ट आहे किंवा नाही हा प्रश्न विचारण्याची आता गरजच उरली नाही. हा प्रयोग यशस्वी करण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले जात आहेत."

महिला विद्यापीठाला जोडलेल्या शाळांतून किमान वेतनावर काम करण्यासाठीकर्वे यांनी महिला कार्यकर्त्यांना प्रवृत्त केले. या सर्व कार्यात काही महत्त्वाच्या व्यक्ती  कर्वे यांच्यासमवेत होत्या. डॉ. रा. गो. भांडारकर, डॉ. र. पु. परांजपे हे शिक्षणतज्ज्ञ, सर महादेव चौबळ, सर लल्लुभाई शहा, सर चुन्नीलाल मेहता इ. नामंकित व्यक्ती विद्यापीठाच्या कार्याशी प्रथमपासून संबंधित होत्या.

महिला विद्यापीठातील स्त्रियांच्या वेगळ्या अभ्याक्रमाबाबत मात्र वेगवेगळी मते होती हे मागे नमूद केलेच आहे. स्त्रियांची मानसिकता, त्यांची जबाबदारी व त्यांचे कौटुंबिक स्थान या गोष्टींचा विचार करून स्त्रियांसाठी वेगळा अभ्यासक्रम असावा असे निश्चित केले गेले असले, तरी त्यामुळे कदाचित असा गैरसमज निर्माण झाला असता की, स्त्रियांचा बौद्धिक दर्जा पुरुषांच्या बौद्धिक दर्जाहून कमी असतो. हा समज नाहीसा होईपर्यंत वेगळा अभ्यासक्रम असू नये, असे मद्रास येथील सामाजिक सुधारणा परिषदेच्या अध्यक्षपदावरून बोलताना श्री. नटराजन हे संपादक म्हणाले.

महिला विद्यापीठाच्या उत्तम कार्याची दखल मुंबई प्रांताचे शिक्षणखातेही घेत होते. १९२५-२६ या वर्षी शिक्षणखात्याने या विद्यापीठाच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेहख करून लिहिले आहे-

"या प्रांतातील अनेक शाळा या विद्यापीठाशी संलग्न आहेत. या शाळांचे वैशिष्ट्य म्हणजे इंग्रजी विषय वगळता अन्य सर्व विषय या शाळांतून मातृभाषेतून शिकविले जातात."

अनुक्रमणिका

याशिवाय या खात्याच्या अहवालात कर्वे यांच्या कार्याचीही विशेष प्रशंसा केलेली आढळते ती अशी- "महिला शिक्षणाचा, विशेषतः प्रौढ-महिला-शिक्षणाचा विचार करता प्रा. धोंडो केशव कर्वे आणि गो. कृ. देवधर यांनी केलेल्या कार्याची प्रशंसाच करावी लागेल. प्रा. कर्वे यांनी तीस वर्षांपूर्वी स्थापन केलेल्या एका छोट्याशा वसाहतीचे आता एका भव्य विद्यापीठात रूपांतर झाले आहे. या विद्यापीठाचे वैशिष्ट्य म्हणजे तेथील माध्यम मातृभाषा असून मुलींच्या गरजा व परिस्थिती लक्षात घेऊन तेथील अभ्यासक्रम आखण्यात आला आहे. तसेच भारतीय जीवनातील साधेपणा कायम राखून अभ्यासक्रमाची आखणी करण्यात आली आहे."

१९१५ मध्ये कर्वे यांनी आपले आत्मवृत्त लिहून प्रसिद्ध केले होते. साठीपासून सत्तरीपर्यंत कर्वे यांनी आपल्या कार्यासाठी, वय झाले असूनही अथक प्रयत्न केले. १९२८ मध्ये त्यांनी आपल्या एका निवेदनात विचार व्यक्त केले आहेत-

"मी केलेले प्रयत्न अगदीच व्यर्थ ठरले नाहीत. उच्च आणि कनिष्ठ मध्यमवर्गीय लोकांकडून मिळालेल्या देणग्यांच्या जोरावर जगात स्थापन झालेले हे अशा प्रकारचे एकमेव विद्यापीठ आहे याचा मला अभिमान वाटतो."

कर्वे आता सत्तर वर्षांचे झाले. सुदैवाने त्यांच्या शरीरप्रकृतीने त्यांना चांगली साथ दिली होती. त्यांच्या ७१ व्या वाढदिवशी त्यांच्या स्त्रीशिक्षण संस्थेच्या आजीव कार्यकर्त्यांनी प्रा. कर्वे यांच्या आत्मचरित्राची दुसरी आवृत्ती छापून प्रसिद्ध केली. कर्वे यांनी स्वतः नव्या आवृत्तीत आणखी काही लेखन करून भर घातली. यासाठी जी प्रकरणे त्यांनी लिहिली त्यामध्ये महिला विद्यापीठ स्थापनेचा व त्याच्या प्रगतीचा सविस्तर इतिहास लिहिला. केवळ दोन महिन्यांच्या अवधीत केलेल्या या लेखनाच्या अखेरच्या भागात कर्वे यांनी आपल्या उदात्त भावना व्यक्त केल्या आहेत.

"पुनर्जन्माच्या कल्पनेत जर सत्य असेल व अंतकाळीच्या वासनेवर जर तो पुनर्जन्म अवलंबून असेल, तर जगपालकाने माझे या कार्यावरील प्रेम अधिकाधिक वाढवावे व जन्मोजन्मी मला या कार्यासाठी तनमनधन अर्पण करण्याची बुद्धी द्यावी अशी मी त्याचेजवळ याचना करतो."

अनाथबालिकाश्रमापासून महिला विद्यापीठापर्यंत कर्वे यांनी एकाहत्तराव्या वर्षांत पदार्पण करताना जे नेत्रदीपक कार्य केले त्याची कृतज्ञ दखल समाजानेही घेतली.

पुणे शहरात डेक्कन जिमखान्यावरील संभाजीपुलाच्या चौकापासून थेट एरंडवणे हिंगण्यावरून जाणारा जो रस्ता आहे त्या रस्त्याला कर्वे यांच्या एकाहत्तराव्या वाढदिवशी पुणे नगरपालिकेने 'महर्षी कर्वे पथ' असे नाव दिले. याच रस्त्यावरून अण्णा झोळी घेऊन हिंडले. चार चार आणे वर्गणीसाठी त्यांनी पायपीट केली. पेरुगेटापासून हिंगण्यापर्यंत रात्रीचे पायी गेले. सकाळी पायीच परत येत आले. कर्वे यांच्या प्रासादिक पदचिन्हांनी पावन झालेला हा कर्वे रस्ता म्हणजे मूळची महिला शिक्षणाची पायवाट आहे!

# साता समुद्रापलीकडे

सत्तरी ओलांडली. स्वप्न साकार झालं. कौटुंबिक जीवनही समाधानी होतं. एक पुत्र शंकरराव आफ्रिकेत स्थायिक झाले होते. सर्वात थोरले रघुनाथराव पॅरिस विद्यापीठातून गणिताची पदवी घेऊन मुंबईत विल्सन कॉलेजात नोकरी करीत होते. त्यांच्या संततिनियमन कार्याचा बराच बोलबाला होता. दिनकरराव डेक्कन एज्युकेशन सोसायटीतच आजीव सदस्य झाले. भास्करराव हे पुत्र महिलाश्रमाचे काम करू लागले. दिनकररावांच्या पत्नी इरावती यांनी महिला विद्यापीठाच्या रजिस्ट्रार म्हणूनही काम केले. भास्कररावांच्या पत्नी कावेरी याही संस्थेतच शिक्षिका म्हणून काम करू लागल्या. भारतातील विविध ठिकाणी अण्णांनी संस्थाविकासासाठी प्रवास केला होता. पण अजून ते दर्यापार गेले नव्हते.

प्रिं. ना. म. आठवले आणि अन्य सहकारी यांनी अण्णांना सुचविले की, त्यांनी परदेशात जाऊन प्रचारकार्य करावे. महिला विद्यापीठाच्या चालकांनी अण्णांसाठी प्रावसखर्च म्हणून पाच हजार रुपये मंजूर केले. अण्णांचे धाकटे चिरंजीव भास्करराव याच सुमारास लीड्स विद्यापीठीत एम. एड. पदवीचा अभ्यास करीत होते. प्रा. हरिभाऊ दिवेकर हेही पॅरिसमध्ये डॉक्टरेट पदवीसाठी संशोधन करीत होते. सूनबाई इरावती कर्वे या जर्मनीत बर्लिनमध्ये डॉक्टरेटसाठी अभ्यास करीत होत्या. डॉ. र. पु. परांजपे हे लंडनमध्ये इंडिया कौन्सिलचे सभासद म्हणून वास्तव्यास होते. असे सर्व गणगोत परदेशात असतानाच परदेशी जाणे योग्य म्हणून अण्णांनी जाण्याचे निश्चित केले.

आपल्या प्रवासाचा हेतूही अण्णांनी निश्चित केला होता. स्थलदर्शन किंवासौंदर्यानुभूती हा हेतू ठेवलाच नव्हता. अनाथबालिकाश्रम व महिला विद्यापीठ यांच्या कार्याचा प्रचार आणि आर्थिक मदत मिळविणे हाच हेतू ठेवून अण्णांनी प्रवासयोजना तयार केली.

१६ मार्च १९२९ रोजी रावळपिंडी बोटीने श्रीमती कमलाबाई देशपांडे ( तात्यासाहेब केळकर यांची कन्या ) यांच्यासह अण्णा मुंबईहून इंग्लंडला जाण्यासाठी निघाले. हैद्राबादचे न्या. मू. केशवराव नाईक हेही बोटीवर होते. फ्रान्समधील मार्सेल्स बंदरावर उतरून पॅरिसमार्गे अण्णा लंडनला गेले. इंग्लंड, फ्रान्स, आयर्लंड, स्कॉटलंड इ. देशांमध्ये विविध संस्थांना त्यांनी भेटी दिल्या. महत्त्वाच्या व्यक्तींच्या गाठीभेटी घेतल्या. ऑक्सफर्ड, केंब्रिज, लीड्स येथील नामांकित विद्यापीठांना भेटी दिल्या. विख्यात शास्त्रज्ञ व तत्त्वज्ञ डॉ. आइन्स्टाइन यांची बर्लिनमधील भेट अविस्मरणीय ठरली. डेन्मार्कमधील एल्सिनार येथील आंतरराष्ट्रीय शैक्षणिक संमेलनाला ते उपस्थित राहिले. पॅरिसमध्ये स्त्रियांसाठी असलेले एक प्रशस्त वसतिगृह त्यांनी पाहिले. युरोपच्या दौऱ्यात पाच महिन्यांत सुमारे पन्नास शहरांना त्यांनी भेटी दिल्या. व्याख्याने दिली. सुमारे ४० शिक्षणसंस्थांचे निरीक्षण केले. साडेबारा हजार रु. आर्थिक मदत मिळविली. यानंतर त्यांचा अमेरिकेचा प्रवास सुरू झाला. युरोपातील प्रवास संपवून रिलायन्स बोटीने ते अमेरिकेकडे निघाले. अण्णा न्यूयॉर्कला पोचले. ते पोचण्यापूर्वीच तेथील वृत्तपत्रांतून त्यांचे फोटो व त्यांची माहिती आली होती. जिनिव्हा येथील एका परिषदेलाही अण्णा यापूर्वीच उपस्थित होते. या परिषदेत जगाच्या विविध भागांतून पंधराशे प्रतिनिधी आले होते. जिनिव्हा परिषदेला अमेरिकेतील एक गोगटे नावाचे गृहस्थ उपस्थित होते. त्यांनी अमेरिकेत इंटरनॅशनल हाऊसमध्ये अण्णांची उतरण्याची सोय केली. रॉकफेलर यांच्या उदार देणगीतून ही संस्था स्थापन झालेली आहे. ५७ राष्ट्रांतले ६०० विद्यार्थी त्यावेळी तिथं रहात होते. हिंदुस्थानातीलही वीस विद्यार्थी होते. त्यामध्ये पुण्याचे फर्ग्सनचे पी. व्ही. बापट आणि पुण्याच्याच मैनाताई शहाणे होत्या. अमेरिकेतील प्रवासात त्यांना अनेक महाराष्ट्रीय मंडळी भेटली. त्यांच्यातर्फे

अमेरिकेत असलेल्या परप्रांतीय भारतीयांच्या ओळखी झाल्या. अमेरिकेतील प्रवासात शैक्षणिक गोष्टीबरोबरच सामाजिक बाबींकडेही अण्णांचे लक्ष वेधले गेले. अमेरिकेत सर्रास आंतरदेशीय व आंतरप्रांतीय विवाह होतात हे त्यांना दिसून आले. विद्यापीठाच्या कामातून मुक्त झाल्यावर अशाच प्रकारचे काम करायचे त्यांनी ठरविले होते. 'समता-संघ' या संस्थेद्वारे अशा आंतरदेशीय व आंतरप्रांतीय विवाहांचा पुढे अण्णांनी बराच पुरस्कार केला.

युरोप व अमेरिकेत लोक अत्यंत शिस्तीने वागतात व स्वच्छता पाळली जाते हे त्यांना विशेष जाणवले. तेथून भारतात आपले नातेवाईक, मित्र, परिचित यांना अण्णांनी जी पत्रे लिहिली. त्यापैकी एका पत्रात ते आवर्जून लिहितात-

"कोणी रस्त्यात थुंकावयाचा नाही. नाक शिंकरणार नाही; किंवा केरकचरा टाकणार नाही. प्रत्येकाजवळ हातरुमाल असतो. व विशेषप्रसंगी नाक शिंकरणे, थुंकणे त्यातच करून घरी गेल्यावर तो बदलतात. रेल्वेच्या तिकिट ऑफिसाजवळ किंवा नाटकसिनेमागृहात गर्दी झाली, तर मागून येणारे धटिंगण कोपरखळ्या मारीत पुढे जाण्याची धडपड करावयाचे नाहीत. ते जसे येतील तसे रांग करून उभे राहतील. अशा शेकडो लोकांच्या रांगा लागलेल्या असतात. गाडी चुकत असली किंवा खेळ सुरू झालेला असला तरी आपली पाळी येईल तेव्हाच तिकिटे घेतात."

दुसऱ्या एका पत्रात इंग्लंडमधील श्रीमंतांची मुले आणि अमेरिकेतील श्रीमंतांची मुले यांतील फरक दाखवून अमेरिकेत 'श्रमप्रतिष्ठा' कशी रुजली आहे याबद्दल ते लिहितात-

"इंग्लंडात श्रीमंतांचे मुलगे वडिलांच्या संपत्तीच्या बळावर बहुधा आढ्यतेने वागणारे आढळायचे. अमेरिकेतील श्रीमंतांची मुले पुष्कळवेळा आपल्या पायावर उभे राहण्याचा प्रयत्न करून, टक्केटोणपे खाऊन जगाचा अनुभव मिळवतात. ज्ञानसंपादन करतात. कित्येक वेळा रस्त्यात हिंडून वर्तमानपत्रे विकणारा, विद्यार्थ्यांच्या वसतिगृहात वाढण्याचे किंवा भांडी विसळण्याचे काम करणारा अथवा फळांचा हंगाम आला असता फळझाडांवरून फळे वेचून काढणारा मुलगा एखाद्या कोट्यधीशाचाही असू शकेल. असे करण्यात त्या मुलाला कोणताही कमीपणा वाटत नाही व त्यांची आईबापेही अशा कामी मुलाला उत्तेजनच देतात. आमच्या देशातील श्रीमंतांच्या मुलांनी अनुकरण करण्यासारखी ही गोष्ट आहे."

सार्वजनिक कार्यात स्त्रिया मोकळेपणाने भाग घेतात. काही स्त्रिया समाजकार्याच्या ध्येयाने प्रेरित होऊन अविवाहित राहतात ही बाब कर्वे यांना विशेष भावली. 'इंटरनॅशनल असोसिएशन फॉर पीस अँड फ्रीडम' ही आंतरराष्ट्रीय स्वरुपाची संस्था स्त्रियांनीच चालविलेली होती. तिच्या शाखा सर्वत्र होत्या. स्त्रियांच्याया कामगिरीचे अण्णांना खूप कौतुक होते. लॉस एंजल्सच्या अवतीभोवती ३, ४ ठिकाणी आणि नंतर सॅनफ्रॅन्सिस्कोला कर्वे गेले. तिथं जवळच असलेल्या मिल्स कॉलेजमध्ये पुढे सीताबाई अण्णेगिरी शिकल्या. त्यांनी तिथंच गृहशास्त्रात बी. ए. पदवी मिळविली. अण्णांच्या अमेरिकेतील प्रवासात त्यांचे पुत्र भास्करराव यांचा त्यांना खूपच उपयोग झाला.

आणि आता अमेरिकेहून अण्णा निघाले आशिया खंडाकडे, जपानला ७ जानेवारी १९३० रोजी अण्णा योकोहामा बंदरात उतरले. या प्रवासात वेळेसंबंधी एक गमतीदार गोष्ट अण्णांच्या ध्यानी आली.

अनुक्रमणिका

पूर्वेकडून पश्चिमेकडे जाताना घड्याळ रोज २०-२५ मिनिटे मागे करावे लागते. आणि उलट पश्चिमेकडून पूर्वेकडे जाताना पुढे करावे लागते. काळ सारखा बदलत असतो हे सत्य त्यांना जाणवले.

जपानमध्ये जाण्यात त्यांना रस होता. कारण जपानी संस्थेच्या पत्रकावरून स्फूर्ती घेऊनच कर्वे यांनी आपली संस्था नावारुपाला आणलेली होती. योकोहामा हेच ठिकाण अण्णांनी मध्यवर्ती मानले. योकोहामा, टोकियो, कोबो या शहरांना त्यांनी भेटी दिल्या. टोकिओतील स्त्रियांच्या विश्वविद्यालयाचे दर्शन घडले याचा आनंद खूप झाला. १९२३ च्या भूकंपामुळे योकोहामा, टोकियो, ही शहरे जमिनदोस्त झाली होती. विश्वविद्यालयाच्या इमारतीही उद्ध्वस्त झाल्या होत्या. पण पराकोटीचा ध्येयवाद आणि चाणाक्ष व्यवहार या गुणांच्या जोरावर विश्वविद्यालयाच्या चालकांनी साध्या झोपड्या बांधून हळुहळु नवीन इमारती तयार केल्या. या घटनेमुळे अण्णा प्रभावित झाले होते.

कोबे या गावी फत्तेअली या गृहस्थांकडे अण्णांचा मुक्काम असताना अण्णांचे सामान चोरीला गेले. सुदैवाने जमविलेल्या निधीची पिशवी सुरक्षित राहिली. कोबे येथेच ५०० विद्यार्थिनी शिकत असलेल्या एका कॉलेजला त्यांनी भेट दिली. या कॉलेजमधील अभ्यासक्रमात संगीत व गायन यांवर विशेष भर होता. ही गोष्ट अण्णांनी मनात नोंदवली. २६ जानेवारी १९३० रोजी शांघाय मारू या बोटीने अण्णांनी चीनकडे प्रयाण केले. जपानमध्ये सुमारे एक हजार येन वर्गणी जमली होती. चीनमध्ये ते ज्या काळात गेले होते ते दिवस चिनी वर्षारंभोत्सवाचे होते. शाळा व महाविद्यालये बंद होती. थोडेच दिवस शांघायमध्ये राहून अण्णा हाँगकॉगला गेले. तेथून फिलिपाइनला मॅनिला इथं गेले. मग जावा, मलाया, सिंगापूर इथं गेले. ५ एप्रिल १९३० रोजी मलायातील भेटीगाठी संपवून रोहना बोटीने मद्रासमार्गे यायला निघाले. १४ एप्रिलला अण्णांची पृथ्वीप्रदक्षिणा पूर्ण झाली.

अण्णांनी 'Looking back' या नावानं एक इंग्रजी आत्मवृत्त लिहिलं आहे. यामध्ये त्यांच्या या समुद्रपर्यटनाचं तपशीलवार वर्णन आहे. प्रवासाचा एकंदर खर्च १२,७०० रु. झाला आणि या प्रदीर्घ भ्रमणाद्वारा २७,००० रु. वर्गणी जमली. अण्णांनी महिलाविद्यापीठाकडे १४,३०० रु. जमा केले. या आर्थिकलाभाबरोबरच महत्त्वाचा फायदा असा झाला की, जागतिक पातळीवर महिला विद्यापीठाचा परिचय करून देण्यात अण्णा यशस्वी झाले. मराठी व इंग्रजी याशिवाय दुसऱ्या कोणत्याही भाषा अवगत नसल्या, तरी अण्णांनी विदेशात संवाद साधण्याचे काम निभावून नेले.

अण्णांना या दौऱ्यात फार लाभ झाला नाही असे काहींचे म्हणणे होते. पण अण्णांनी काटकसरीने प्रवास केला यावर मात्र कोणाचेही दुमत नव्हते. याशिवाय अण्णांच्या परदेशदौऱ्याचा एक पर्यायी लाभ आपल्या देशाला असा झाला की, हिंदुस्थानासंबंधी जाणता-अजाणता जो प्रचार परदेशात केला जात होता, त्याला काही प्रमाणात पायबंद बसला. हिंदुस्थानबद्दलचे आणि हिंदी लोकांबद्दलचे जे मत प्रतिकूल होते ते अनुकूल होण्यास या दौऱ्याची मदत झाली.

आपल्या या परदेशदौऱ्यात अण्णांनी शैक्षणिक व सामाजिक संस्थांना भेटी देऊन जी विशेष निरीक्षणे केली, त्यांचा सारांश खालीलप्रमाणे आहे. या निरीक्षणांचा उपयोग आपल्या विद्यापीठांतील शिक्षणक्रमात बदल व सुधारणा करण्यासाठी निश्चितपणे होणार होता.

अनुक्रमणिका

✺ परदेशातील बहुतेक शाळांतून व्यायामासाठी स्वतंत्र दालने होती.संगीताच्या तालावर सर्वांच्या हालचाली एकत्र व सारख्या होतील असे शिक्षण मुलींना दिले जात असे. मुलींना कपडे बदलण्यासाठी सोयी होत्या.

✺ डॉक्टरांची सोय इ. गोष्टींमुळे आरोग्याकडेही विशेष लक्ष दिले जात असे.

✺ युरोप व अमेरिकेतील मुलींच्या शाळांतून व कॉलेजांतून प्रपंचशास्त्र व आरोग्यशास्त्र या विषयांकडे विशेष लक्ष दिले जाते. शिवणकाम, स्वयंपाक, कपडे धुणे, कपबशा विसळणे, भांडी स्वच्छ करणे. परिसर स्वच्छता, शरीर स्वच्छता या घटकांचा अभ्यासात समावेश होता. या विषयांच्या शिक्षिका तयार करण्याच्या शाखा कित्येक शाळांना जोडल्या होत्या. अनेक श्रीमंतांच्या घरी व औद्योगिक क्षेत्रांत असे शिक्षण घेतलेल्या स्त्रियांना सेवेची संधी मिळत असे. प्रपंचशास्त्र (Domestic Science अथवा Home Economics) हा ऐच्छिक विषय घेऊन बी. ए. होता येत असे. कित्येक विद्यापीठांतून या विषयांतअधिक संशोधन करून पीएच्. डी. पदवी मिळविता येत असे.

✺ जपानी विद्यापीठात जपानी व पाश्चात्य पाकशास्त्र, जपानी राहणी व रीतभात आणि पाश्चात्य राहणी व रीतभात यांचे शिक्षण देणाऱ्या शाखा होत्या. आचार, स्वागत, वागणूक याबद्दलचे एक शास्त्रच तयार झाले होते. त्याबद्दल पद्धतशीर शिक्षण दिले जात होते. चहासुद्धा पद्धतशीरपणे कसा द्यावा याचे शिक्षण देण्यात येत होते.

✺ अमेरिका व युरोप याठिकाणी सहशिक्षणाचा प्रयोग यशस्वी होत चालला आहे. सहशिक्षणाचा विरोध कमी होत होता. मात्र पूर्वीपासून जी केवळ मुलांची शाळा कॉलेजे होती त्यामध्ये सहशिक्षणाची व्यवस्था असणाऱ्या शाळाकॉलेजमध्ये मुलींच्या प्रवेशाची संख्या जास्त होती. दहा वर्षांच्या आतील मुलामुलींचे शिक्षण एकत्र होऊ शकते. मात्र जपानी लोकांचे मत असे आहे की, मुलींची हायस्कूले व कॉलेजे वेगळीच असली पाहिजेत. बऱ्याच पालकांना आपली मुले व मुली एकमेकात मिसळतात हे फारसे पटत नव्हते.

✺ अमेरिकन लोक अत्यंत उद्योगी होते. सायंकाळचा वेळ खेळ व करमणूक यासाठी द्यायचा असल्याने संभाषणाला वेळ मिळावा म्हणून दुपारी लंचसाठी मंडळी एकत्र जमतात. अमेरिकेत जिकडेतिकडे स्त्रीपुरुषांचे क्लब आहेत. व्याख्यानानंतर व्याख्यात्याला अनेक प्रश्न विचारीत. व्याख्यात्याला उत्तरे द्यावी लागत. गांधी व टागोर ही दोन नावे सर्व सुशिक्षितांना माहीत आहेत. तेथील लोकांमध्ये हिंदुस्थानविषयी जिज्ञासा वाढत आहे. परदेशात भारतासंबंधी अनेक गैरसमज आहेत. अशा प्रश्नोत्तरांतून हे गैरसमज दूर करण्याची संधी मिळते.

अशा निरीक्षणांबरोबरच अण्णासाहेब कर्वे यांनी आपल्या युरोप अमेरिकेच्या प्रवासाची फलश्रुती अत्यंत समाधानकारकरीत्या नोंदवली. आपल्या दौऱ्यामुळे हिंदुस्थानच्या आकांक्षाविषयीचे क्षेत्र थोडेसे तरी वाढले असे कर्वे लिहितात.

युरोप, अमेरिका व आशिया या तीन खंडांचा प्रवास अण्णांनी केला. आता राहिले आफ्रिका खंड आपल्या शिक्षणसंस्थांसाठी झोळी घेऊन हिंडणारे तीन महापुरुष होते. बनारस विद्यापीठाचे संस्थापक

अनुक्रमणिका

मदन मोहन मालवीय, महिला विद्यापीठाचे धोंडो केशव कर्वे आणि सेवासदन संस्थेचे गोपाळ कृष्ण देवधर. त्रिखंडप्रवासाने अण्णांना आत्मविश्वास आला होता. आफ्रिकेतील केनियामधील मोंबासा इथं अण्णांचे द्वितीय पुत्र शंकरराव डॉक्टर होते. त्यांचे हॉस्पिटल होते.शंकररावांशी बोलणी करूनअण्णांनी आफ्रिकेला जायचे निश्चित केले. महिला विद्यापीठानेही अण्णांचा प्रवासखर्च मंजूर केला. या प्रवासात बाया कर्वेही अण्णांच्या बरोबर होत्या. ३१ डिसेंबर १९३० रोजी अण्णा आणि बाया खंडाळा बोटीने आफ्रिकेला निघाले. मोंबासा हेच अण्णांच्या आफ्रिकावारीचे मुख्य केंद्र होते.

बाया कर्वे यांना आपल्या मुलाच्या घरी राहण्याचा आनंद मिळालाच. पण त्यांनी केनियात हिंडून आश्रमासाठी भाऊबीज म्हणून दोन हजार रुपये गोळा केले. मोंबासा, युगांडा, झांझिबार इ. ठिकाणी अण्णांनी प्रवास केला. दरबान, फिनिक्स, जोहान्सबर्ग, प्रिटोरिया, केपटाऊन इ. ठिकाणी भेटी दिल्या. म. गांधी यांनी स्थापन केलेली फिनिक्स वसाहत, टॉलस्टॉय फार्म या प्रसिद्ध स्थळांना भेटी देऊन अण्णा मोंबासाला परतले. मधल्या काळात केपटाऊन इथं नामदार श्रीनिवास शास्त्री आणि सरोजिनी नायडू यांचीही भेट त्यांनी घेतली.

१२ मार्च १९३२ रोजी अण्णा आफ्रिकेहून मुंबईला परतले. १४॥ महिने त्यांनी हिंदुस्थानबाहेर घालविले होते. सुमारे २,००० लोकांच्या गाठीभेटी घेऊन त्यांनी ३४,००० रु. मिळवले. प्रवासखर्च २,२०० रु. झाला. विद्यापीठाकडे त्यांनी ३१,८०० रु. जमा केले. इतर भागांतील वास्तव्यापेक्षा आफ्रिकेत त्यांचे वास्तव्य अधिक झाले. कारण त्यांचे पुत्र, परिचित, पाहुणे, बरेच लोक तिथं होते. या प्रदीर्घ कालखंडात त्यांनी केलेली निरीक्षणे खालीलप्रमाणे आहेत.

- इंग्रजांचा अंमल सुरू झाल्यावरच रस्ते रेल्वे इ. आधुनिक सुधारणा आफ्रिकेत झाल्या. तिथे कारागीर व कामगार म्हणून बरेच हिंदी लोक आले. डॉक्टर वकील यांनाही थोडे कार्यक्षेत्र मिळाले. पूर्व आफ्रिकेपेक्षा दक्षिण आफ्रिकेत हिंदी लोकांची वस्ती कमी होती.

- कुलाबा, रत्नागिरी जिल्ह्यातले बरेचसे मुस्लिम आफ्रिकेत कायमचे राहिले होते. पूर्व व दक्षिण आफ्रिकेत आर्य समाजाच्या लोकांनी फार चांगले काम केले होते. त्यांच्या धाडसाचे कौतुक करावे तेवढे थोडेच आपल्या दक्षिणी लोकांत परदेशात जाऊन उद्योगधंदा करण्याचा वकूब नाही. एवढ्या प्रवासात दारेसलाम येथे बरेच दक्षिणी लोक आढळले. दारेसलामचे महाराष्ट्रीय मंडळ चांगले चालले आहे. आफ्रिकेत प्राथमिक विभागाच्या शिक्षणातसुद्धा हिंदी भाषांना स्थान नाही. मुले शाळेत गेल्याबरोबर इंग्रजीच शिकू लागतात. घरी मात्र आपली भाषा बोलतात.

- आफ्रिकेत बारा महिने पाऊस असल्यामुळे झाडामाडांना पाणी घालावे लागतनाही. जिकडेतिकडे हिरवेगार असते. झांझीबारमध्ये लवंगांची लागवड फार मोठ्या प्रमाणावर असते.

अशातऱ्हेने अण्णांच्या सातासमुद्रापार केलेल्या यात्रा सफळ संपूर्ण झाल्या. निधीसंकलन, कार्यप्रसार, गैरसमजांचे निराकरण, विविध निरीक्षणे आणि स्वतःच्या उदात्तकार्यासाठी मिळालेली नवी दृष्टी ही अण्णांच्या प्रवासाची दृश्य फलिते होती.

अनुक्रमणिका

# कसोटीचे क्षण

कै. धोंडो केशव कर्वे यांच्या जीवनात कसोटीचे अनेक क्षण आले. बालपणी मुरूड, रत्नागिरी व दापोली, साताऱ्यास परीक्षेसाठी चालण्याचा, अनाथबालिकाश्रमस्थापनेच्यावेळी विरोधाचा, बायाशी विवाह केला त्यावेळी उपेक्षेचा, अशा अनेक कसोटीच्या क्षणांना अण्णांनी धीराने तोंड दिले. पण आता त्यांच्यापुढे जे ताट वाढून ठेवले होते, ते अगदी वेगळ्या प्रकारे कसोटी बघणारे होते. यशस्वी परदेश दौरे करून आलेल्या अण्णांना या वाढून ठेवलेल्या ताटाची जराही कल्पना नव्हती. किंवा असे काही होईल हे त्यांना स्वप्नातही वाटले नव्हते.

अण्णांनी स्थापन केलेल्या सर्व संस्था सुखाने कालक्रमणा करीत होत्या. विद्यापीठाची प्रगती उत्साहवर्धक नव्हती. तरीही एरंडवणे येथील इमारतीत विद्यापीठाचा कारभार ठीक चालला होता. पुणे, मुंबई, सातारा, बेळगाव व सोलापूर येथील आजन्म सेविकांनी चालविलेल्या शाळा चांगल्या चाळल्या होत्या; आणि त्यामुळे विद्यापीठाच्या परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थिनींची संख्याही त्याप्रमाणात वाढली होती.

सर विठ्ठलदास ठाकरसी यांच्या दानपत्रातील अटींप्रमाणे, हिंगणे येथे सुरू केलेले महिलापाठशाळा कॉलेज, एरंडवणे येथे हलविण्यात आले होते. प्रिं. ना. म. आठवले कॉलेजशेजारीच रहात होते. आश्रमापासून विद्यापीठ अलग झाले होते. पण या विद्यापीठावर अचानक संकटांनी छाया धरली. सर विठ्ठलदास ठाकरसी यांच्यानंतर त्यांच्या विश्वस्तांनी मूळ कराराप्रमाणे १९३० पर्यंत प्रतिवर्षी ५२,००० रु. विद्यापीठाला निर्वेधपणे दिले. लेडी प्रेमलीला ठाकरसी याही विद्यापीठाच्या कामातलक्ष घालीत होत्या. विद्यापीठसभेच्या त्या सभासदही होत्या. पण आश्रमाची चालक मंडळी आणि लेडी ठाकरसी व त्यांचे अन्य विश्वस्त यांच्या मनात परस्परांबद्दल काही गैरसमज निर्माण झाले. २५ फेब्रुवारी १९३२ रोजी सर ठाकरसी यांच्या विश्वस्तांनी विद्यापीठाच्या कार्यवाहांना एक पत्र लिहून आपली नाराजी व्यक्त केली; आणि विद्यापीठाला प्रतिवर्षी जी देणगी देण्यात येते; ती बंद करीत आहोत असे कळविले.

विश्वस्त मंडळाने ज्या अटी घातल्या होत्या; त्या पूर्ण होण्याबाबतचे गैरसमज होते. विश्वस्तांनी आपल्या पत्रात विद्यापीठाला लिहिले होते-

"सर विठ्ठलदास ठाकरसी यांनी काही अटींवर विद्यापीठाला देणगी देण्याचा निर्णय घेतला होता. त्या संबंधात या पत्रातून जो काही मजकूर आम्हाला कळवावा लागत आहे, त्याबद्दल आम्हाला दुःख वाटते. कोणत्या अटींवर देणगी देण्यात यायवयाची होती, याची तुम्हाला कल्पना आहेच. त्यासंबंधीचे दस्ताऐवज आपल्याकडे आहेतच. सर विठ्ठलदास यांच्या अटी पूर्ण करता याव्यात, यासाठी आम्ही दहा वर्षे वाट पाहिली. विद्यापीठाला हवी तेवढी संधी आम्ही दिली. अशा परिस्थितीत या अटी पूर्ण न झाल्याने मासिक हप्त्यात दिले जाणारे वार्षिक अनुदान थांबविणे हे कर्तव्यच आहे."

विद्यापीठाच्या हाती हे पत्र आले तेव्हा अण्णा आफ्रिकेत होते. १२ मार्च १९३२ रोजी ते आफ्रिकेहून मुंबई बंदरात पोचले; तेव्हा तेथेच त्यांना ही धक्कादायक वार्ता कळली.

क्षणभर अण्णा सुन्न झाले. पण क्षणभरच. हा आपला कसोटीचा प्रसंग आहे; हे त्यांनी ताडले; आणि आता या प्रसंगाला धीरानं तोंड देऊन मार्ग कसा काढावा, याबाबत शांतपणे विचार करण्यासाठी, अधिक चर्चा न करता ते घरी गेले.

विद्यापीठाच्या आर्थिक स्थैर्याची, नैतिक जबाबदारी प्रथमपासून अण्णांनी स्वतःकडे घेतली होती. त्यामुळे आपणापुढील ही समस्या सेनेट वा सिंडिकेटकडे न मांडता आपण स्वतःच ती सोडवली पाहिजे असे त्यांनी मनोमन ठरविले. अण्णांनी आपल्या सहकाऱ्यांसमोर ही समस्या मांडताच सर्वांनी एकमुखाने वाटेल ते सहकार्य करण्याची तयारी दाखविली. त्यासाठी वेतनात कपात हा उपाय सर्वांनी मान्य केला. एवढेच नव्हे तर पगाराची सर्व रक्कम कर्वे यांच्या हाती ठेवून कर्वे यांनी विद्यापीठाच्या खर्चासाठी लागेल तेवढी रक्कम त्यातून घ्यावी व उरलेलीरक्कम पगारापोटी नंतर वाटावी, असेही सहकारी म्हणाले. अजीव सेवकांना १२५ रु. पगार मिळत होता. त्यापैकी प्रत्येकी ५० रु. त्यांनी अण्णांच्या हाती दिले. प्राध्यपकांनी कमी वेतनावर काम करण्याची तयारी दाखविली. विद्यापीठाशी संलग्न असलेल्या संस्थाना देण्यात येणाऱ्या निधीत थोडी कपात केली. अशा सर्व उपाययोजनांमुळे १७,५०० रु. जादा मिळू शकले. तरीही अजून बऱ्याच निधीची आवश्यकता होती. जनतेने विद्यापीठाला मदत करावी असे सर्वत्र आवाहन करण्यात आले.

भारतीय महिला विद्यापीठाचा वार्षिक खर्च त्यावेळी सुमारे सत्तर हजार रुपये होता. बव्हंशी खर्च सर विठ्ठलदास ठाकरसी यांच्या देणगीच्या व्याजातून केला जात असे. सर विठ्ठलदास ठाकरसी यांनी ज्या अटी घातल्या होत्या, त्यातील महत्त्वाच्या अटी म्हणजे विद्यापीठाला सरकारी मान्यता मिळवणे किंवा मूळ रकमेइतकी रक्कम जनतेकडून मिळविणे ही होय. विद्यापीठाच्या चालकांचा असा समज झाला की, ठाकरसी यांच्या अटी व्याज देण्याला लागू नसून, फक्त मुद्दल देण्यालाच लागू आहेत. परंतु लेडी ठाकरसी व त्यांचे विश्वस्त यांना तसे वाटत नसल्यामुळे त्यांनी व्याज देण्याचे नाकारले.

१९३४ च्या अखेरीस अनाथ बालिकाश्रमाच्या सतरा आजीव सेवकांची सभा भरली. संस्थेसाठी जास्तीतजास्त स्वार्थत्याग कसा करता येईल यावर विचार झाला. आधीच या सर्वांनी पंच्याहत्तर रु. कमी घेण्याचे ठरविले होते. अजून पंधरा रुपये विद्यापीठाला देण्याचा निर्णय झाला.

या घटनेच्या आसपासच सर चुनीलाल मेहता यांनी आपल्या कुलगुरुपदाचे त्यागपत्र दिले. पण अशा संकटकाळी मुंबई हायकोर्टाचे जज्ज ना. पाटकर यांनी ही जागा स्वीकारली. त्यांच्या या मदतीमुळेच विद्यापीठ या संकटकाळातूनही वाटचाल करू शकले.

न्या. पाटकर यांनी असा सल्ला दिला की; संस्थेच्या विश्वस्तांनी (महिलाश्रमाने) न्यायालयात दाद मागावी. १२ ऑगस्ट १९२२ रोजी एका शस्त्रक्रियेच्या वेळी सर विठ्ठलदास यांचे निधन झाले. त्याआधी आपल्या इच्छापत्रात त्यांनी स्वहस्ताक्षरात पुढील मजकूर लिहून ठेवला होता-

'ट्रस्टींनी अटी पाळल्या जातात किंवा नाही, याची वाट न बघता विद्यापीठाचे काम समाधानकारक वाटल्यास आधी मूळ पंधरा लक्ष किमतीच्या साडेतीन टक्क्यांच्या नोटा विद्यापीठाच्या स्वाधीन कराव्यात.'

अनुक्रमणिका

या मजकुरावरून सर विठ्ठलदास किती उदार होते याची साक्ष पटते. याबाबत न्यायालयाऐवजी ठाकरसी विश्वस्त व महिलाविद्यापीठाचे अधिकारी यांनी विचारविनिमयानेच हा प्रश्न सोडवावा असे प्रयत्न झाले. पण त्यासाठी अण्णांना खूप मनोधैर्य दाखवावे लागले. या प्रकरणासंबंधीचा दावा खुल्या न्यायालयात चालण्यापूर्वी अखेरच्या तडजोडीचा प्रयत्न झाला. ९ एप्रिल १९३५ रोजी न्या. मू. रांगणेकर यांनी तडजोड करण्याबाबत सुचविले. तडजोड न झाली तर लवाद म्हणून निकाल देण्याची तयारी दर्शविली. अखेर उभयपक्षी तडजोड झाली. १७ एप्रिल १९३५ रोजी, म्हणजेच १८ एप्रिल रोजी येणाऱ्या आपल्या वाढदिवसाच्या आदल्या दिवशी अण्णा चिंतामुक्त झाले. तडजोडीची काही कलमे अशी होती-

- विद्यापीठाचे कार्य मूळ धोरणाला धरून चालले आहे, याबाबत सरकारी मान्यता लवकर मिळविणे; किंवा प्रतिवर्षी ५२,५०० रु. व्याज येईल इतकी रक्कम जनतेकडून मिळविणे.

- यापैकी कोणतीही अट पूर्ण होईपर्यंत मूळ संकल्पित देणगीची सर्व रक्कम १५ लाख रु. विश्वस्तांनी विद्यापीठाचे हवाली करावी. तोपर्यंत या रकमेचे व्याज ५२,५०० रु. वर्षातून तीन हप्त्यात देण्याचे चालू ठेवावे.

- गत तीन वर्षांच्या व्याजाची थकित रक्कम (१,६५,९१६ रु.) विश्वस्तांनी विद्यापीठास द्यावी. पण तिचा विनियोग मुंबईसाठी विद्यापीठाच्या कॉलेजकरीता व महिलाविद्यापीठाच्या कचेरीकरिता लागणाऱ्या इमारती बांधण्याचे कामी विद्यापीठाने करावा.

- व्याजाच्या रकमेतून मुंबईतील ‘वनिताविश्राम’ संस्थेच्या इंग्रजी शाखेला दरवर्षी ५००० रु. देणे.

- विद्यापीठाची कचेरी आतापर्यंत पुण्यास आहे. ती १ जानेवारी १९३६ पासून मुंबईस आणावी.

- ५२,५०० रु. च्या रक्कमेवर पहिला हक्क पुण्यातील कन्याशाळा, महिला पाठशाळा आणि मुंबईतील कन्याशाळा व महिला पाठशाळा या श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी यांच्या नावाने चालणाऱ्या संस्थांवर असेल. वनितविश्राम संस्थेला देण्यात यावयाचे ५,००० रु. सोडून उरलेली रक्काम विद्यापीठाशी संलग्न असलेल्या सर्व गुजराती व दक्षिणी संस्थांना मदत म्हणून निम्मेनीम विभागून देण्यात यावी.

- ठाकरसी घराण्यातील सर्वात ज्येष्ठ पुरुषव्यक्तीला ठाकरसी कुटुंबाच्यावतीने५ सभासद विद्यापीठाच्या सेनेटवर निवडून देण्याचा हक्क असावा.

- लेडी प्रेमलीलाबाई ठाकरसी यांना तहहयात विद्यापीठाच्या सिंडिकेटवर सभासद नेमावे.

अण्णांच्या स्नुषा व पुढे प्रख्यात लेखिका झालेल्या इरावती कर्वे त्यावेळी विद्यापीठाच्या कुलसचिव होत्या. इरावतीबाई व प्राचार्य ना. म. आठवले यांनी विद्यापीठाला अनुकूल अशी तडजोड कशी करून घेता येईल, याबद्दल खूप प्रयत्न केले. या कठिण कालखंडात श्री. वा. गो. मायदेव यांची निधिसंकलनासाठी विशेष नेमणूक करण्यात आली. त्यांनीही पराकाष्ठेचे प्रयत्न करून विद्यापीठाचे कार्य सुरळीत चालण्यासाठी मदत केली. या तडजोडीनंतर विद्यापीठ संकटमुक्त झाले. लेडी ठाकरसी याही झाले गेले

अनुक्रमणिका

विसरुन विद्यापीठाच्या कामात लक्ष घालू लागल्या. न्या. रांगणेकर व न्या. पाटकर या दोन न्यायमूर्तींनी आपल्या प्रतिष्ठेचा व विद्वत्तेचा योग्य वापर करून विद्यापीठाला अडचणीतून बाहेर आणण्यासाठी सवर्तोपरी मदत केली, याबद्दल अण्णांनी मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त केली. आजीव सेवक सेविका व सहकारी शिक्षक यांची भूमिका तर संजीवक होतीच. विद्यापीठ वाचले पाहिजे या एकाच भावनेने प्रेरित होऊन ही सर्व मंडळी या कसोटीच्या प्रसंगी काम करीत होती.

या कठिण कालखंडात विद्यापीठाला अन्य मार्गांनी पैसा उपलब्ध न झाला तर गेल्या १६ वर्षांत कायमनिधीची जी तरतूद केलेली होती; तीतून निधी मिळवावा असे विद्यापीठाने ठरविले; आणि सेनेटनेही या ठरावाला मान्यता दिली होती. कुलगुरुंच्या मदतीने आणीबाणी अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. त्यासही सर्वांनी मान्यता दिली.

या कसोटीच्या कालखंडात कर्वे यांचे मन कोणत्या पद्धतीने विचार करत होते? अत्यंत स्थितप्रज्ञ वृत्तीने ते या परिस्थितीला सामोरे गेले. आपल्या इंग्रजी आत्मचरित्रात ते लिहितात-

“निर्भेळ आनंद वा निर्भेळ दुःख या गोष्टी जगात कठिणच आहेत. संकटेसुद्धा उपयुक्तच ठरतात. अशा वेळी कार्यकर्त्यांची व त्यांनी हाती घेतलेल्या चळवळीची कसोटी लागते. अशा कठिण परिस्थितीत विद्यापीठाच्या स्थैर्याबाबत लोकांच्या मनात शंका उपस्थित होणे साहजिकच होते. एरवी अशा परिस्थितीत संलग्न शाळा, महाविद्यालयांची संख्यासुद्धा रोडावली असती. परंतु तसे काही घडले नाही. विद्यार्थिनींच्याफीत वाढ करावी लागली तरीही त्यांची संख्या कमी होण्याऐवजी वाढली.”

हिंगणे येथील अनाथबालिकाश्रम आणि एस. एन. डी. टी. विद्यापीठ यांचे संबंध फार जुने होते. विद्यापीठाचा उद्‌गम अनाथबालिकाश्रमातून झाला होता. एकाच वीणेचा तारा झंकारतात, तेव्हा त्यातून संवादी सूर निघतात. परंतु आता मात्र थोडी वेगळी भूमिका घ्यावी लागली. ती अपरिहार्य होती. १९१६ साली एक स्वतंत्र संस्था म्हणून विद्यापीठाची स्थापना झाली होती. आश्रमाची स्थापना करणाऱ्या कर्वे यांनीच विद्यापीठाची स्थापना केली होती. या विद्यापीठाची प्रगती ही आपली नैतिक जबाबदारी आहे असे आश्रमाच्या आजीव सेवकांना वाटे. अशा तऱ्हेने अनाथबालिकाश्रम, त्याचे सर्व कार्यकर्ते, महिला विद्यापीठ, त्याचे सर्व संचालक व सेवक यांचे सहसंबंध फार चांगले होते. आश्रमाच्या सेवकांपैकीच १० जण विद्यापीठात प्राध्यापक होते. एकजण सचिव होते. विद्यापीठाचे काम म्हणजे आश्रमाच्या कार्याच्या विस्ताराचाच एक भाग असे समजून सर्वजण पुढाकाराने, समन्वयाने काम करीत होते.

मात्र १९३५ मध्ये तडजोडीच्या मसुद्यात जी कलमे मान्य करण्यात आली होती, तीनुसार एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ व त्या विद्यापीठाची सर्व कार्यालये मुंबईस हलविण्यात आली. आणि अर्थातच या घटनेनंतर विद्यापीठ व हिंगणे येथील संस्था यांचे संबंध दुर्बल होत गेले. जेवढे संबंध राहिले तेवढे अगदी औपचारिक स्वरूपाचे राहिले.

१९२२ मध्ये सर विठ्ठलदास यांचे निधन झाले ही गोष्ट विद्यापीठाच्या दृष्टीने जितकी आघाती होती. तितकीच ती घटना कर्वे यांना अतिदुःखद ठरली. सर ठाकरसी यांनी विद्यापीठाच्या कार्यात खूप रस घेतला. वेळोवेळी देणग्या दिल्या. विद्यापीठाच्या सर्व योजनांची अंमलबजावणी योग्य रीतीने व्हावी यासाठी ते आपला भरपूर वेळ देत. सर विठ्ठलदास ही कर्वे यांच्या कार्याची आधारशिला होती. ते असते तर

कदाचित पुढील कसोटीचे प्रसंग उद्भवले नसते. तरीही कमी वादळे निर्माण होऊन ती शमली. लेडी ठाकरसी यांनीही उदारभाव व्यक्त केला. कर्वे यांच्या कार्याची थोरवीच त्यांनी जाणली होती.

अनुक्रमणिका

# ग्रामशिक्षण आणि समता संघ

१९२० साली लो. टिळक यांचे निधन झाले आणि याच सुमारास भारतात म. गांधी यांच्या कार्याचा प्रारंभ झाला. १९१५ मध्ये म. गांधी आफ्रिकेहून भारतात आले. टिळकयुगाची जागा आता गांधीयुगाने घेतली होती. म. गांधी राजकारणी होते, तरी त्यांचं राजकारण सत्य-अहिंसा या मार्गांचा प्रचार करणारं होतं. राजकीय जागृतीबरोबरच म. गांधी यांनी ग्रामोदय, ग्रामस्वराज्य या कल्पना समाजासमोर मांडल्या. नई तालीम (बुनियादी तालीम) ही मूलोद्योगावर आधारित शिक्षणपद्धती गांधी यांनी रुजविण्याचा प्रयत्न केला. शिक्षणाचा प्रसार शहरात कितीही झाला तरी भारतातील हजारो खेडी शिक्षणाच्या दृष्टीने ओस होती. ज्ञानगंगेच्या वाटा खेड्यांना अपरिचित होत्या.

म. गांधी यांच्या कार्याविषयी कर्वे यांना अत्यंत आदर होता. आफ्रिकेत म. गांधी यांनी स्थापन केलेल्या फिनिक्स आश्रमाला त्यांनी भेट दिली होती. १९३० साली दांडीयात्रा काढून मिठाचा सत्याग्रह म. गांधी यांनी केला. तेव्हा अण्णा जपानमध्ये होते. जपानमधून परतल्यावर या अहिंसात्मक आंदोलनाने भारतात जी जागृती निर्माण झाली होती, ती पाहून कर्वे भारावून गेले होते. जागोजागी असे सत्याग्रह होत होते. मुंबईच्या गजबजलेल्या रस्त्यातून श्रीमंत गरीब, प्रौढ तरुण अशा शेकडो स्त्रिया मिठाच्या सत्याग्रहासाठी मिरवणुकीने समुद्राकडे जात होत्या हे रोमांचकारी दृश्य अण्णांनी डोळे भरून पाहिले. स्त्रियांच्याभोवती गोरे शिपाई, त्यांचे अधिकारी सार्जंट यांनी कडे केले होते.

या घटनेचा कर्वे यांच्या मनावर परिणाम झाला. कर्वे आपल्या आत्मवृत्तातलिहितात-

“गेली कित्येक वर्षे मी व माझ्यासारख्या अन्य व्यक्तींनी जे साधण्याची धडपड केली आणि ज्यात आम्ही अपयशी ठरलो, ते या साबरमतीच्या अलौकिक पुरुषाने एका झटक्यात साध्य केले.”

या सर्व घटनांबाबत अण्णासाहेब कर्वे मननचिंतन करीत होते. या काळात देशात राजकीय चळवळींनी खूपच उग्र रुप धारण केले होते. राजकीय स्वातंत्र्य हे एकमेव उद्दिष्ट ठेवून चळवळी आकारास येत होत्या. पण सामाजिक सुधारणांबाबत त्यामानाने उदासीनता होती. हिंदु धर्मातील विविध जातीजमाती आणि हिंदु-मुस्लिम व अन्य धर्मीय यांच्यामधील वाढत जाणारा बेबनाव ही बाब चिंताजनक होती.

मानवी समानतेच्या स्वीकार करून आपल्या सामाजिक कर्तव्यांची लोकांना यथार्थ जाणीव करून देणारी एखादी संस्था वा संघटना आवश्यकच होती. मद्रास येथील ‘इंडियन रिव्ह्यू’ या नियतकालिकात १९४२ साली लिहिलेल्या लेखात त्यांनी अशा योजनेचा तपशील दिला. पण अशा संस्थेचे कार्य अखिल भारतीय पातळीवर उभे राहिले तरी आपण महाराष्ट्रापुरतेच कार्य करू असेही कर्वे यांनी स्पष्ट केले.

१९३७ सालापासून अण्णासाहेब कर्वे यांनी आश्रमाचे वा विद्यापीठाचे काम कमी कमी करीत आणले होते. त्याची पार्श्वभूमी १९३५ पासूनच तयार झाली होती. खेडेगावातील मुलामुलींच्या शिक्षणप्रसाराचा एक नवीन उपक्रम हाती घेण्याचे अण्णांनी मनाशी ठरविले होते. अण्णासाहेब कर्वे यांचे आतापर्यंतचे काम उत्क्रांतितत्त्वाला अनुसरून झाले होते. खेड्यांतही अशी उत्क्रांती झाली पाहिजे असे कर्वे यांना वाटत होते. १९३५ मध्ये केसरीच्या एका अंकात लेख लिहून अण्णांनी ग्रामशिक्षणाविषयी आपले विचार व्यक्त केले होते. स्वतःच्या निवृत्तिवेतनातून द. म. १५ रु. या कार्यासाठी त्यांनी बाजूला काढून ठेवले होते. त्यावेळचे

एक निवृत्त इंजिनियर रा. शं. बापट डेक्कन ॲग्रिकल्चरल असोसिएशनच्यावतीने खेड शिवापूरला ग्रामोद्धाराचे कार्य करीत होते. ग्रामोद्धाराच्या कार्याचा एक भाग म्हणून ते दोन शाळाही चालवीत होते. पण त्यांच्याकडे पुरेसे आर्थिक पाठबळ नव्हते. ते अण्णांना भेटले. अण्णा व बापट या दोघांनी मिळून पुणे शहरात निधी गोळा करण्यासाठी हिंडून प्रयत्न केला. ८-१० महिन्यानंतर बापट हे नोकरीनिमित्त फलटणला गेले.ग्रामशिक्षणाबाबत जे कार्य करावयाचे असे अण्णांच्या मनात होते,त्याला आता संस्थात्मक आकार देणे आवश्यक होते.

जानेवारी १९३६ मध्ये अण्णांनी काही मंडळींना एकत्र करून'महाराष्ट्र ग्राम प्राथमिक शिक्षण मंडळ' या नावाची संस्था सुरू केली. कै. न. चिं. केळकर या संस्थेचे अध्यक्ष होते. स्वतः कर्वे चिटणीस होते. श्री. बापूसाहेब जठार, श्री. काकासाहेब सहस्रबुद्धे, श्री. बाबूराव जगताप, श्री. रा. शं. दीक्षित, श्री. नानासाहेब ओक, श्री. बाळूकाका कानिटकर इ. नामवंत व्यक्ती या संस्थेच्या कार्यकारी मंडळात होत्या.

संस्थेची प्रमुख उद्दिष्टे ठरविण्यात आली. ज्या गावी लोकल बोर्डाच्या अथवा बोर्डाची मदत मिळू शकणाऱ्या शाळा नसतील, अशा खेडेगावांत प्राथमिक शाळा चालविण्यास मदत देणे हा प्रमुख उद्देश ठरविण्यात आला. सुरुवातीला दोन शाळांना प्रत्येकी शंभर रुपये मदत देण्यात आली. शाळांची संख्या वाढली. त्यामुळे या संस्थेच्या कचेरीचे काम बघण्यासाठी नाशिक हायस्कूलचे निवृत्त मुख्याध्यापक रा. भा. भागवत यांना सहचिटणीस म्हणून नेमले. १९३६ साली मंडळाचे १२० घटक झाले आणि वर्गणी जमली ४४७५ रु. १९३७ साली मंडळाच्या मदतीने चालणाऱ्या शाळांची संख्या वीस होती. प्रत्येक शाळेला चार ते आठ रुपये मासिक मदत देण्यात येत असे.

काही दिवसांनंतर कॉंग्रेस सरकार अधिकारावर आले; आणि त्यानंतर शाळांना सरकारी अनुदान मिळू लागले. आता मंडळाच्या विशेष मदतीची शाळांना गरज उरली नसावी. त्यामुळे मंडळ विसर्जित करावे असा विचार पुढे आला १९४८ पर्यंत या मंडळाचे कार्य सुरू होते. यावेळी मंडळाकडे १४ हजार रु. शिल्लक होते. सदर रक्कम संपेपर्यंत मंडळाचे कार्य पुढे सुरू ठेवले असल्याचे अण्णांच्या दैनंदिनीतील नोंदींवरून स्पष्ट होते. अशा तऱ्हेने मंडळाचे कार्य फक्तप ११ वर्षेच चालले. मंडळाने संबंध महाराष्ट्रात ५० शाळा चालविल्या होत्या.

ग्रामीण भागातील शिक्षण प्रसारासाठी महाराष्ट्र-ग्राम-प्राथमिक शिक्षण मंडळाने जे कार्य केले, ते त्या काळाला अनुलक्षून अलौकिक असे होते. त्यावेळचे सरकारचे सल्लागार सर जनार्दन मदन यांनी अण्णांना मुद्दाम बोलावून त्यांच्याशी विचार विनिमय केला होता. ग्रामीण भागातील अज्ञान दूर होण्यासाठी साक्षरताप्रसार होणे आवश्यक होते.सरकारी पातळीवर हे प्रचंड काम यशस्वी होणे शक्य नव्हते. या कामाची सुरुवात अण्णांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी आपल्या परीने केली. पण कॉंग्रेसचे सरकार आल्यानंतर या कामाची गरज आपोआप कमी झाली असे वाटूलागले.

पुणे, सातारा, रत्नागिरी, कुलाबा इ. जिल्ह्यातील दुर्गम भागातील शाळांना अण्णांनी मदत पोचविली. अण्णांच्या या ग्रामशिक्षण कार्यक्रमात निवृत्त पोस्टमास्तर श्री. परांजपे, सरदार भाऊसाहेब पोतनीस, श्री. गणपतराव नातू इ. समाजनिष्ठ व्यक्तींनी त्यांना सर्वतोपरी मदत केली. सहचिटणीस भागवत यांनी हिशेबाचे किचकट काम अंगावर घेतले. ज्या शाळांना मदत दिली होती, त्या शाळा तपासण्याच्या कामी दत्तात्रय बाजीराव कुलकर्णी यांची मदत झाली. कुलकर्णी यांच्यानंतर हे काम नी. अ.

ओक यांनी केले. या कार्यासाठी अण्णांनी पुणे शहर एवढेच आपले कार्यक्षेत्र, हिंडणे व वर्गणी गोळा करणे यासाठी निश्चित केले होते. पुण्यातील बहुतेक सर्व पेठांतून ते हिंडले. पूर्वीच्या स्त्रिया चातुर्मासात 'लाखोली' वाहत असत. अण्णांनीही आयुष्यभर झोळी घेऊन लाख घरे भिक्षा मागण्याचे व्रत घेतले होते. ग्रामशिक्षणाच्या मोहिमेच्या वेळी अण्णा केवळ पुण्यात शेकडो घरी गेले.

१८ एप्रिल १९३८ रोजी अण्णांचा ८१वा वाढदिवस केवळ हिंगण्यालाच नव्हे, तर पुण्यात, मुंबईत, महाराष्ट्रात, भारतात आणि भारताबाहेरही मोठ्या प्रमाणावर साजरा झाला. धडधाकट शरीरप्रकृती, नियमित आहार, सकाळ संध्याकाळ ५-६ मैल फिरणे यामुळे अण्णांची शरीरयात्रा उत्तम रीतीने चालली होती. ३-४ तास निरनिराळ्या संस्थांची कामे, २-३ तास लेखनवाचन आणि नंतर सल्लामसलत व विश्रांती असा त्यांचा दिनक्रम होता.

सहस्त्रचंद्रदर्शन कालापर्यंत संस्थेचा व्याप चांगलाच विस्तारला होता. बाळूताई खरे, इरावती कर्वे, शारदाबाई साठ्ये, भास्करराव कर्वे अशी निष्ठावान मंडळी संस्थेचा कार्यविस्तार सांभाळीत होती. या कालावधीत अण्णांचे जागोजागी शेकडो सत्कार झाले. ते आजारी पडले. शस्त्रक्रिया करण्याचे डॉक्टरांनी ठरविले होते. पण या वयात शस्त्रक्रिया सहन होणार नाही म्हणून शस्त्रक्रिया टाळली. तरीही काही दिवसानंतर अण्णांना चांगले बरे वाटू लागले.

१२ जून १९३८ रोजी एका सभेनंतरच त्यांना त्रास होऊ लागला. पण १ सप्टेंबर १९३८ रोजी त्यांनी ग्रामशिक्षणाच्या कार्याकरिता वर्गणीच्या कामास नेहमीप्रमाणे सुरुवात केली.

एका विशिष्ट प्रकारच्या कार्यासाठी प्रयत्न करीत असतानाच आणखी एखाद्या क्षेत्रातील कार्याविषयी कर्वे यांच्या मनात विचार घोळत असत हे कर्वे यांचे वैशिष्ट्यहोते. ग्रामशिक्षणाचे कार्य सुरू असतानाच दुसऱ्या एका कल्पनेचे बीज रूजू लागले होते. अण्णांनी यापूर्वी वयाच्या ऐंशी वर्षांपर्यंत ज्या संस्था उभ्या केल्या, त्यांच्या द्वारा विधवांचे प्रश्न सुटले. अनाथ बालिकांना आधार मिळाला. पुनर्विवाहाच्या प्रश्नांतील तीव्रता कमी झाली. महिलांच्या उच्च शिक्षणाची दारे खुली झाली. खेडेगावातील मुलामुलींच्या शिक्षणाची समस्या सोडविण्यास काही प्रमाणात मदत झाली. खरं तर अण्णा कृतकृत्य होते. कृतार्थ होते. पण स्वस्थ बसतील तर ते अण्णा कर्वे कसले?

अण्णांना आता अस्वस्थ करणारा प्रश्न होता, तो समाजातील असमानतेचा. किंबहुना, समाजातील तीव्र विषमतेचा. मानवकल्याणचा विचार करता, विषमता, मग ती कोणत्याही क्षेत्रातील असो, घातकच असते. मानवजातीला कृत्रिम भेदभावांनी पोखरले आहे हे अण्णांना जाणवत होते. त्याबद्दल त्यांना विषाद वाटत होता. यासाठी आपण काहीतरी केलं पाहिजे असं अण्णांना आता सतत वाटू लागलं. पण एवढ्या विशाल व विस्तृत समस्येला हात घालण्यासाठी आपण खूप लहान आहोत ही जाणीवही त्यांना सतत टोचणी देणारी होती. त्याबद्दल ते नेहमी एक उपमा देत असत-

"छोट्याशा टिटवीने आपल्या इवल्याशा चोचीने अथांग समुद्र रिकामा करण्याचे धाडस करण्यासारखा माझा हा विचार आहे."

समता निर्माण करण्यासाठी 'समता संघ' स्थापन करावा असे अण्णांनी मनाशी ठरविले. समतासंघाची एक उद्देशपत्रिका अण्णांनी तयार केली. त्यामध्ये अण्णांनी आवर्जून हा मुद्दा नोंदविला की, "कायद्याच्या दृष्टीने सर्व लोक समान असले तरी व्यवहारात कमालीची विषमता आहे; पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांत मनुष्यामनुष्यांमध्ये असलेले आर्थिक, सामाजिक वगैरे बाबतीतील भेद शक्य तितके कमी करून सर्वांमध्ये समतेची भावना उत्पन्न व्हावी हे संघाचे ध्येय आहे."

कर्वे यांच्या 'Looking Back' या इंग्रजी आत्मचरित्राला प्रस्तावना लिहिणारे फ्रेड्रिक जेम्स गूल्ड यांच्या सहवासामुळे अण्णांना समतासंघाची कल्पना सुचली. इंग्लंडमध्ये ध्येयनिष्ठांची एक संस्था होती. तिचं नाव 'Society to Promote Equality'. १९३४ मध्ये स्थापन झालेल्या या संस्थेच्या संस्थापकांपैकी एक फ्रेड्रिक होते. संकल्पित समता संघाच्याबाबत अण्णांनी डॉ. आप्पासाहेब परांजपे, प्रा. काकासाहेब सहस्रबुद्धे, प्रा. नानासाहेब घारपुरे, श्री. तात्यासाहेब केळकर, श्री. भास्करराव जाधव, श्री. बाबूराव जगताप, फलटणचे श्रीमंत नाईक निंबाळकर, त्यांचे विद्वान दिवाण श्री. बापूसाहेब गोडबोले इ. विचारवंत व नामवंत यांच्याशीचर्चा केली.

समता संघाची स्थूल संकल्पित कल्पना स्पष्ट करणारे पत्रक अण्णा व श्रीमती वारूताई शेवडे यांनी प्रसिद्ध केले. या पत्रकावर सुमारे शंभर बुद्धिवंतांच्या मान्यतादर्शक सह्या घेतल्या. २१ एप्रिल १९४४ रोजी समतासंघ या संस्थेची रीतसर स्थापना झाली. संस्थेच्या पहिल्या वर्षी ३०० सभासद होते. दुसऱ्या वर्षी ६०० झाले. तिसऱ्या वर्षी ९०० सभासद झाले. समता संघाच्या शाखा नंतर विदर्भातही स्थापन झाल्या. जुलै १९४७ पासून 'मानवी समता' या नावाचे आठपानी छोटे मासिक, आपले मुखपत्र म्हणून संघाने चालू केले. नाममात्र वर्गणी १ रु. होती. संघाच्या घटकांना हे मासिक विनामूल्य पाठविण्यात येई. वर्गणी जमविण्याचे काम अण्णा रोज हिंडण्याच्या वेळी करीत.

समतासंघाने आपले कार्य सुमारे दहावर्षे स्वतंत्रपणे केले. नंतर समतासंघाचे स्वतंत्र अस्तित्व राहिले नाही. 'जातिनिर्मूलन' या नावाच्या संस्थेत समतासंघ विलीन झाला. 'जातिनिर्मूलन' ही संस्था फलटणचे राजे नाईकनिंबाळकर यांच्या स्फूर्तीने स्थापन झाली होती. समतासंघाची उद्दिष्टे राजकीय मतप्रणाली विरहित होती. अण्णांच्या मनात समतासंघासंबंधी व त्याच्या कार्यासंबंधी खूपच व्यापक विचार होते. कोल्हापूर येथे ४ मे १९४७ रोजी तेथील नगरवाचनमंदिराच्या ९९ व्या वर्धापनदिनी अध्यक्ष म्हणून भाषण करताना अण्णासाहेब म्हणाले-

"जागतिक महायुद्धासारख्या आपत्ती कायमच्या टाळायच्या असतील, तर जागतिक सरकार स्थापन करणे हाच सर्वात प्रभावी उपाय आहे. अशा प्रकारच्या आदर्श सरकारची स्थापना करण्यासाठी जगातील ज्या संस्थांची धडपड चालू होती, त्यापैकीच समतासंघ ही एक संस्था आहे."

वार्धक्यातही तरूणाच्या उत्साहाने अण्णासाहेबांनी समतासंघ, जातिनिर्मूलन संस्था, ग्रामशिक्षण मंडळ इ. संस्थांची कामे उभी केली. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील जागरूक समाजसेवक त्यांना कधीच स्वस्थ बसू देणारा नव्हता.

# साक्षी शतकाचा

शतायुषी असलेले अण्णासाहेब कर्वे हे खरोखरीच शतकाचे साक्षी होते. अठरा एप्रिल अठराशे अठ्ठावन रोजी जन्मलेले अण्णासाहेब नऊ नोव्हेंबर एकोणीसशे बासष्ट रोजा अनंतात विलीन झाले. १०४ वर्षांचे निरामय जीवन जगलेले कर्वे यांचे अवघे जीवन कृतिशील होते.

अण्णासाहेबांनी एकोणिसाव्या शतकाची बेचाळीस वर्षे पाहिली, विसाव्या शतकाची बासष्ट वर्षे पाहिली. दोन्ही शतकांतील आंदोलने, वैचारिक वादळे, संघर्ष, घटना, प्रसंग, समाजजीवन, राष्ट्रजीवन यांचे ते डोळस साक्षी होते. त्यांच्या कार्याची दखल समाजातील सामान्य व्यक्तीपासून गर्भश्रीमंत व संस्थानिक यांनीही घेतली होती. अण्णासाहेबांचा ८१वा वाढदिवस सर्वत्र साजरा झाला व त्यांचे सत्कार झाले. पण फलटणचे राजे निंबाळकर यांनी त्यांचा भव्य सत्कार करून त्यांना द. म. ६०० रु. निवृत्तिवेतन देण्याचे ठरविले. एकाद्या संस्थानिकाने शिक्षणकार्यास वाहून घेतलेल्या कार्यकर्त्यांस अशा प्रकारचे निवृत्तीवेतन देणे ही त्याकाळी खरोखरीच अद्‌भूत व एकमेव अशी घटना होती.

१९४८ मध्ये अण्णांचा ९१वा वाढदिवस साजरा झाला. अलीकडे दहा वर्षांत अण्णांची प्रकृती पूर्वी इतकी ठणठणीत राहिली नव्हती. तरीही त्यांना कोणताही मोठा आजार नव्हता. दैनंदिन काम ते व्यवस्थित करू शकत होते. १९३९च्या नाताळपासून हिंगणे येथील संस्थेत व्यायाम-सप्ताहाचा उपक्रम सुरू करण्यात आला होता. समाजातील अगदी दुर्लक्षित स्तरातील व वंचित मुलामुलींनाही आश्रमाच्या कार्याचा लाभ होऊन, त्यांच्या जीवनात आनंद निर्माण झाला पाहिजेअसे अण्णांना नेहमी वाटे. त्या दृष्टीने १९३९ पासून दोन नवीन कामे संस्थेने हाती घेतली. त्यापैकी पहिले म्हणजे जुव्हेनाईल कोर्ट (बालगुन्हेगार न्यायालय) मधून आलेल्या पोरक्या मुलामुलींची निवासभोजनासह शिक्षणाची सोय करण्यात आली. १९४२ मध्ये अध्यापिका शाळेला २५ वर्षे पूर्ण झाली. अध्यापिका विद्यालयाचा रजत-महोत्सव थाटामाटाने साजरा करण्यात आला. याप्रसंगी मिळालेल्या देणग्यांतून आश्रमाच्या मूळ झोपडींचा जीर्णोद्धार करण्यात आला. सर ससून डेव्हिड फंडातून २४,००० रु. मिळाले. यातून पोरक्या मुलांसाठी एक नवे वसतिगृह बांधण्यात आले.

१९४६ साली संस्था स्थापन होऊन सुवर्णमहोत्सव साजरा झाला. नामदार बाळासाहेब खेर अध्यक्ष होते. सुवर्णमहोत्सवानिमित्त संस्थेच्या मूळ नावात बदल केला गेला. 'अनाथबालिकाश्रम मंडळी' असं मूळ नाव होतं. आता 'हिंगणे स्त्रीशिक्षण संस्था' असं नाव झालं. संस्थेच्या माजी विद्यार्थिनी संघाने संस्थेच्या कार्यविस्तारात महत्त्वाचा भाग घेतला. आताच्या संभाजीपुलाजवळ पुण्यात असलेले 'महिलानिवास' वसतिगृह उभारण्यात या संघाने पुढाकार घेतला.

कविवर्य वा. गो. मायदेव हे संस्थेचे निकटवर्ती. त्यांनी आपल्या सुंदर कवितेत संस्थेच्या विस्ताराचे वर्णन केले आहे. 'वृक्षराजास' या कवितेत ते लिहितात.

"हे थोर वृक्षराजा, शाखा तुझ्या उदार  
पसरोत दूरवेरी, करण्या नभीं विहार  
झाल्या असह्य तापे, आतून पोळलेले  
वरण्यास येथ शांती, धावून जीव आले

अनुक्रमणिका

कुणि काळवंडणारे नभ पाहुनी दुरून
झणि आश्रयार्थ आल्या, वृष्टीस घाबरून...”

कै. वा. गो. मायदेव यांची ही कविता संस्थेच्या कार्याचं सुंदर शब्दांकन करणारी आहे.

१५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. ‘शतकानंतर आज उजळली पहिली रम्य पहाट’ असं कवी (वसंत बापट) गात राहिले. अण्णांनाही स्वातंत्र्य मिळाल्याचा मनस्वी आनंद झाला. स्वातंत्र्याच्या आंदोलनात त्यांनी प्रत्यक्ष भाग घेतला नसला, तरी स्वातंत्र्याचा मार्ग सोपा करण्यासाठी जी सामाजिक जाणीव जागृती व्हावी लागते, तीबाबत अण्णांचं कार्य मोठ्या प्रमाणावर झालं होतं.१८ एप्रिल १९४८ रोजी अण्णांचा ९१वा वाढदिवस! नवती महोत्सव. अण्णांचे अनेक सहकारी, मित्र, कार्यकर्ते, हिंतचिंतक, या कालावधीत जगाचा निरोप घेऊन गेले होते. काही सेवानिवृत्त झाले. संस्थेच्या कामातून दूर झाले.

एकेकाळी संस्थेचे १७ आजन्म सेवक होते. त्यांची संख्या ७ झाली. १९४६ साली संस्थेच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त सौ. कावेरी कर्वे, श्री. के रा. पालकर, श्री. पुं. वि. गोळे, श्रीमती येसूबाई बर्वे यांना आजन्मसेवक करून घेण्यात आले. संस्थेचे सहाय्यक व हितचिंतक यांनाही काळानं ओढून नेलं होतं. १९४३ मध्ये संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब इचलकरंजीकर निधन पावले. १९४५ साली काशीताई देवधर, रा. का. भिडे व न. चिं. केळकर हे ऋणानुबंधी कालवश झाले. अशा दुःखमय घटनांची अण्णांच्या मनावर छाया होती. संस्थेचा सुवर्णमहोत्सव थाटामाटात साजरा झाला. ९१वा वाढदिवस इतक्या उत्साहाने साजरा झाला तरी त्यात सहभागी होण्याची त्यांची मानसिकता नव्हती. प्रत्यक्ष हिंगण्याला फार मोठा कार्यक्रम करू नये असे संस्थाचालकांनी ठरविले. मात्र पुणे, मुंबई, बेळगाव, बडोदे इ. ठिकाणी वाढदिवस खूप उत्साहात साजरा झाला.

पुण्याला स. प. महाविद्यालयाच्या देवी रमाबाई सभागृहात डॉ. बाबासाहेब जयकर यांच्या अध्यक्षतेखाली मोठा समारंभ झाला. या समारंभात अण्णांना ७,५०० रुपयांची थैली आणि १०० संस्थांतर्फे संयुक्त मानपत्र देण्यात आले. याच कालखंडात अण्णांच्यासमोर समतासंघाचे कार्य होते. तो धागा पकडून अण्णांनी आपलं मनोगत व्यक्त करताना सांगितलं-

“आपणाला मिळालेलं स्वातंत्र्य टिकवायचं असेल, तर आपल्या हाडीमाशी खिळलेला जातीयवाद आपण प्रथम नष्ट केला पाहिजे. आपणासमोरील हा बिकट प्रश्न आपण सोडविला नाही तर समाजाचीच नव्हे, तर संपूर्ण देशाची हानी होणार आहे. या जातीयवादाच्या मुळाशी धार्मिक भावना, रूढी यांचे दडपण असल्याने त्या नष्ट करण्याकरिता रोटीबेटी व्यवहार सर्रास सुरू झाला पाहिजे. धर्म हा परिवर्तनीय आहे ही समजूत पटवून देऊन, हा जातीयवाद नष्ट केला तरच पुढील काळात देशाला तरणोपाय आहे.”

मुंबईला राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली अण्णांचा वाढदिवस थाटामाटात साजरा झाला. ९० सुवासिनींनी त्यांना ओवाळले. अण्णांना एक लाख पाच हजार रु. ची थैली देण्यात आली. मुंबईचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांनीमध्यवर्ती सरकारतर्फे ६ लक्ष रु. व मुंबई राज्यातर्फे ६ लक्ष रु. महिला विद्यापीठांच्या इमारतीसाठी देण्याचे घोषित केले.

अनुक्रमणिका

वसंत, स्त्री इ. मासिकांनी अण्णांच्या गौरवार्थ खास विशेषांक प्रसिद्ध केले. केसरी, ज्ञानप्रकाश यांनी गौरवलेख छापले. ज्ञानप्रकाशने डॉ. गूल्ड यांची अण्णासाहेबांसंबंधी एक वेधक प्रतिक्रिया छापली होती ती अशी-

'He saw his goal, he walked, he persisted, he achieved; In doing this he has served Poona, he has served India, he has served Asia, he has served humanity."

१९४२ मध्येच बनारस हिंदु विद्यापीठाने धोंडो केशव कर्वे यांना 'डॉक्टर ऑफ लेटर्स' ही सन्माननीय पदवी दिली होती. ही सर्वोच्च पदवी देताना विद्यापीठाने अण्णासाहेबांच्या मानवतेसंबंधीच्या कार्याचा विचार करून त्यांचा सन्मान केला होता.

नव्वद वर्षांचे अण्णासाहेब कर्वे समता संघाच्या कार्यात तरुणाच्या उत्साहाने लक्ष घालीत होते. आणि इकडे बाया कर्वे... संसारपाशातून स्वतःची मुक्तता करून घेत होत्या. एरंडवणे येथील महाविद्यालयाच्या प्रांगणातील छोट्या घरात त्या एकट्याच रहात होत्या. भास्करराव हिंगण्याला होते. दिनकरराव एरंडवण्याला होते. मुले आणि सुना आग्रह करीत होत्या. तरी बाया एकट्या राहिल्या. त्या म्हणाल्या, "तुमचे संसार म्हणजे तुमची राज्ये. तुम्ही मला तुमच्या संसारात सुखी कराल यात शंका नाही. पण माझे घर आणि तुमची घरं यात फरक आहे."

२९ नोव्हेंबर १९५० रोजी बाया कर्वे यांनी अखेरचा श्वास घेतला आणि अण्णासाहेब कर्वे बायाच्या विरहानं व्यथित झाले.

आता अण्णांची वाटचाल शतकाकडं सुरू होती. १८ एप्रिल १८५८ रोजी अण्णांनी वयाचं शतक ओलांडलं. नवती महोत्सवाप्रमाणेच अण्णांचा शताब्दी महोत्सव देशभर सर्वत्र उत्साहानं साजरा झाला.

मुंबईला ब्रेबॉर्न स्टेडियमच्या प्रशस्त मैदानावर एक भावपूर्ण व भव्य समारंभ झाला. भारताचे पंतप्रधान कै. पं. जवाहरलाल नेहरू या जन्मशताब्दी सोहळ्यास उपस्थित होते. राज्यपाल श्रीप्रकाश हेही होते. महर्षी कर्वे यांच्या या शुभचिंतन सोहोळ्यात बोलताना पं. जवाहरलाल नेहरू म्हणाले-

"हा एक महान संस्मरणीय दिवस आहे. एतका संस्मरणीय दिवस माझ्या पाहण्यात आलेला नाही. भारताच्या या सुपुत्राचा सत्कार व सन्मान करण्यासाठी आपण येथे जमलो आहोत. या महर्षींचा सत्कार करणारेतुम्ही आम्ही कोण? त्यांचा सन्मान करणारा मी कोण? आपण सारेच त्यांच्यासमोर खुजे आहोत. मी येथे आलो आहे त्यांचा आशीर्वाद घेण्यासाठी. ध्येयावरील अविचल निष्ठा, साधेपणा आणि त्यांना महानता प्राप्त् करून देणाऱ्या त्यांच्या इतर गुणांचा निदान अल्पसा अंश आमच्या ठायी निर्माण व्हावा, यासाठी त्यांनी आम्हाला स्फूर्ती द्यावी अशी विनंती करण्यासाठी मी आलो आहे."

याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना अण्णासाहेब कर्वे यांना बाया कर्वे यांची आठवण झाली. त्यांचा कंठ दाटून आला. त्यांनी आपल्या भाषणात बायाचं कृतज्ञतापूर्वक स्मरण केलं.

अनुक्रमणिका

भारत सरकारच्या चित्रपट विभागानं याच वेळेस महर्षींच्या जीवनावर एक माहितीपट तयार केला. या सुंदर माहितीपटात कर्वे यांचा कर्तृत्वशाली जीवनपट कलात्मक रीतीने आविष्कृत केला होता. मुंबई येथे स्थापन झालेल्या कर्वे जन्मशताब्दी समितीने कर्वे यांचे इंग्रजी चरित्र छापून प्रसिद्ध केले. मुरूड या त्यांच्या मूळ गावीही त्यांचे अनेक सत्कार झाले. मुरूडला त्यांचा तीन दिवस मुक्काम होता. त्या परिसरात त्यांचे जे जे सत्कार झाले, त्या सर्व सत्कारांना अण्णासाहेब आवर्जून उपस्थित राहिले. या मुरूड गावानेच त्यांच्यावर एके काळी बहिष्कार घातला होता. त्याच मुरूडमध्ये त्यांचे अत्यंत भावपूर्ण सत्कार झाले. या सर्व सत्कार समारंभात गावकऱ्यांनी अत्यंत उत्साहानं भाग घेतला होता. गावकऱ्यांच्या आनंदाला व उत्साहाला जणु उधाण आलं होतं.

अण्णासाहेब कर्वे यांच्या जन्मशताब्दीबरोबरच, स्त्रियांच्या उद्धारासाठी धडपडणाऱ्या व आपलं जीवन सर्वस्व वेचणाऱ्या पंडिता रमाबाईंचीही जन्मशताब्दी साजरी करण्यात आली. पंडिता रमाबाई यांच्या जन्मशताब्दी कार्यक्रमास अण्णासाहेब उपस्थित होते. तत्कालीन केंद्रीय आरोग्यमंत्री राजकुमारी अमृतकौर समारंभाच्या अध्यक्षस्थानी होत्या.

महर्षी कर्वे यांची जन्मशताब्दी देशभर ज्या उत्साहानं साजरी झाली, त्या घटनेचे अनेक प्रकारे महत्त्व सांगता येईल. स्वतः महर्षी कर्वे यांना आपला १०१वा वाढदिवस साजरा झालेला पाहण्यास मिळणे हा दुर्लभ योग होता. १०० वर्षांचा सलग कालखंड त्यांनी पाहिला होता...

या दृष्टीने अण्णासाहेब कर्वे हे शतकाचे साक्षी होते.

या शंभर वर्षांत त्यांनी गरीब स्त्रिया, विधवा, अनाथ मुली आणि दीनदुबळेयांच्यासाठी अविरत कार्य केले. महर्षी अण्णासाहेब कर्वे यांनी ज्या स्त्रियांसाठी कार्य केले, त्यातील काही स्त्रियांचे उत्तम पुनर्वसन होऊन त्या स्त्रिया समाजात सुस्थिर झाल्या होत्या. अशा स्त्रियांना कर्वे यांच्या कार्याची महती सप्रमाण पटली होती. जन्मशताब्दी कार्यक्रमाच्या निमित्तानं त्यांना आपली कृतज्ञता व्यक्त करता आली. उगवत्या पिढीसाठी एक उत्कृष्ट आदर्श म्हणून कर्वे यांचा परिचय तरुणांना झाला आणि एका त्यागमूर्तीची तपस्वी प्रतिमा कशी असते हे लोकांना अनुभविता आले.

अण्णासाहेबांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने आयुर्विमा महामंडळाने एक उत्कृष्ट व आदर्श निर्णय घेतला. इ. स. १८९९ मध्ये अण्णासाहेब कर्वे यांनी ५००० रु. चा विमा उतरविला होता. ही विम्याची रक्कम अनाथबालिकाश्रमाच्या नावे अण्णासाहेबांनी लिहून दिली होती. विमाकंपनीच्या नियमानुसार ही रक्कम अण्णासाहेबांच्या पश्चात आश्रमाला मिळणार होती. परंतु आयुर्विमा महामंडळाने एक विशेष ठराव केला. या ठरावाद्वारे ही सर्व रक्कम अण्णासाहेबांच्या शताब्दीच्या सुमारासच बालिकाश्रमाच्या स्वाधीन करण्याचा निर्णय घेण्यात आला. तो अंमलातही आणला.

डेक्कन एज्युकेशन सोसायटीनेही शताब्दीच्यावेळी आपला हात पुढे केला होता. अण्णासाहेब डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्य होते. सोसायटीकडे त्यांची ३००० रु. ची विमा पॉलिसी होती. अण्णासाहेबांच्यानंतर ही रक्कम त्यांच्या वारसांना देण्यात येणार होती. सोसायटीने हे विमापत्र जन्मशताब्दीनिमित्त अण्णासाहेबांच्या हवाली केले. पण अण्णासाहेबांनी विमापत्राची रक्कम सोसायटीलाच देऊ केली. अण्णासाहेबांविषयी समाजाला जे अपार प्रेम वाटत होते, त्याच्याच या सर्व

अनुक्रमणिका

घटना द्योतक आहेत. भारत सरकारनं त्यांना भारतरत्न ही सर्वोच्च पदवी देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला.

शतकाचा साक्षी असलेल्या या जीवनव्रतीचा दैनंदिन कार्यक्रम या कालखंडात कसा होता हे पाहणे आवश्यक आहे. पूर्वी अण्णा पहाटे दूर फिरायला जात आणि दिवसभर त्यांची पायपीट सुरूच असे. आता मात्र अण्णा घरासमोरच्या बागेतच फेरफटका मारत असत. प्रकृती आता अशक्त झाली होती. दृष्टीही अधू झाली होती. त्यामुळे चालण्याच्या कार्यक्रमात हा बदल करावा लागला होता. एकशेएक वर्षे उलटून गेलेले अण्णा आपले धाकटे चिरंजीव दिनकरराव आणि त्यांच्या पत्नीइरावती यांच्याकडे राहात होते. रोजचे नियमित वाचन आणि रेडिओ ऐकणे याकार्यक्रमात सहसा कधी खंड पडला नाही. यामुळे अण्णा जागेवर बसूनच जगाशी संपर्क साधत असत.

जन्मशताब्दीनंतर काही महिन्यांतच अण्णांना प्रोस्ट्रेट ग्लॅण्डचा त्रास सुरू झाला. आधीही त्यांना हा त्रास होताच. पण काही दिवस इस्पितळातील उपचार घेतल्यानंतर त्यांना बरे वाटू लागले होते. यावेळी मात्र शस्त्रक्रियेशिवाय पर्याय नव्हता. पण शंभरी उलटून गेल्यानंतर शस्त्रक्रिया सहन होईल किंवा नाही, याबद्दल डॉक्टर साशंक होते. तरीही शस्त्रक्रिया झाली. अपेक्षेबाहेर शस्त्रक्रिया यशस्वी झाली. पाच महिन्यांत अण्णासाहेब पूर्ण बरे झाले. अण्णांना ऐकू येण्याचे प्रमाण खूपच कमी झाले होते. डोळ्याला मोतीबिंदू होता. त्यामुळे एकच डोळा काम देत होता. आता अण्णा हिंगण्याला भास्कररावांकडे राहात होते. कारण दिनकरराव व इरावतीबाई अमेरिकेस जाणार होते.

अण्णा हिंगण्याच्या निवासात कधी एकटे बसलेले दिसत. तर कधीकधी लहानपणी शिकलेल्या कविता मोठ्याने म्हणत बसत. कधी आपल्या दीड वर्षांच्या पणतीला, साधनेला जवळ घेऊन बसत, तर कधीकधी दूरवरच्या आकाशाकडे, पक्ष्यांकडे, झाडांच्या शेंड्यांकडे बघत वरून.

अखेरचा आजार मात्र जीवघेणा ठरला.

१८ एप्रिल १९६३ रोजी अण्णांचा १०५ वा वाढदिवस येणार होता. त्यांचा हा वाढदिवस मोठ्या थाटामाटात साजरा करण्याचे त्यांच्या सहकाऱ्यांनी आणि शिष्यांनी ठरविले होते. शतकोत्तर चार वर्षे झाली होती. बुधवार दि. ७ नोव्हेंबर रोजी पोटात दुखत असल्याची तक्रार त्यांनी केली. धन्वंतरी डॉ. यशवंतराव फाटक यांनी औषध दिलं. गुण वाटू लागला. पण ज्योत विझताना मोठी होते तसं झालं. प्रकृती क्षीण होत चालली. हालचाली मंदावल्या. गुरुवारी ८ नोव्हेंबरला अण्णासाहेब निपचित पडून होते. डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न सुरू ठेवले होते. पण आता शरीर औषधांना प्रतिसाद देईना.

शुक्रवार दि. ९ नोव्हेंबर, सूर्योदयाची वेळ … गणगोत जमलेले. आश्रमवासी विद्यार्थिनी, महिला सचिंत होऊन उभ्या … ज्या जागेत अनाथबालिकाश्रमाची स्थापना केली, त्याच जागेत सूर्योदयाला सूर्यास्त झाला. ‘मला दुसऱ्या कुशीवर वळू द्या, मला तिथं जायचं आहे’ हे अण्णांचे अखेरचे उद्गार.. आणि मग सारं शांत… हिंगणे, पुणे, महाराष्ट्र देश… शोकाकुल! शतकाचा साक्षी अनंतात विलीन झाला होता.

अनुक्रमणिका

# जीवनप्रसंग

कै. अण्णासाहेब कर्वे यांचं कौटुंबिक जीवन कृतार्थ आणि समाधानी होतं. रँगलर परांजपे यांचं घराणं म्हणजे अण्णासाहेबांचा मातृवंश आणि पितृवंश अर्थातच मुरूडचे कर्वे. अण्णासाहेबांचे वडील केशवराव कर्वे हे शांत स्वभावाचे उद्यमशील गृहस्थ होते. काथ्याचे सुंभ तयार करणे, त्यापासून गुरांची दावी किंवा रहाटाच्या माळा तयार करणे यासारखी कसबी कामे तर ते करीतच, पण चित्रेही चांगली काढत. पागोटी चांगली बांधत. मुंबईला जाऊन पगडबंदाचा धंदा करावा असं त्यांच्या मनात होतं. अण्णा कर्वे आपल्या वडिलांना 'बाबा' म्हणत. वडील बंधू भिकोबा यांना ते 'दादा' म्हणत. दादा प्राथमिक शिक्षक होते. त्यांचं बालबोध व मोडी हस्ताक्षर फार चांगलं होतं. दादांना संसारसुख फारसं मिळालं नाही. सहासात मुलं झाली. पण ती गेली. पत्नी चाळिशीतच गेली. अण्णासाहेब कर्वे यांना अंबाताई ही एक बहीण होती. त्यांच्यापेक्षा तीन वर्षांनी लहान. तिचे पती भिक्षुक होते. त्या काळच्या रीतीप्रमाणे तिनं कडक सासुरवास सोसला. तिशीच्या वयातच तिच्यावर वैधव्याची कुऱ्हाड कोसळली. परंतु धैर्याने वैधव्य पत्करून अंबाताईने आपले सारे जीवन व्यतीत केले. सतत कष्ट, विनाआळस काम ही अंबाताईची वैशिष्ट्ये होती. अण्णासाहेबांच्या अनाथबालिकाश्रमाच्या कार्यालाही अंबाताईने मदत केली होती.

आडिवऱ्याचे परांजपे घराणे हे अण्णासाहेबांचे मातुल घराणे. आडिवरे हा 'मामाचा गाव'. रँगलर परांजपे यांचे वडील पुरुषोत्तम हे मामा. अण्णासाहेबांचे सर्व पुत्र अत्यंत कर्तबगार आणि विद्याव्यासंगी होते. अण्णासाहेबांच्या वंशातील गौरीदेशपांडे या अगदी अलीकडच्या काळातील कर्तृत्ववान महिला. महर्षी अण्णासाहेब कर्वे ते र. धों. कर्वे आणि गौरी देशपांडे हा कर्वे घराण्याचा इतिहास स्त्रीस्वातंत्र्य आणि स्त्रीवादी विचाराच्या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे.

अशा अण्णासाहेब कर्वे यांचे काही जीवनप्रसंग, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू स्पष्ट करणारे आहेत.

✷ बालपणी बरीच मुलं भित्री असतात. कर्वेही तसे होते. पावसाळ्यात तळी भरली म्हणजे बरेच लोक पोहायला जात. एरवी विहिरीत पोहत. विहीर जास्त भीतिदायक. नवशिक्या माणसाला पोहण्यासाठी विहिरीत सोडायचे झाल्यास सुखडी बांधून किंवा भोपळा बांधून सोडत असत. एकदा कर्वे यांना असंच विहिरीत सोडलं. ते गटांगळ्या खाऊ लागले. कुणीतरी विहिरीत उडी मारून त्यांना बाहेर काढलं. पण पुढच्या रविवारी असंच पोहायला नेतील म्हणून अण्णासाहेब... त्यावेळचा धोंडू, काळोखात माळ्यावर लपून बसला. दिवसाही त्या माळ्यावर जाण्यासाठी दिवा न्यावा लागत असे. अशा ठिकाणी धोंडू बसला असेल असं कुणालाही वाटलं नाही. घरचे लोक धोंडूचा सर्वत्र शोध घेऊ लागले. धोंडू विहिरीत तर पडला नाही ना, असा संशय येऊन लोक मुरूडमधल्या सर्व विहिरींचा शोध घेऊ लागले. पोहण्याच्या कार्यक्रमात असणारी सर्व मंडळी पोहून आपापल्या घरी पोचली. दोन प्रहरीची जेवणाची वेळही टळून गेली होती. मग धोंडू माळ्यावरून खाली आला. यानंतर मात्र पोहण्याच्या बाबतीत त्यांना घरच्यांनी अथवा मित्रांनी मुळीच आग्रह केला नाही. या प्रसंगावरून धोंडूची भित्री वृत्ती दिसून आली तरी त्यांची सहनशीलता व कृतनिश्चयही दिसून येतो. कारण अंधाऱ्या माळ्यावर तासन्तास बसून राहणं ही गोष्ट खरोखरीच अवघड होती.

अनुक्रमणिका

✷ प्रौढ विद्यार्थिदशेत मुंबईला अण्णा शिकवण्या करीत. मिळणारे शिष्यवृत्तीचे पैसे आणि शिकवण्यांचे पैसे यातील एक रुपयास एक पैसा याप्रमाणे अण्णा बाजूला काढून ठेवत असत. अशातऱ्हेने तीन रुपये जमेपर्यंत अण्णांनी त्या पैशांना हात लावला नाही. ज्यांच्या खाणावळीत अण्णा जेवायला जात असत, ते नागोपंत दातार क्षयानं आजारी पडले. मुरूडला ते आपल्या घरी आले. मुंबईत असताना नागोपंतांनी अण्णांकडून पाच रु. उसने घेतले होते. ते दातार स्वतः, त्यांच्या पत्नीर आणि त्यांची आई, तिघेजण मुंबईत होते. त्यांनी खाणावळ बंद करून मुंबई सोडली. अण्णा सुटीसाठी मुरूडला आले, तेव्हा नागोपंतांच्या समाचाराला गेले. नागोपंत ओशाळले. कारण ते पैसे देऊ शकत नव्हते. अण्णा मृदु आवाजात त्यांनाम्हणाले-

“तुम्ही माझे पाच रु. देणे आहात ते मागायला मी आलो नाही. ते पैसे फिटले असं समजा. आज मीच तुम्हाला आजारात मदत म्हणून आणखी पैसे देणार आहे. हे तीन रुपये घ्या.” नागोपंतांचे डोळे कृतज्ञतेनं भरून आले. त्यांच्या व त्यांच्या कुंटुंबीयांच्या चेहऱ्यावरील भाव पाहून अण्णांनाही अतीव समाधान झालं. अडचणीच्या वेळी दुसऱ्याला मदत करण्यात अवर्णनीय आनंद असतो हे अण्णांनी स्वतः अनुभवले; आणि पुढे याबाबत इतरांचे प्रबोधन केले.

✷ अण्णांचं लग्न पंधराव्या वर्षी झालं. पत्नी राधाबाई नऊ वर्षांची. राधाबाईची चुलती ही अण्णांची मामेबहीणच होती. त्यामुळे दोन्ही घरांची पूर्वीची ओळखच होती. राधाबाई आणि अण्णा इतर मुलांबरोबर मुरूडमध्ये एकत्र खेळलेसुद्धा होते. कर्वे यांच्या घरात वातावरण तसे मोकळे होते. मात्र त्याकाळी वडील माणसांचा मुलांना खूपच धाक वाटत होता. अण्णा मुंबईला नोकरीसाठी गेले. घरी राधाबाई आणि अंबाताई होत्याच. अण्णा सुट्टीला घरी आले म्हणजे पत्नी राधाबाई आणि बहिण अंबाताई या दोघींना लिहिणे वाचणे आवर्जून शिकवत. कर्वे यांच्या आईवडिलांनी याबाबत कधीही विरोध केला नाही. अण्णा मुंबईला जात, तेव्हा भिकूदादांच्या मदतीने राधाबाई आणि अंबाताई या दोघींनीही आपला अभ्यास सुरू ठेवला होता. अठराव्या वर्षी रघुनाथाचा जन्म झाला आणि राधाबाईच्या शिक्षणात थोडा खंड पडला. मुंबईला राधाबाई आल्या. संसार चालविण्यासाठी अण्णा आणि राधाबाई, दोघांनाही भरपूर कष्ट करावे लागत. पहाटेपासून रात्रीपर्यंत निरनिराळ्या शाळांमध्ये अध्यापनासाठी व इतरत्र शिकवण्या घेण्यासाठी अण्णा जात. त्यांचे वेळापत्रक राधाबाई काटेकोरपणे सांभाळत असत. रघुनाथ लहान होता. राधाबाई शांत, सोशिक व कमालीच्या आज्ञाधारक होत्या. अण्णांनी पुढे जे शिक्षणविषयक विविध प्रयोग केले, त्यांची सुरुवात त्यांनी आपल्या घरापासूनच केली होती. राधाबाईना मुंबईलाही घरचे काम बरेच असे. तरीही त्या इंग्रजी शिकल्या. लहानग्या रघुनाथाला घरीच शिकवावं असं या दोघांनी ठरवलं. राधाबाई स्वतः त्याला शिकवत. आणि त्यानंतर अण्णांनी एक वेगळाच निर्णय घेतला. अण्णांचे स्नेही बाळकृष्णपंत आचवल हे मुरूडजवळच्या बुरोंडी गावी मुख्याध्यापक होते. अण्णांनी राधाबाईच्या संमतीने रघुनाथाला आचवलांकडे शिकण्यासाठी ठेवल. रघुनाथ पाचवी इयत्ता उत्तम रीतीने उत्तीर्ण झाल्यावर अण्णांनी पुन्हा त्याला मुंबईला आणलं. अण्णांनी शिक्षणातील प्रयोगशीलता घरापासूनच सुरू केली होती याचे हेउदाहरण.

✷ अण्णांचा थोरला मुलगा रघुनाथ म्हणजेच नंतर प्रख्यात झालेले र. धों. कर्वे. रघुनाथाची मुंज करावयाची होती. अण्णांच्या पत्नी, आई आणि थोरले बंधू या सर्वांना असं वाटत होतं की मुंज थाटात व्हावी. पहिला मुलगा आहे. हौसमौज करावी. चार लोकांना बोलवावं. जेवणावळी कराव्यात. अण्णा आपल्या आईला नम्रपणे म्हणाले, “आई, मुंजीची जेवणावळ ही मला उधळपट्टी वाटते. आपण थोडक्यात मुंज लावू या.”आई थोडी नाराज झाली. तिला नातवाची मुंज हौसेनं व्हावी असं वाटत होतं.

“अरे धोंडू, जनरीत पाळावी रे बाबा. हौसमौज नाही. अहेर नाही, ही कसली मुंज?”

“आई, लोक काय म्हणतील या काळजीनं तू असं म्हणतेस हे मला ठाऊक आहे. तुझी श्रद्धा आहे तर धार्मिक संस्कार आपण उत्तम रीतीने करू. त्याबाबत तडजोड नाही. पण बाकीच्या गोष्टीत बचत करू या.”

“बघ बाबा, तुला पटेल ते कर.”आईनं विरोध केला नाही, तरी तिला मनातून पटलेलं नसावं.

“आई, यात मी पैसे वाचवतो असं तू वाटून घेऊ नको. माझी काही तत्त्वं आहेत.”

“ठीक आहे. तुझी तत्त्वं आम्ही पाळू.”आईनं होकार दिला.

अण्णांनी मुंजीचा सोहळा मुंबईत केला. त्याला खर्च फक्त १५ रु. आला. ३०० रु. वाचले हे वाचलेले ३०० रु. अण्णांनी मुरूड फंडाला दिले. या घटनेवरून अण्णांची जीवनसृष्टी किती समाजाभिमुख होती हे दिसून येते.

✷ उत्तरआयुष्यात शिक्षणक्षेत्रात मोलाचे आणि भरीव कार्य करणारे कर्वे कलेचे भोक्ते होते हे अनेक प्रसंगावरून दिसून येते. कोकणातल्या मंडळींना जात्याच नाटकाची आणि गाण्याची आवड असते. कर्वे यांनाही तशी ती होती. उन्हाळ्याच्या सुट्टीत धोंडोपंत मुरूडला आले की, त्यांना अधिक आनंद होई. याचं कारण नाटक. लहानपणापासून त्यांनी नाटकात कामं केली होती. त्यांचे वडील केसोपंत यांना मुलांनी नाटकात काम केलेलं आवडायचं नाही. पण धोंडोपंतांनी वडिलांना ही गोष्ट पटविली. पुण्यासारख्या शहरात आणि डेक्कन कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांना नाटकात काम करायला उत्तेजन दिले जाते हे त्यांनी वडिलांना सांगितले. नाटक बसविण्यात धोंडोपंत पुढाकार घेत असत. एकदा धोंडोपंतांनीमुंबईहून येताना नाटकाचे दोन पडदेही आणले होते. नाटकात नांदीतील गणपतीची भूमिका ते घेत. ते संस्कृतमध्ये चांगले बोलत. संस्कृत संवादांची रचनाही करीत. एकदा त्यांनी पडद्याआडून राधेचा संवाद म्हणून वाहवा मिळवली होती. ‘वेणीसंहार’ या नाटकात त्यांनी अश्वत्थाम्याची भूमिका केली होती. या भूमिकेबद्दलही त्यांची प्रशंसा झाली होती. उत्तर आयुष्यातही, जीवनाच्या संध्याकाळी अण्णा खणखणीत आवाजात श्लोक व पदे म्हणत असत. अण्णांच्या सामाजिक जाणीवेनं संपन्न असलेल्या मनाचा हा कलाविष्कार लक्षणीय आहे. अण्णा स्वतःशी अनेक वेळा किंवा भाषणांतही एका पदाचा वारंवार उल्लेख करीत. ते पद कधी गातही. हे पद रचले होते सीतारामपंत देवधर यांनी. या पदात विधवांच्या दुःस्थितीबद्दलचे वर्णन आहे. अण्णा ज्यावेळी हे पद म्हणत, तेव्हा ऐकणारा त्यातील आशयामुळे तर विचारमग्न होतच असे. पण अण्णा पद म्हणताना ज्या तन्मयतेने म्हणत असत, ती त्यांची तन्मयता ऐकणाराला एकाग्र करीत असे. ते पद असे होते-

“माता श्रमली प्रतिदिन ज्याते न्हाउनि माखुनि वाढविता;  
त्या केशांते का हो चरचर नापितहस्ते कापविता?  
पुरे गांजणुक कींव येउ द्या, अनाथ भगिनींची आता,  
पुनर्विवाहा संमति द्या हो सांडुनि मनिची निर्दयता!”

अनुक्रमणिका

✵ अण्णांनी मुंबईत १३ वर्षे काढली. निरनिराळ्या शाळांमध्ये नोकरी, शिकवण्या यात ते मग्न असत. साधी राहणी आणि एकमार्गी जीवन यामुळे थोड्या खर्चात त्यांचा संसार भागत असे. मात्र एकदा वेषांतर करण्याचा प्रसंग उद्‌भवला. युरोपियन मुलांच्या शाळेत ते शिकवायला जात असत. तरीही त्यांचा पोशाख पूर्वीसारखाच होता. धोतर, पार्शी पद्धतीचा लांब कोट, डोक्यावर रुमाल आणि पायात बूट याच वेषात ते जात असत. त्याकाळी मुंबईत बरेच सुशिक्षित लोक पाटलोण (पँट) वापरीत. अण्णांनी तर पाटलोणीचा विचारही केला नव्हता. त्यांच्या शाळेच्या मुख्याध्यापकानं त्यांना एकदा सुचवलं, “धोतराऐवजी तुम्ही पाटलोण घाला.”मुख्याध्यापकांची सूचना म्हणजे अगदीच आज्ञा नसली तरी तिचा विचार करणंही आवश्यक होतं. पाटलोण वापरण्याच्या या सूचनेमुळं खरं तर अण्णा दचकलेच होते. कारण त्यांनी पँटचा वापर पूर्वी कधीच केला नव्हता. मुख्याध्यापकांची सूचना न मानावी, तर त्यांचा अवमान! केवळं ‘पँट की धोतर’ या विषयावर अण्णांचं चार दिवस चिंतन चाललं होतं. आणि मग त्यांच्या मनानंठरवलं. ‘प्रयोग तर करून पाहू या...’ पण यासाठी नवीन पँट आणण्याऐवजी अण्णांनी दुसराच एक मार्ग शोधला. त्यांनी आपल्या एका मित्राकडून चार दिवसांसाठी एक पँट वापरायला आणली. ती वापरून बघितली. आणि मग अण्णांच्या मनानं पँटला हिरवा कंदिल दिला. “ठीक जमतंय आपल्याला पँटमध्ये “असं वाटल्यावरच त्यांनी पाटलोणी (पँट) शिवायला टाकल्या. तेव्हापासून अण्णांचा पोशाख झाला. लांब कोट आणि रुमाल.

विधवाविवाहाच्या प्रश्नाबाबत एवढी खंबीर भूमिका घेणारे अण्णा पँट की धोतर या वेषांतराबाबत इतके हळवे कसे, असा प्रश्न अनेकांना पडेल. तो अण्णांच्या काटकसरी स्वभावाचा भाग होता. त्यांना कुठलाही भपका नको असे. सोय महत्त्वाची.

✵ मुंबईच्या शाळेत विद्यार्थी म्हणून अण्णा दाखल झाले होते. तेव्हाचा एक प्रसंग अण्णांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणारा आहे. अण्णांचं शिक्षण शिष्यवृत्तीवर चाललं होतं. आपलं अक्षर सुंदर करण्यासाठी त्यांनी नेटानं प्रयत्न केला. अण्णा इतकं चांगलं अक्षर काढू लागले की, त्यांच्या इंग्रजी शिक्षकानेही त्यांना ‘गुड्’ असा शेरा दिला. पण काही मत्सरी सहाध्यायांना हे बघवले नाही. एका विद्यार्थ्यानं तक्रार केली की, हेअक्षर धोंडू कर्वे यांचं नाहीच. त्यानं दामले नावाच्या सहाध्यायाकडून हे लिहून घेतलं आहे. शिक्षक स्वभावानं उग्र होते. त्यांना हे समजलं, तेव्हा त्यांच्या रागाचा पारा एकदम वर गेला. त्यांनी कर्वे  आणि दामले या दोन्ही विद्यार्थ्यांच्या वह्या मागविल्या. एकत्र निरखून पाहिल्या. दोन्ही अक्षरं जवळजवळ सारखीच होती. त्यांनी प्रथम दामले याला विचारलं, “ही कॉपी तू काढून दिलीस?”

“नाही, मी नाही कॉपी काढून दिली.”दामलेनं ठासून उत्तर दिलं.

“कर्वे, ही कॉपी तुझीच का?तूच काढलीस का?”शिक्षकांनी दरडावून विचारलं.

अण्णांची भीतीनं गाळण उडाली. त्यांच्या तोंडून शब्द निघेना. निर्दोष असूनही केवळ बोलता न आल्यामुळे शिक्षा होणार याचं अण्णांना मनस्वी दुःख झालं. शिक्षक अधिकच रागावले. कर्वे बोलत नाही त्या अर्थी त्यानं दुसऱ्याकडून कॉपी लिहून घेतली असंच शिक्षक समजले. मग तर त्यांनी वेताची छडी मागवली. अण्णांचं वय त्यावेळी २१ वर्षांचं होतं....

न केलेल्या गुन्ह्याची शिक्षा भोगावी लागणार या विचारानं त्यांच्या मनात काहूरमाजलं आणि त्यांनी एकदम आपल्या कपाळाच हात लावला. आणि छडीसाठी हात पुढं केला. पण त्यांच्या या कृतीचा शिक्षकाच्या संवेदनशील मनावर परिणाम झाला. त्यांनी वेताच्या छडीच्या शिक्षेचा पुनर्विचार केला आणि विचारलं-

"तू पुन्हा कॉपी काढून दाखवतोस का कर्वे?"

"होय दाखवतो."कर्वे कसेबसे म्हणाला.

अण्णांनी कॉपी घेतली आणि पुन्हा मजकूर लिहून दाखवला. शिक्षकांसमक्षच त्यांनी तो मजकूर पुन्हा लिहिला. त्यामुळे संशयनिवृत्ती झाली. कर्वे यांचा प्रामाणिकपणा सिद्ध झाला. मत्सरी व तक्रारखोर विद्यार्थ्याला आपोआपच धडा मिळाला. अण्णा दोषमुक्त झाले. प्रथमतः ते भीतीनं गांगरून गेले होते, तरी त्यांनी असल्याचा स्वीकार केला नाही. सत्यासाठी शिक्षेला सामोरे जाण्याची तयारी ठेवली आणि त्यांच्या अगतिकतेनं कपाळावर हात मारण्याच्या क्रियेमुळेच शिक्षकाचे मतपरिवर्तन झाले. सत्याचा विजय झाला.

✹ अण्णासाहेब कर्वे यांना आपल्या आयुष्याच्या वाटचालीत अनेक परस्परविरुद्ध घटनांना व अनुभवांना सामोरे जाण्याची वेळ आली.तशाही प्रसंगात ते डगमगले नाहीत. प्रिन्सिपॉल वामन आबाजी मोडक हे मुंबईतील एल्फिन्स्टन हायस्कूलचे प्रमुख होते. मोडक रत्नागिरीस असताना कर्वे त्यांच्याच घरी विद्यार्थी म्हणून राहिले होते. एल्फिन्स्टनमध्ये शिक्षकाच्या दोन जागा रिकाम्या आहेत हे समजले, तेव्हा कर्वे मोडक यांना भेटावयास गेले. मोडक त्यांची मुलाखत घेऊ लागले. मोडक अण्णांना जवळजवळ दरडावूनच प्रश्न विचारीत होते.

"तुम्ही शाळेत पूर्वी कधी शिकवलं आहे का?"

"नाही."

"मग शिकवू शकाल असं वाटतं का?"
"हो"

"अहो, चाळीस मुलं असतात वर्गात. त्यांच्यावर तुम्ही कसा ताबा ठेवू शकाल?"

"मी प्रयत्न करीन."

"पण कसा करणार?तुमच्यासारखा पोरसवदा माणूस..."

"मला संधी द्या. अनुभवानं शिकेन."

"छे छे, तुम्हाला अनुभव काहीच नाही. आणि दिसता लहानखुरे. तुम्हाला माझ्या शाळेत शिक्षक म्हणून घेता येणं शक्य आहे असं मला वाटत नाही."मोडक म्हणाले.

अनुक्रमणिका

अनुभव नाही म्हणून नोकरी नाही आणि नोकरी नाही म्हणून अनुभव नाही, अशा दुहेरी अडचणींच्या चक्रात सापडलेले कर्वे निराश झाले; आणि ते मुंबईला समुद्रकिनाऱ्यावर जाऊन बसले. सागराच्या उसळत्या लाटा पाहून त्यांच्या मनाला हुरूप आला. निराशा नाहीशी झाली; आणि त्याचं मन त्यांना म्हणालं, "अजून प्रयत्न कर."

मग कर्वे सरळ गेले एल्फिन्स्टन कॉलेजच्या प्रिन्सिपॉलकडे. त्यावेळी प्रो. हेथर्नथ्वेट हे प्रिन्सिपॉल होते. कर्वे त्यांचे शिष्यच. एल्फिन्स्टनमध्ये प्रो. हेथर्नथ्वेट यांनीच त्यांना गणित शिकवलं होतं. कर्वे यांची गणितातील गती प्राचार्यांना चांगली माहीत होती. हेथर्नथ्वेट यांनी कर्वे यांचं चांगलं स्वागत केलं... आणि काय आश्चर्य..

दोन दिवसांनी मोडकांकडून कर्वे यांना बोलावणं आलं.

कर्वे जाऊन भेटले. कर्वे याची एल्फिन्स्टन हायस्कुलात नेमणूक झाली होती. कर्वे शाळेत रुजू झाले. त्यांना चौथीच्या वर्गावर पाठवण्यात आलं. कर्वे यांनी अत्यंत आत्मविश्वासानं तास घेतला आणि कर्वे मोडकांच्याही परीक्षेला उतरले.

प्रि. मोडक यांची आणि कर्वे यांची रत्नागिरीची ओळख. पण मोडक यांनी कर्वे यांना फार मोठ्या कसोटीच्या प्रसंगास तोंड द्यायला लावलं. प्रो. हेथार्नथ्वेट यांनी मात्र त्यांच्याबाबत अत्यंत आपुलकी दाखविली.

एक वर्षानंतर मोडक यांनीच कर्वे यांना नोकरीवर पुन्हा घेण्याची आणि नोकरी कायम करण्याची तयारी दर्शविली. पण सरकारी नोकरीत फार काळ अडकून राहायचं नाही असे कर्वे यांनी ठरवलं होतं. त्यामुळे त्यांनी मोडक यांना नम्र नकार दिला.

✺ मुंबईच्या वास्तव्यात अण्णांनी 'संयुक्त कुटुंब' हा एक प्रयोग करून पाहिला.एकत्र कुटुंब पद्धती ही त्या काळी अस्तित्वात होतीच. पण दोन वेगळी कुटुंबे एकत्र राहून कारभार करतील तर काटकसर होईल; आणि एकमेकांना मदत होईल, असे अण्णांच्या मनाने घेतले. त्यांचे मित्र नरहरपंत जोशी हे मूळचे कोकणातलेच. जोशी-कर्वे एकत्र राहू लागले. एरवी एकत्र कुटुंबातही भावाभावांचे पटते पण जावाजावांचे पटत नाही अशी स्थिती होती. मग इथे तर जावाही नाहीत आणि भाऊही नाहीत. तरीही जोशी-कर्वे सुमारे सात वर्षे एकत्र राहिले. सुमारे पंधरा माणसांचे हे संयुक्त कुटुंब होते. कोणी बाजार करी तर कोणी जमाखर्चकरी. स्वयंपाकघराचा कारभार राधाबाईच्या नेतृत्त्वाखाली स्त्रिया सांभाळत. सर्वांसाठी म्हणून एकच मोठी जागा घेतली होती. जागेचे भाडे दरमहा आठ रु. होते. जेवणाखाण्याचा खर्च सरासरी दरमाणशी दरमहा ५ रु. १ आणा असा होता. स्वस्ताई होती. त्यात काटकसर. दोघांचीही चांगली बचत झाली. या सात वर्षांत कुणाचं भांडण नाही की, कुणाचे वादविवाद झाले नाहीत. सर्वजण गुण्यागोविंदाने राहिले. 'पण या सुखाचं श्रेय आमच्या बायकांना आहे' असं अण्णा नेहमी अभिमानानं सांगत. संयुक्त कुटुंबातील १५ माणसांपैकी ८ जण अण्णांच्या कुटुंबातलेच होते. अण्णा स्वतः, त्यांच्या पत्नी राधाबाई, मुलगा रघुनाथ हे तिघेजण. पण अण्णा स्वतः गरिबीतून विद्याभ्यास करून ऊर्जितावस्थेला आलेले होते. स्वाभाविकपणेच ते इतर होतकरू मुलांना विद्याभ्यासासाठी ठेवून घेत. अशी कुटुंबातलीच व परिचयातली चारदोन मुले सतत त्यांच्याकडे शिक्षणासाठी असत. रँगलर र. पु. परांजपे हे त्यापैकीच एक. अण्णांचा

स्वतःचा मुलगा रघुनाथ आणि मामेभाऊ रघुनाथ; या रघुनाथांनी पुढे समाजात आपले विशिष्ट स्थान निर्माण केले. अण्णांचा संयुक्त कुटुंबाचा हा प्रयोग विद्यमान काळात कालबाह्य वाटत असला, तरी येणाऱ्या परिस्थितीचा विचार करता संयुक्त कुटुंबपद्धतीचा विचार करणे आवश्यक आहे असे काळच सांगेल.

✷ वयाच्या ३३ व्या वर्षी अण्णा विधुर झाले. पत्नी राधाबाई यांचं निधन झाले. एक मुलगा रघुनाथ. अशावेळी अण्णांनी पुनर्विवाह करायला हवा, असं नातेवाईक, मित्र यांना वाटत होत. अण्णांनाही पुनर्विवाह करायचं ठरवलं होतं. पण विवाह करायचा तो विधवेशीच असाही त्यांनी निश्चय केला होता. त्यांचे स्नेही नरहरपंत जोशी यांची एक बहीण होती. नाव तिचं गोदावरी. गोदावरीचं ८ व्या वर्षी लग्न झालं आणि तीन महिन्यांतच पति निधन झाल्यामुळं ती विधवा झाली. त्याकाळच्या रीतीप्रमाणे केशवपन झालं. समाजात मिसळायला अडसर येऊ लागला. गोदावरीच्या वडिलांनी तिची ही दुःस्थिती दूर करायचं ठरवलं. ते स्वतः सुधारक मताचे होते. ते अस्पृश्यांना पाणी देत. शिवाशीव मानत नसत. नरहरपंत जोशी यांनी आपल्या वडिलांची भावना ओळखून गोदावरीला मुंबईला नेलं आणि पंडिता रमाबाई यांच्या शारदा सदनात तिला दाखल केलं. गोदावरी ही शारदा सदनातील पहिली व एकटी विद्यार्थिनी. पं. रमाबाईंनी गोदावरीला पुनर्विवाहाबाबत विचारलं. गोदावरीनं नकारच दिला. एकदा शिवरात्रीच्या दिवशी गोदावरी शारदा सदनाच्या बागेला पाणी घालत होती. ‘गोदे’ अशी हाक ऐकू आली. वडील आलेहोते. गोदावरीचे बाबा आणि गोदावरी बागेत बोलत बसले होते. ते एकदम म्हणाले.

“गोदू, आज मी तुला एक महत्त्वाचा प्रश्न विचारणार आहे.”

“विचारा नं बाबा.”

“गोदे, धोंडू कर्वे विधुर आहे. त्याला लग्न करायचंय ते विधवेशीच करायचंय. माझ्या मनात फार येतं. तुझं लग्न धोंडू कर्वेशीच व्हावं.”

“बाबा मनापासून बोलताय?”

“होय, अगदी मनापासून, धोंडोपंताशीही मी तुझं नाव न घेता बोललोय.”

“बाबा, पण... सर्व विचार करा. पंडिता रमाबाईंना विचारलंत?”

“विचारतो. त्यांची तर संमती असेलच असं वाटतं.”

गोदावरीच्या बाबांनी पंडिता रमाबाईंच्या कानावर ही गोष्ट घातली. रमाबाईंनी विरोध केला. पण तो विधवाविवाह किंवा पुनर्विवाह म्हणून नव्हे. कर्वे यांची प्रकृती अगदीच बेताची दिसत होती. ते कृश होते. एक वर्षभर थांबण्याचा सल्ला रमाबाईंनी दिला. अखेर लग्न झालं तेव्हा कर्वे ३५ वर्षांचे व गोदूताई २७ वर्षांच्या होत्या. गोदावरीचं नाव ‘आनंदी’ असं ठेवण्यात आलं. ११ मार्च १८९७ रोजी हा विवाह विधिपूर्वक साजरा झाला. डॉ. रा. गो. भांडारकर यांच्या बंगल्यातच विवाह झाला. ३०-४० विद्वान सुधारक जमले होते. दुपारी भोजनाचा कार्यक्रम होता. संध्याकाळी पं. रमाबाई यांनी शारदासदनात मोतीचूर लाडवांची मेजवानी दिली. मुलींनी अभिनंदनाची पदे म्हटली. विद्वानांनी भाषणे केली. सुधारक गोपाळ गणेश

आगरकर यांनी या दांपत्याला घरी भोजनास आमंत्रित केले. आगरकरांच्या पत्नीने आनंदीबाईंची खणानारळाने ओटी भरली. अशातऱ्हेने अण्णांचा हा पुनर्विवाह गाजला. मुरूड गावी त्यांच्यावर बहिष्कार टाकण्यात आला. पं. रमाबाईंच्या दृष्टीने कृश असलेले अण्णासाहेब पुढे शतायुषी ठरले हा विशेष योग!

✷ आनंदीबाई तथा बाया कर्वे आणि अण्णासाहेब कर्वे यांना पुनर्विवाहामुळे बाहेरच्या लोकांकडून जेवढा त्रास झाला, तेवढाच काही जवळच्या लोकांकडून झाला. उपेक्षा तर कपाळी लिहिलेलीच होती. अण्णासाहेबांची मेव्हणी पार्वतीबाई आठवले या अण्णांच्या कार्यात मनापासून सहभागी झाल्या होत्या. पार्वतीबाईंनी अनाथबालिकाश्रमाच्या स्वयंपाकघराची जबाबदारी प्रथम घेतली. आणि मग त्या सर्वदृष्टींनी आश्रमकार्याशी समरस झाल्या. सुरुवातीला अण्णासाहेब पुण्यातून हिंगण्याला चालत जाऊन आश्रमाचे कार्य बघत असत. पण नंतर त्यांनी असे ठरवलं की, हिंगण्यालाच येऊन राहायचं. त्यावेळी त्यांचा मुलगा दिनकर चारवर्षांचा होता. शंकरही होताच. आश्रमाकडे त्यावेळी एक बैलगाडी होती. त्यामुळे पुण्याला येणेजाणे सोपे होते. एकदा मात्र अण्णा आणि शंकर बैलगाडीनं पुण्याला येत असताना लकडी पुलावर (संभाजी पूल) गाडी उलटली. अण्णांना फारसं लागलं नाही. शंकरला मात्र बराच मुका मार लागला. बिऱ्हाड हलविण्याच्या अण्णांच्या सूचनेला होकार दिल्यामुळेच हे संकट ओढवले असं बाया कर्वे यांना वाटलं.

हिंगण्याला कर्वे कुटुंबातील सर्वचजण आश्रमाच्या भोजनगृहात जेवण घेत. तेथील कार्यकर्त्यांबरोबर बायाही भोजनव्यवस्थेचे काम बघत असत. पण असं असूनही जेवणाच्या वेळी मात्र बायाची पंगत वेगळी होती. बाया कर्वे विधवा होत्या. आणि त्यांनी पुनर्विवाह केला आहे ही गोष्ट आश्रमवासी लोक विसरू शकत नव्हते. आश्रमसंस्थापकांच्या पत्नी किंवा आश्रमाची एक व्यवस्थापिका या त्यांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेपेक्षा पुनर्विवाहित विधवा ही भूमिकाच लोकांच्या मनातून जात नव्हती. बायाचे पान पंक्तीत वेगळे मांडले जाई आणि बायाने स्पर्श केलेले पाणी इतर आश्रमवासीय पीत नसत. आपल्या पतीच्या ध्येयनिष्ठेसाठी बाया आपली ही उपेक्षा मूकपणे सहन करीत असे. लोकांकडून आपल्याला सहानुभूती मिळणार नाही हे बायाला चांगले ठाऊक होते. दुःख गिळणे हेच त्यांच्या हातात होते. आणि हीच बाया कर्वे पुण्याला नारायण पेठेत जेव्हा रहात होती, तेव्हा दारी येणाऱ्या गरीब लोकांना अन्न, ताक, जुने कपडे देत असे. बायाचा हा करुणामय उदार स्वभाव अण्णांना जाणवला होता. ज्या लोकांना बाया मदत करीत असे, त्यामध्ये अनेक लोक धनगर होते. अस्पृश्य होते. त्यांच्या बायका बायाला सदैव दुवा देत. स्वतःच्या मुलांशी … शंकर वा दिनकरशी… बाया जितक्या आपुलकीनं, प्रेमानं वागत असे, तितक्याच आपुलकीनं बाया या गरजू लोकांच्या मुलांशी वागे. अण्णांना बायाचं हे वागणं आवडत असे. त्याच बायाला स्वतःच्या संस्थेत केवळ रुढीप्रियतेमुळे उपेक्षेची वागणूक मिळते हे पाहून अण्णा मनोमन दुःखी होत. पण सहन करण्यापलीकडे त्यांनाही त्यावेळी काही करता येत नव्हतं. आगामी काळासाठी अण्णा थांबून राहिले होते.

✷ अनाथबालिकाश्रमासाठी मदत गोळा करताना अण्णांनी कधी मोठी रक्कम वा छोटी रक्कम असा भेद केला नाही. निधी गोळा करणाऱ्या एका मुलीला एका स्त्रीनं चारच आणे दिले. हे पैसे कसे द्यावेत असं त्या मुलीला वाटलं. अण्णांच्या कानावर ही गोष्ट गेली. तेव्हा त्या मुलीला बोलावून त्यांनी सांगितलं… “चार आणेही खूप आहेत. कारण देण्याची भावना ही काय दिलं यापेक्षा लाखमोलाची आहे.”अण्णांचं हे सूत्र घेऊनच पार्वतीबाई आठवले यांनी महाराष्ट्रात हिंडून निधी गोळा केला. आश्रमातील एक मुलगी सुटीसाठी खांडव्याला जाणार आहे हे समजल्यावर पार्वतीबाई तिच्याबरोबर खांडव्याला गेल्या. तिथं त्या अनेकांना भेटल्या. एक मध्यमवयाची सोवळी विधवा गावात फिरून लोकांना भेटते हे दृश्य त्या गावाला

नवीन होते. आपल्या कार्यासाठी पार्वतीबाईंना सभा घ्यायची होती. पण बऱ्याच लोकांनी त्यांचा उपहास केला. मात्र एक इनामदार गृहस्थ तयार झाले. त्यांच्या घरी पानसुपारीसाठी १०-१२ मंडळी जमली असता पार्वतीबाई तिथं गेल्या आणि त्यांनी बोलायला सुरुवात केली. या सभेत १३ रु. जमले. पुढं त्या अशाच अन्य गावी गेल्या. परत आल्यावर त्यांनी अण्णांच्या हाती ५०० रु. ठेवले.

राजपुतान्यातील टोक नावाच्या एका संस्थानात पुण्याचे दामोदरपंत फाटक अनेक वर्षे नोकरीला होते. सेवानिवृत्तीनंतर सामाजिक कार्यात लक्ष घालावे असा त्यांचा विचार होता. त्यांचा डॉक्टर असलेला मोठा मुलगा प्लेगनं वारला. स्वतःची सून विधवा झाली याचं दुःख दामोदरपंतांना झालं आणि कर्वे यांच्या कार्याची महती त्यांना अधिकच पटली. मुलाच्या मृत्यूच्या तिसऱ्याच दिवशी दामोदरपंत कर्वे यांनी भेटण्यासाठी हिंगण्याच्या आश्रमात गेले होते. त्यावेळी आश्रमात अण्णा नव्हते. दामोदरपंत आपला पत्ता देऊन गेले होते. अण्णा त्यांचा पत्ता शोधीत स्वतः गेले. दामोदरपंतांनी आपली दुःखद कहाणी सांगितली. दामोदरपंत पुन्हा दुसऱ्या दिवशी आश्रम बघायला आले. घरी आल्यावर त्यांनी आपली पत्नी यशोदाबाई यांना आश्रमाविषयी माहिती दिली. आणि मग एक दिवस दामोदरपंत आणि यशोदाबाई उभयता आश्रमात आले. त्यांनी आश्रमाला ५०० रु. देणगी दिली. आणि भावना वेगानं ते म्हणाले “आमच्या रामेश्वर यात्रेसाठी आम्ही ही रक्कम वाचवली होती. आश्रमासाठी या रकमेचा स्वीकार तुम्ही केलात तर ही रक्कम सत्कारणी लागली असं आम्हाला वाटेल.

दामोदरपंतांच्या या भावनेसारखीच अनेकांची भावना आश्रमाबाबत होती. १९०१ सालच्या डिसेंबर महिन्यात मुंबईतील चाळीचाळीतून लहानलहान सभा अण्णांनी घेतल्या. या सभानां १० पासून ५० पर्यंत मंडळी उपस्थित असत. या चाळीतून जी वर्गणी जमा झाली, तिचे आकडे आजच्या काळात हास्यास्पद वाटतील. पण तेव्हा ती क्षुल्लाक वर्गणीही अण्णांना स्वीकार्यच वाटत होती. ग्रँटरोडच्या भाटवडेकरांच्या चाळीतून ७ रु. सदाशिव गल्लीतील शेंड्यांची चाळआणि मंगळदास वाडीतील स्टूडंट्स लॉज या ठिकाणी तर त्यांनी प्रत्येकी १ रु. मिळाला. कांदेवाडीच्या मनोरंजन ऑफिसमध्ये ११ रु. ८ आणे मिळाले. मुगभाटातल्या माधवदास प्रेमजी चाळीत ७ रु. ८ आणे तर गिरगावातल्या पेंडशांच्या चाळीत तीन रु. आठ आणे मिळाले. त्या काळातील भ्रमंती व सभा यामध्ये सर्वात जास्त रक्कम एका दिवशी जमली ती २५ रु. वांद्रे येथील के. नटराजन् यांच्या घरी जी सभा होती तीमध्ये ही रक्कम मिळाली. ‘थेंबे थेंबे तळे’ निर्माण करणारी अण्णांची ही भ्रमंती होती.

# भारतरत्न

कोकणच्या रत्नभूमीतून जन्माला आलेले महर्षी अण्णासाहेब कर्वे शतायुषी झाले आणि शतकमहोत्सवाच्या वर्षीच त्यांना 'भारतरत्न' ही भारतीय प्रजासत्ताकातील सर्वोच्च बहुमानाची पदवी प्रदान करण्यात आली. जीवनातील महत्त्वाच्या कालखंडात वणवण करीत हिंडून महर्षींनी पैपै गोळा केली. ती समाजकार्यासाठी वेचली आणि इतरांच्या आयुष्यातील वणवण कमी व्हावी म्हणून अथक प्रयत्न केले. या भारतरत्नाची जीवनसरिता सतत खळाळती होती, वाहती होती. तिला कुठं खंड नव्हता की, आत्ममग्नतेचा डोह नव्हता. नदी जशी संथ वाहताना दुतर्फा काठावरील जीवन शांत करीत जाते, समृद्ध करीत जाते तसं अण्णासाहेबांचं जीवनकार्य होतं.

अण्णांनी जीवनात निर्माण झालेली वादळंही शांतपणे ओंजळीत झेलली. पुनर्विवाहामुळे जी मनस्वी उपेक्षा वाट्याला आली, मुरूडकरांनी त्या काळातल्या जनरीतीप्रमाणे जी मानहानीकारक वागणूक दिली, तीही त्यांनी मूकपणे सहन केली. कधी कधी सहकारी मिळाले, कधी न मिळाले. 'एकला चलो रे' या तत्त्वाप्रमाणे अण्णा चालत राहिले.

अण्णांचा संसारवृक्षही फळाफुलांनी बहरला. प्रथम पत्नी राधाबाईचा मुलगा रघुनाथ परदेशी जाऊन शिकून आला. तो प्रोफेसर झाला. पण त्याहीपेक्षा त्यानं आपल्या वडिलांच्या पावलावर पाऊल टाकून मळलेली पायवाट सोडली आणि वेगळ्याच वाटेनं तो गेला. त्यालाही समाजिक प्रश्नांमध्ये उपेक्षा सहन करावी लागली. वडिलांप्रमाणे र. धों. यांनीही सामाजिक सुधारणेचा विडा उचलला होता.पण दोघांची पद्धती वेगळी होती. समाजाला चुचकारून त्याला पुढे नेण्याचा मार्ग अण्णांचा होता, तर उपरोधिक व फटकळपणे बोलून समाजाचे दोषदिग्दर्शन करणे रघुनाथाला आवडे. विधवाविवाह, स्त्रीशिक्षण, पुनर्विवाह यांसारखी कामे करताना अण्णांनी कर्मठ व सनातनी लोकांचीही मने सांभाळण्याचा प्रयत्न केला. रघुनाथाचा मार्ग नेमका विरोधी होता. शंकर आफ्रिकेतच गेला आणि दिनकर प्रोफेसर होऊन फर्ग्सन कॉलेजचा पुढे प्राचार्य झाला. दिनकररावांच्या पत्नी प्रथम महिला विद्यापीठाच्या कार्यातच होत्या. त्यांनी लेखन व संशोधन या क्षेत्रांत स्वतः चं स्वतंत्र स्थान निर्माण केलं होतं. मामेभाऊ रघुनाथ परांजपे रँग्लर झाला आणि त्यानंही पुढं दिगंत कीर्ती मिळविली. अण्णांच्या तिसऱ्या पिढीचा वारसा गौरी देशपांडे यांनी संपन्न केला. दिनकर व इरावती यांची ही मुलगी. कर्वे कुटुंबाचं आजोळ परांजपे कुटुंबं. दोन्ही कुटुंबात बुद्धिवाद होताच. व्यक्तिस्वातंत्र्य मानणारी ही कुटुंबं होती. कर्वे आणि परांजपे या दोनही कुटुंबांमध्ये लिंगभेदावर आधारित श्रेष्ठकनिष्ठता नाकारली गेली होती. दोन्ही कुटुंबांनी स्त्रीस्वातंत्र्याचा पुरस्कार केला होता.

अनाथबालिकाश्रमाच्या इवल्याशा रोपाच जो विशालवृक्ष झाला, तो अण्णांनी आपल्या जीवनरसाचं शिंपण त्यावर केलं म्हणूनच. एवढी कृशकाया असलेले अण्णा महाकाय कार्य उभे कसे करू शकले? यासाठी त्यांच्या व्यक्तित्वाची काही वैशिष्ट्य ध्यानी घेतली तरच या प्रश्नाचा उलगडा होतो.

## ज्ञानसाधक अण्णा

मुरूडला सोमण गुरुजींपासून प्रेरणा घेतलेले अण्णा सदैव ज्ञानसाधनेच्या मार्गावर वाटचाल करीत राहिले. मराठी सहावी इयत्तेची परीक्षा देण्यासाठी कोकणातून कुंभार्ली घाटाद्वारे पाटणमार्गे ते साताऱ्याला आले. तीन दिवसात १२५ मैलाचं अंतर पायी तोडलं. ज्ञानसाधना ही तपसाधना असते. अण्णांनी ही तपसाधना सतत केली. सतत पायी चालणे, स्वतःचे अन्न स्वतः शिजवणे, प्रसंगी गॅलरीत झोपणे अशा खडतर मार्गांनी अण्णा आपली ज्ञानसाधना करीत होते. वयाच्या २७व्या वर्षी ते मुंबई विद्यापीठातून बी. ए. झाले; आणि ज्ञानसाधनेचा एक महत्त्वाचा टप्पा त्यांनी पूर्ण केला. प्रत्यक्ष पदवी मिळविण्यासाठीच अण्णा ज्ञानसाधना करीत होते असं नाही. त्यानंतरही वाचनाद्वारा त्यांनी सतत ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न केला.

## शिक्षक अण्णा

महर्षी अण्णासाहेब कर्वे हे उत्तम अध्यापक, निष्णात शिक्षक होते. मूळचे ज्ञानसाधक असल्यामुळेच त्यांनी हा ज्ञानदानाचा मार्ग पत्करला. मुंबईला उपजीविकेसाठी जो उद्योग करायचा, तोही त्यांनी याच क्षेत्रातील निवडला. ते शिकवण्या करू लागले. सकाळपासून रात्रीपर्यंत मुंबईच्या निरनिराळ्या भागात अध्यापनाचं कार्य करण्यासाठी ते निष्ठेनं जात. मुंबईतला तेरा वर्षांचा काळ संपूर्णपणे अध्यापनालाच वाहिलेला होता. एखादा विषय शिकवताना तो स्वतःला पूर्ण समजल्याशिवाय त्यांनी कधीच शिकवला नाही. त्यासाठी ते विषयाची तयारी आधी करीत. त्यांचा अध्यापनाचा मुख्य विषय होता गणित. तरीही तो विषय विद्यार्थ्यांना सोपा करून सांगण्याची त्यांची हातोटी होती. कर्वे यांची अध्यापननिष्ठा लक्षात घेऊन राजारामशास्त्री भागवत यांनी कर्वे यांना आपल्या संस्थेत मुद्दाम आमंत्रित केले. पण कर्वे यांनी तेथे फार काळ रहायचे नाही असे ठरविले होते. पुढे ते डेक्कन एज्युकेशन सोसायटी या ख्यातनाम संस्थेचे आजीव सदस्य झाले. आणि त्यांनी दीर्घकाळ याच संस्थेत अध्यापनाचे कार्य केले. अण्णांमधला शिक्षक सदैव जागा असे. अनाथबालिकाश्रम हिंगण्याला हलविल्यानंतर अण्णा पुण्यात रहात असताना रोज रात्री आश्रमातील स्त्रियांना विशेष अध्यापन करण्यासाठी ते जात असत. प्रथम स्थितीत उत्तम विद्यार्थी, विद्यार्थीदशेतही इतरांना मार्गदर्शन, नंतर शिक्षक, प्राध्यापक आणि उत्तर आयुष्यातही हयातभर समाज शिक्षक अशी त्यांची प्रतिमा होती.

## समाजसुधारक अण्णा

अण्णासाहेब कर्वे यांची समाजसुधारणाविषयक मते क्रांतिकारी असली तरी आपल्या विचारांनी समाजाला फार मोठा धक्का बसत असला, तर आपले विचार स्वतःपुरतेच ते आचरणात आणीत असत. पुनर्विवाहाच्या प्रश्नावर एवढा गदारोळ झाला, त्यांनी स्वतः विधवेशी पुनर्विवाह करून उत्तम उदाहरण समाजासमोर ठेवले, तरी इतरांच्या बाबतीत क्रांतिकारी भूमिका घ्यावी किंवा ठाम विरोधात उभे रहावे, अशी त्यांची दृष्टी नव्हती. समाजाला गदागदा हलवून किंवा चपराक देऊन समाजसुधारणाविषयक मते सांगण्यापेक्षा समाजाला चुचकारून ती मते गळी उतरवणे अण्णांनी पसंत केले. त्यांची भूमिका क्रांतीकारी नव्हे, तर उत्क्रांतिवादी होती. अनेक प्रसंगातून अण्णांची भूमिका लक्षात येते. आपल्या कार्याच्याप्रसारासाठी अण्णा एका तालुक्याच्या गावी गेले होते. तेथे एका सुशिक्षित गृहस्थांबरोबर एका शास्त्रीबुवांच्या घरी ते गेले. औपचारिक बोलणे झाल्यावर अण्णांनी आपल्या येण्याचा हेतू सांगितला. आश्रमाची माहिती दिली. तोच ते गृहस्थ, शास्त्रीबुवा, एकदम उसळून म्हणाले-

**“पुरे करा, आपली मला माहिती आहे. व्यभिचारावर पांघरूण घालण्यासाठी पुनर्विवाह करून आता हे धंदे आरंभले आहेत.”**

हा हल्लाअण्णांच्या व्यक्तिगत जीवनावर होता. शिवाय अनाथबालिकाश्रमाच्या कार्याला ‘धंदे’ हा शब्द मोजून शास्त्रीबुवांनी अण्णांची अयोग्यरीतीने संभावना केली होती. पण अण्णा शांत होते. बरोबरीच्या गृहस्थांना घेऊन ते उठले, शास्त्रीबुवांना नमस्कार केला आणि निघाले.

अण्णांच्या सहनशील समाजसुधारकाच्या भूमिकेचा प्रत्यय असणारा असा आणखी एक प्रसंग! एल्फिन्स्टन हायस्कूलमध्ये अण्णासाहेब शिक्षक असताना त्यांच्या वर्गात असलेल्या, नंतर बी. ए. पर्यंत शिक्षण घेतलेल्या एका गृहस्थांकडे अण्णा गेले होते. त्यांना चांगला पगार असून ते बराच दानधर्म करतात असे अण्णांनी ऐकले होते. त्यांच्याकडे आठदहा मंडळी बुद्धिबळाचा डाव खेळत होती. अण्णासाहेब गेले आणि त्यांच्या खेळातील रंगाचा बेरंग झाला. त्यांचा जणु विरस झाला. त्या सर्व लोकांचा एकूणच सुधारकांवर कटाक्ष होता. डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या आजीव सदस्यांबाबतही त्यांचा कटाक्ष असावा. ते गृहस्थ अण्णासाहेबांना उद्देशून काळजाला झोंबणाऱ्या भाषेत म्हणाले,

**“शाळांची व कॉलेजांची ग्यादरिंगे करून, सगळेजण ओवळ्यांनी जेवायला बसून, जिकडेतिकडे भ्रष्टाचार माजविण्याचे काम तुम्ही चालविले आहे व तुमच्या या प्रयत्नांनी समाजाला तुम्ही रसातळी नेऊन पोचवीत आहात. तुमच्याशी बोलण्यासारखं काहीही नाही.”**

अण्णासाहेबांच्या समाजसुधारणेच्या कार्यात त्यांना उद्विग्नता येईल अशा पद्धतीने, त्यांच्याविरुद्ध अपप्रचार होईल असे बोलले जाई. अण्णासाहेब आणि बाया यांचा विवाह झाला, आणि तीनचार महिन्यांतच त्यांची भांडणे होऊन त्यांचे पटत नाही अशी अफवा पसरवली गेली. ते विभक्त  होणार आहेत असेही पसरविले गेले. याचवेळी नरहरपंत जोशी पुण्याला आले होते. अण्णासाहेब आणि बाया यांचं भांडण मिटवण्यासाठीच नरहरपंत आले आहेत असा लोकांचा समज झाला आणि एखाद्या चांगल्या गोष्टीचाही विपरित अर्थ कसा लावला जातो याचे आणखी एकउदाहरण मिळाले. आपल्या कुटुंबासाठी कोणताही जबाबदार माणूस भविष्यातील तरतूद म्हणून काही सोयी करीत असतो. ‘विमा’ हा अशा तरतुदीचा एक प्रकार. अण्णासाहेबांनीही आनंदीबाई-बाया व मुले यांना आपल्या पश्चात काही रक्कम मिळावी म्हणून विमा उतरविला होता. तीन हजार रुपयांची विमापॉलिसी होती. हे काम याच सुमाराला चालले होते. अण्णासाहेबांनी विभक्ती होण्यासाठीच ही तरतूद केली अशीही अफवा होती.

अशा तऱ्हेने प्रवाहाविरुद्ध पोहताना शक्यतो प्रवाहाशी जमवून घेऊन आणि प्रवाहात काही भोवरे व डोह असतील तर ते टाळून अण्णासाहेबांनी आपल्या समाजसुधारणेची नौका पैलतीराला नेण्याचा नेहमीच प्रयत्न केला. याबाबत त्यांची स्वतःची इच्छाशक्ती, दुर्दम्य आकांक्षा, कमालीची सहनशीलता आणि शांतपणे कार्य करण्यासाठी लागणारी स्थिरबुद्धी यांचा त्यांना नेहमीच उपयोग झाला. आक्रमक नसूनही सक्रिय व सफल समाजसुधारक होता येते. याचे मूर्तिमंत उदाहरण!

## कुटुंबवत्सल अण्णा

शतायुषी अण्णांनी शिक्षणसंस्थांचा संसार उत्तम केलाच, पण स्वतःचा संसारही काटकसरीनं आणि लक्षपूर्वक केला. दोन विवाह झाले. सर्व मुलांना त्यांनी उत्तम शिक्षण दिले. त्यांना स्वतःलाच बालपणी सुसंस्कारांचे महत्त्व समजले होते. त्यामुळे आपली मुले-नातवंडे यांनाही त्यांनी संस्कारस्नात केले. अण्णांना स्वतःच्या संसाराबद्दल फार मोठी चिंता होती असे नव्हे. पण आपण समाजकार्यासाठी अधिक वेळ देत आहोत, अशा वेळी संसाराकडे दुर्लक्ष होऊ नये याचेही भान त्यांना होते. ते संसारात लिप्त नव्हते तरी सांसारिक जबाबदाऱ्या त्यांनी योग्य तऱ्हेने पार पाडल्या.

प्रथम पत्नी राधाबाई यांना खूप कष्ट होत याची त्यांना जाणीव होती. ते आपल्या आत्मवृत्तात लिहितात.

**"राधाबाई फार थोर मनाची बायको होती. बिऱ्हाडाची जागा अगदी लहान आणि घरात मंडळी पुष्कळ, यामुळे तिला निवांतपणा अगदी मिळत नसे. दगदगीला ती कंटाळली नाही व कोणत्याही गोष्टीबद्दल तिने कधी कुरकुर केली नाही. तिला थोडे स्वास्थ्य द्यावे असे माझ्या मनात होते. पण तसा योग येण्यापूर्वी बिचारीला हा लोक सोडून जाणे भाग पडले."**

राधाबाई एकदोन वेळा आजारी पडल्या, तेव्हा अण्णांनी त्यांना मुरूडला ठेवले. एकमेकांना पत्रे लिहून त्यांनी त्यावेळी एकमेकांना मानसिक आधार दिला. आणि संकटप्रसंगी धैर्य धारण करण्याचा प्रयत्न केला. राधाबाईंची आणि अण्णांची शेवटची भेट झाली नाही. दिवस पावसाळ्याचे होते. कोकणात जाणे अत्यंत कष्टाचे होते. अण्णांना राधाबाईंच्या मृत्यूची वार्ता पत्रानेच समजली. आपल्या पत्नीची शेवटची भेट झाली नाही ही गोष्ट त्यांच्या मनाला सतत टोचणी देत होती.

अण्णांनी पुनर्विवाह केल्यानंतर आनंदीबाई तथा बाया कर्वे यांचाही त्यांचा सूर जुळला. बायाने तर अण्णांच्या कार्यात प्रत्यक्ष साथ दिली. अण्णांची नव्वदी साजरी झाली; आणि नंतर दोनच वर्षांनी बायाचा अंत झाला. त्यावेळी बाया ८६ वर्षांच्या होत्या. ५७ वर्षांच्या प्रेमळ संसाराची समाप्ती झाली होती. बायाची इच्छा होती, भरल्या कपाळी जावं. तिची ती इच्छा पूर्ण झाली. बायाच्या देहाला जिथं अग्नी देण्यात आला तिथं एक तुळशीवृंदावन बांधलं होतं. त्याजागी अण्णा नेहमी जाऊन बसत. मात्र त्यांच्या चेहऱ्यावर दुःख नसे. स्थितप्रज्ञाचे स्थिर भाव त्यांच्या चेहेऱ्यावर असत. स्त्रीशिक्षणाचे कार्य आणि समाजसेवा यामध्ये जीवनातला बराच काळ गेला होता. त्यामुळे कुटुंबाला व पत्नीला बायाला आपण पुरेशी साथ देऊ शकलो नाही याची जाणीव अण्णांना होती. बाया कर्वे यांनीही आपल्या लिखणात ही सल व्यक्त केली होती.

यानंतर अण्णांना आणखी एका दुःखद घटनेला सामोरे जावे लागले. १४ ऑक्टोबर १९५३ रोजी, वयाच्या बहात्तराव्या वर्षी अण्णांचे थोरले पुत्र रघुनाथ तथा 'र. धों.' यांचं निधन झालं. र. धों. यांच्या अंतकाळी त्यांच्याजवळ त्यांचे बंधु दिनकरराव होते. दिनकररावांनी ही वार्ता आपले बंधु भास्करराव यांना कळवली. त्यांनी ती अण्णांना सांगितली. अण्णांनी शांतपणे ऐकली. ते म्हणाले-

"मी ९५ वर्षांचा म्हातारा झालोय. निरोप घेण्याची पाळी माझी होती. पण ईश्वरानं माझ्या मुलाला नेलं. तोही वृद्धच होता..." ही अण्णांची शांत प्रतिक्रिया होती.

अनुक्रमणिका

गौरी देशपांडे ही अण्णांची नात. परांजपे कुटुंबातील तरुण मंडळीही त्यांचे आप्त. या सर्वांचे शतायुषी कुटुंबप्रमुख म्हणून अण्णा होते. उत्तर आयुष्यात नातवंडांना गोष्टी सांगणारे, गाणी म्हणून दाखवणारे अण्णा खऱ्या अर्थाने कुटुंबवत्सल होते.

## प्रयोगशील समाजसेवक अण्णा

अण्णासाहेब कर्वे यांनी समाजकार्याच्या प्रवासात अनेक प्रयोग केले. त्यातला एक प्रयोग महत्त्वाचा असा की, एखाद्या फार मोठ्या कार्याची उभारणी करताना सर्वसामान्य माणसालाही त्या कार्यात सहभागी करून घेणे. वर्गणी जमाविण्याबाबत त्यांनी जो प्रयोग केला तो निःसंशय अनुकरणीय आहे. या त्यांच्या कार्याला गोड फळे येताना अधिकाधिक यश मिळत गेले आणि विनासायास देणग्या मिळाल्या. पण त्याची उभारणी त्यांनी सुरुवातीच्या काळात प्रयोगशीलतेने केली होती. वर्गणी जमवणे हा एक भाग झाला. पण मुलींच्या शिक्षणाबाबत विचार करताना त्यांच्यासाठी वेगळा अभ्यासक्रम असावा हाही एक प्रयोग होता. तो तर अण्णांनी अमलात आणायच. पण अगदी सुरुवातीच्या काळात मुलांच्या शाळेत मुलींना शिक्षण देण्याचा प्रयोग त्यांनी करून पाहिला.

१९०७ साली आश्रमातील तीन विद्यार्थिनी मॅट्रिकच्या वर्गात आल्या. आश्रमाची शाळा अजून बाल्यावस्थेतच होती. एप्रिल महिन्यापर्यंत त्यांचे शिक्षण चालले. मे महिन्याच्या सुटीत अण्णांनी या मुलींना पुण्याला नेले. न्यू इंग्लिश स्कूलमध्ये इंग्रजी शिकवणाऱ्या एका आजीव सदस्याने या मुलींना इंग्रजी शिकवायचे ठरले. अण्णा स्वतः गणित व शास्त्र हे विषय घेत. मे महिन्यातील हा अनुभव उत्साहवर्धक होता. अण्णांनी या मुलींना न्यू इंग्लिश स्कूलमध्ये घातले. हा प्रयोग यशस्वी झाला आणि तीन विद्यार्थिनीपैकी दोघी पास झाल्या. न्यू इंग्लिश स्कूलमध्ये मुली पाठविण्याची सुरुवात १९०८ साली केली. चारपाच वर्षांत मुलींची संख्या तीनपासून वीसपर्यंत गेली. त्या काळात हा प्रयोग अगदीच नवीन होता. शिक्षणासाठी मुलींना परक्या ठिकाणी पाठवण्यापेक्षा आपल्या नजरेखाली ठेवून मुलांच्या शाळेत त्यांचे शिक्षण करवून घेणे हा मार्ग अण्णांना विशेष सोयीचा वाटला.

निष्कामकर्ममठाचा अण्णांचा प्रयोग हा एक विशेष प्रयोग होता. शिक्षणसंस्थांमध्ये त्या काळातही आजीव सदस्यपद्धती होती. पण समाजकार्यासाठी केवळ उपजीविकेपुरते द्रव्य घेऊन आपले तन-मन देणारे कार्यकर्ते हे निष्कामकर्ममठाचे उद्दिष्ट होते. परोपकाराच्या कामी अशा सेवाव्रती कार्यकर्त्यांचा संघ निर्माण करून त्याद्वारा काही विशेष कार्याची उभारणी करावी असे अण्णांना वाटत होते. निष्काम-कर्म मठाच्या मूळ प्रारुपात असे होते की, दिवसेंदिवस द्रव्यसामर्थ्य एकत्र होणे कठिण होत चालल्यामुळे केवळ द्रव्यभिक्षेवर अवलंबून न राहता, कार्यकरण्याचे सामर्थ्य अंगी यावे म्हणून, शक्य झाल्यास मठाच्या सेवकसेविकांनी भिक्षेच्या पवित्र अन्नाचे सेवन करावे.

स्त्रियांसाठी वेगळे विद्यापीठ हाही अण्णांच्या प्रयोगशीलतेचाच परिपाक होता. याशिवाय उच्चशिक्षण हे मातृभाषेतून द्यावे हा प्रयोगही त्या काळात नवीन होता. इंग्रजी भाषेला अवास्तव महत्त्व न देता कमी श्रमाने मातृभाषेतून स्त्रियांना ज्ञान मिळविण्याची साधने उपलब्ध झाली पाहिजेत असे अण्णांना सतत वाटत होते. महिला विद्यापीठाची 'गृहितागामा' ही पदवी बी. ए. पदवीपेक्षा कमी नाही. ती समकक्ष आहे एवढा दर्जा तिला प्राप्त झाला पाहिजे हा अण्णांचा प्रयोग वेगळा होता.

आश्रमातील एका विद्यार्थिनीला चोरीची खोड होती. तिनं चोरी केली. पण तिला शिक्षा करण्याबाबत अण्णांनी एक प्रयोग करून पाहिला. आश्रमातील मुली भजनासाठी रात्री एकत्र जमल्या. शिक्षिकाही होत्या. चोरी करणारी मुलगी शिक्षेला पात्र आहे किंवा नाही हे ठरविण्यासाठी प्रत्येकीने आपले मत पाटीवर लिहावे, ते मत फक्त अण्णांनी वाचावे, मग ते पुसून टाकावे, पाटी दुसऱ्या मुलीकडे द्यावी. मग सर्व मतांचा विचार करून अण्णांनी निकाल द्यावा अशी योजना केली. सर्वांनी प्रामणिकपणे व न संकोचता आपली मते नोंदवली आणि मगच अण्णांनी तिला दोषी ठरविले. या प्रयोगावरून अण्णांची प्रयोगशील न्यायप्रियता आणि लोकशाही व सार्वमत हा प्रयोग आपल्या आश्रमव्यवस्थेतही आणण्याबाबत त्यांचा कटाक्ष होता हे दिसून येते.

## श्रमप्रतिष्ठा मानणारे अण्णा

अण्णांनी स्वतःच्या जीवनात श्रमांना फार मोलाचे स्थान दिले होते आणि इतरांनीही श्रमांना महत्त्व द्यावे असे त्यांना वाटत होते. परीक्षेसाठी मैलोगणती प्रवास, तो ही पायी असो किंवा अनाथबालिकाश्रमाच्या मदतीसाठी वर्गणी गोळा करण्यासाठी वणवण असो, अण्णांनी श्रमांची साथ कधीही सोडली नाही. मुंबईला पहाटेपासून रात्रीपर्यंत वेळापत्रकानुसार त्यांची जी भ्रमंती होती ती त्यांच्या श्रमनिष्ठेची द्योतक होती. अनेकवेळा सात ते नऊ तास शिकवण्याचे काम आणि येण्याजाण्याचा वेळ वेगळा असा त्यांचा बाराचौदा तासांचा दिनक्रम असे. या कालखंडात दिवसातून रोज पाचसहा मैल पायी चालावे लागे. पहाटे लवकर उठून त्यांना माजगावला जावे लागे. एकदा तर या वेळापत्रकांमुळे ते पहाटेच्या बरेचआधी रस्त्यावरून चालू लागले. एरवी त्यांना राधाबाई पहाटे उठवीत. पण तेव्हा त्यांची बहीण अंबाताई मुंबईला त्यांच्याकडे आली होती. त्यादिवशी अण्णांना पहाटे लवकर उठवण्याचं काम अंबाताईनं आपल्याकडे घेतलं होतं. अंबाताईनं त्यांना नेहमीच्या वेळेपेक्षा एक तास लवकर उठवलं होतं. अण्णांनी घड्याळाकडं बघितलं नव्हतं. ते बाहेर पडले तर रस्ता निर्मनुष्य होता. अर्थातच अण्णांनी तो तास रस्त्यावर रेंगाळत घालवला आणि ते वेळेवर शाळेत हजर झाले.

अनाथबालिकाश्रमाच्या संचालनातही त्यांनी श्रमांना महत्त्व दिले होते. स्वयंपाकपाणी, स्वच्छता, अन्य कारभार यांबाबत शक्यतो सर्वांनी स्वावलंबनाने, सहकार्याने प्रयत्न करावेत आणि श्रमांचे मूल्य देऊन आपला खर्च कमी करावा अशीच योजना त्यांनी आखली होती.

१८८१ साली भारतात शिरगणती झाली. यावेळी अण्णांनी गणतीदाराचेही काम केले. गणतीदाराला दररोज एक रुपया याप्रमाणे मोबदला मिळत असे. असे काम मिळवण्यासाठी लोकांची बरीच गर्दी होई. पण अण्णा कंटाळत नसत. ते नेहमीच रेल्वेच्या तिसऱ्या वर्गाने प्रवास करत. अशा वेळी धक्काबुक्की होई. पण स्वभाव भित्रा असल्यामुळे अण्णा मागे रहात. मग गाडी चुके. पण त्यांनी तेवढ्यासाठी वरच्या वर्गाने कधीही प्रवास केला नाही. श्रम करण्याची तयारी असल्यामुळे आपोआपच काटकसर होत असे. काटकसरीमुळे बचत होत असे. होणारी बचत अण्णा समाजकार्याच्या हेतूने खर्च करीत. अशातऱ्हेने श्रमांना प्रतिष्ठा देणारा हा सच्चा समाजसेवक आपल्या नंतरच्या पिढ्यांना कितीतरी प्रकाश देत राहिला. आधुनिक युगात श्रमप्रतिष्ठा हे मूल्य मुद्दाम रुजवावे लागते. अण्णांची श्रमप्रतिष्ठा अगदी स्वाभाविक होती. श्रम करण्याचा आवही नव्हताकिंवा ते ढोंगही नव्हते. नाटक तर नाहीच नाही. शतायुषी अण्णा श्रमांमुळेच शतायुषी झाले असाही कोणी निष्कर्ष काढला तर तो चुकीचा ठरणार नाही.

## स्थितप्रज्ञ अण्णा

शतायुषी अण्णांच्या जीवनातील विविध संघर्षमय प्रसंगांचा आढावा घेतला तर अण्णांची मनोभूमिका कशी होती याचे सहज आकलन होते. 'सुखदुःखे समे कृत्वां लाभालाभौ जयाजयौ' अशा प्रकारची मनस्थिती असलेले अण्णा स्थितप्रज्ञ होते. गीतेमध्ये स्थितप्रज्ञाची जी लक्षणे सांगितली आहेत; त्यांचं सुंदर विवरण ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीत केलं आहे.

**"गायीची तृषा हरूं ।**
**कां व्याघ्रा विष होऊनि मारूं ।**
**ऐसें नेणेचि गा करूं ।**
**तोय जैसें ।।"** ( ज्ञानेश्वरी : अ. १२. ओ. १४७)

तहान भागविणे हा पाण्याचा गुणधर्म! पाणी वाघाचीही तहान भागवते, गायीचीही तृषा शमविते. वाघासाठी पाणी विष होत नाही. अण्णा तसे होते. विरोधकांसमोरही शांत असत आणि गुणगौरव समारंभातही ते तटस्थ किंवा अलिप्त असत. सुख आणि दुःख यांना समानच होतं. अशा स्थितप्रज्ञतेमुळेच अण्णा अनेक वादळांशी सामना करू शकले. आनंदीबाईंशी विवाह केल्यानंतर मुरुडकरांनी घातलेला बहिष्कार, महिलांसाठी निधी गोळा करताना विविध सनातनी व्यक्तींनी केलेला अपमान, राधाबाई, रघुनाथ, बाया यांचे मृत्यू, महिला विद्यापीठाबाबत ठाकरसी यांच्या विश्वस्तांनी घेतलेली भूमिका, या सर्व वादळी अथवा दुःखद प्रसंगात अण्णा कमालीचे शांत व स्थिरचित्त होते. भारताचे पंतप्रधान व राष्ट्राध्यक्ष यांच्या हस्ते सत्काराचे भव्य सोहळे झाले तरी त्यांनी ते सत्कार दुसऱ्यांच्या भावनांचा आदर करण्यासाठी स्वीकारले. समोर तुडुंब जनसागर असतानाही हा सत्कारमूर्ती आपल्या सत्कारस्थानी एखाद्या योग्याच्या वृत्तीने शांत बसलेला होता. बालपणी शिक्षणाबाबतही अण्णांना खूपच हेलकावे घ्यावे लागले. १८६९ मध्ये मराठी चौथीच्या परीक्षेत अण्णा अनुत्तीर्ण झाले. हे अपयश त्यांनी मनाला फार लावून घेतले. पण सोमण गुरुजींनी त्यांना धीर दिला. अण्णा पुन्हा परीक्षेला बसले, उत्तीर्ण झाले.

आता पुढील शिक्षणाची वाटचाल करायची होती. मुरूडपासून १० किलोमीटरवर दापोली आहे. दापोलीला एक इंग्रजी शाळा होती. या शाळेत आपण शिक्षण घ्यावे असे अण्णांना तीव्रतेने वाटत होते. मराठी चौथी पास झालेल्या विद्यार्थ्यांना या शाळेत प्रवेश मिळे. पण अण्णा त्यावेळी त्या शाळेत गेले नाहीत. इच्छा असूनही त्यांनी आपल्या मोठ्या भावासाठी आपली इच्छा तशीच राहू दिली. दोघांनाही दापोलीला जाऊन शिक्षण घेणं शक्य नव्हतं. दादा ( भिकाजीपंत ) दापोलीला शिकायला गेला. पण तो फार दिवस तिथं राहिला नाही. दादानं शाळा सोडली. पुढं ती शाळाच बंद पडली. धोंडूची इंग्रजी शिक्षणाची इच्छा अपूर्णच राहिली.

अनेक मैलांचा पायी प्रवास करून अण्णा साताऱ्याला सहावीच्या बोर्डाच्यापरीक्षेसाठी आले. आणि ऐनवेळी वयाचं संकट उभं राहिलं. १७ वर्षे पूर्ण असली पाहिजेत अशी अट होती. अण्णांच्या कृश चणीमुळे तेथील अधिकारी म्हणाले, "तुझं वय १५ पेक्षा जास्त असणं शक्य नाही" ... निराश मनाने अण्णांना परतावे लागले. पण अण्णांनी हा दैवाचा घावही शांतपणे सहन केला. त्यानंतर त्यांनी इंग्रजी शिक्षणातही चांगले यश मिळवले. स्थितप्रज्ञ अण्णांनी अशाप्रकारची अनेक वादळे, अपयशाचे व अपमानाचे प्रसंग शांतपणे पचविले.

अनुक्रमणिका

## शतायुषी अण्णा

दीर्घायुष्य हा अनेकांना शाप वाटतो. उतरत्या वयाचे ओझे वाटू लागते. अण्णा मात्र आयुष्याचे ओझे न मानता जगले. १०५ वर्षांचं आयुष्य जगलेले अण्णा जीवनावर प्रेम करणारे होते. त्यांनी कधीही निराशेचा किंवा औदासिन्याचा शब्दही उच्चारला नाही. शेवटचे काही दिवस वगळता संपूर्ण १०४ वर्षांचं आयुष्य अण्णा निरामयतेनं जगले. त्यांना नियतीचं वरदान होतं, तसंच हे वरदान सांभाळण्यासाठी त्यांनीही नियतीला साथ दिली. मित आहार, युक्ति विहार आणि उचित विचार ही अण्णांची जीवन त्रिसूत्री होती. अण्णा लहानखुरे होते. कृश होते. बालपणी तर त्यांची बटुमूर्ती इतर मुलांच्या मेळाव्यात ध्यानातही येत नव्हती. शरीरप्रकृती उत्तम ठेवण्यासाठी अण्णांना वेगळा व्यायाम करावा लागला नाही. चालण्याचा व्यायाम त्यांना आपोआपच होत होता. अण्णा मांगल्याचे, पावित्र्याचे उपासक होते. शतायुषी अण्णांना अनेक सभासमारंभात आमंत्रणे होती. अगदी उतारवयातही ही आमंत्रणे ते स्वीकारत असत. “कधीकधी माझ्याबरोबरच्या मंडळींनाच थकल्यासारखं वाटायचं. पण मी जर समारंभाला गेलो नाही तर लोकांची निराशा होईल, म्हणून मी समारंभांना जातो.”असं अण्णा म्हणत.

अण्णा कृश असले तरी उत्तर आयुष्यातील काही वर्षे वगळता त्यांना फार मोठा आजार कधीही झाला नाही. जेवणाखाणासंबंधी त्यांच्या खास आवडीनिवडी अशा कधीच नव्हत्या. एकांतवास आणि जनवास दोन्हीही त्यांना सारखेच आवडत. चारचौघात उठणे बसणे, लग्न वास्तुशांत यासारख्या समारंभाची निमंत्रणे त्यांना आवडत. अशा समारंभात ते उत्साहाने भाग घेत. अर्थातच अनायासे लोकसंपर्क हेच अण्णांचे उद्दिष्ट होते.

कष्टांनी माणसाची काया झिजते असा बराच मोठा समज आहे. अण्णांचे आयुष्य तपासले तर कष्टांशिवाय पूर्वायुष्यात दुसरं काय होतं! झोपडीत राहणं,मैलोगणती चालणं, हातात झोळी किंवा पावती पुस्तक घेऊन फिरणं, तिसऱ्या वर्गानं प्रवास करणं, माजगाव ते कुलाबा, मुंबईत शिकवण्यासाठी भ्रमंती करणं इतके सारे कष्ट असूनही अण्णा शतायुषी झाले याचं रहस्य एकच असावं की, आहार, विहार आणि विचार या त्रिविध रुपात अण्णांच्या जीवनात एक सुसंगती होती. अण्णा रागावलेले आहेत असं सहसा कुणी पाहिलेलं नाही. आपली नाराजी, आपलं प्रतिकूल मत ते सौम्य शब्दांत प्रकट करीत.

१-१-१९३६ पासूनच अण्णांनी आपली दैनंदिनी लिहिण्यास सुरुवात केली. सोळा वर्षे ते अखंडपणे दैनंदिनी लिहीत होते. अण्णा सर्व लिखाण मोडीत करीत असत. त्यांचं अक्षर लहान होतं. त्यांच्या दिनचर्येतील निवडक नोंदीवरून अण्णांच्या शरीराचा चिवटपणा, मनाची चिकाटी, कार्यैकतत्परता, ध्येयनिष्ठा, सौजन्य, सुखदुःखांपासून अलिप्ततपणा, रंजल्यागांजलेल्यांबद्दल कारुण्य, विनोदबुद्धी, निष्ठापूर्वक चालविलेल्या सत्कार्याची बूज इ. गुण त्यांच्या ठायी होते हे दिसून येते. हा त्यांचा गुणसमुच्चय त्यांना शतायुषी करता झाला. अत्यंत निराशेच्या प्रसंगीही अण्णांनी ‘ठोठवा म्हणजे दार उघडेल ( Knock and it will open) या तत्त्वाचा अवलंब करून यश संपादन केले. अशा शतायुषी अण्णांना अखेरच्या आजाराने मात्र ग्रस्त केले. ७ नोव्हेंबर १९६२ रोजी पोटदुखीचा त्रास सुरू झाला आणि ९ नोव्हेंबर १९६२ रोजी शतायुषी योग्याची इहलोकीची यात्रा समाप्ती झाली.

अनुक्रमणिका

## जीवनव्रती अण्णा

अण्णासाहेब कर्वे यांच्या व्यक्तिमत्वाचे जे अनेक पैलू आहेत, ते परस्परपूरक आहेत. अण्णा समाजमनस्क होते म्हणून ते जीवनव्रती झाले. 'Life is mission' हे तत्त्व आचरणात आणणारे त्यांचे विचार होते. त्यांच्या जीवनातील वैयक्तिक निर्णयालाही व्रतस्थतेची भरभक्कम बैठक होती. अगदी बालपणापासून त्यांनी हे व्रत घेतले होते. सोमण गुरुजींच्याबरोबर भांडारात काम करताना त्यांनी ज्या निष्ठेनं काम केलं, त्यावरून त्यांची व्रतस्थ वृत्ती दिसून येते. जो मार्ग त्यांनी स्वीकारला होता, त्याचाच ध्यास त्यांनी आयुष्यभर घेतला. असे ते ध्यासपंथी होते. या ध्यासपंथावरील काटेकुटे त्यांनी तुडवले. रणरणते ऊन सहन केले. अडथळ्यांच्या अनेक शर्यती पार केल्या; आणि शंभराहून अधिक वर्षे ते या ध्यासपंथावर चालत राहिले. विचार करीत राहिले, अपयश पचवीत राहिले. यश मिळवत राहिले.

प्रा. श्री. ना. बनहट्टी यांनी अण्णांचं वर्णन 'कर्मयोगी' असं केलं आहे. श्री. बनहट्टी म्हणतात.

**"कर्वे यांच्या कार्याला काळ जरी अनुकूल होता, तरी दुसरी एक शक्ती प्रतिकूल होती. समाजाचे परंपरागत संस्कार, पूर्वग्रह आणि रूढीग्रस्त मन या गोष्टी समाजसुधारकांचा प्रतिरोध करण्यास सज्ज होत्या. या पूर्वग्रहरुपी, दुष्ट खडकांमधून स्त्रीसुधारणेचे तारू हाकारण्यास असामान्य चिकाटीची, धीमेपणाची आणि खंबीर ध्येयवादित्वाची आवश्यकता होती. ईप्सितकार्याकरिता अण्णासाहेबांनी काय सहन केले नाही? समाजाचे शिव्याशाप, अवहेलना, बहिष्कार हे सर्व सहन करून, न चिडता, न संतापता, समाजावरील आपले प्रेम तिळमात्रही कमी होऊ न देता, तपेच्या तपे अण्णासाहेबांनी आपला निष्काम कर्मयोग आचरिला; त्याचेच फळ म्हणजे आज शहरी मध्यमवर्गातील स्त्रीसमाज शिक्षणसंपन्नह होऊन निर्भय रीतीने आपला मार्ग स्वतःच्या जबाबदारीवर चोखाळण्यास सिद्ध झाला आहे."**

श्री. बनहट्टी यांच्या मते आदर्श कृतिवीराची सर्व लक्षणे अण्णासाहेबांच्या ठिकाणी प्रकर्षाने आढळतात. पुष्कळ बोलणे, लिहिणे हा कदाचित् वाग्वीर व बुद्धिवीर यांच्या ठायी गुण ठरेल. पणकृतिवीर हा प्रसिद्धी पराङ्मुख असतो. प्रचाराचे खरे साधन कृती हेच असते. अण्णांनी आयुष्यभर अशी कृती केली आणि कृतीद्वारे आपल्या विचारांचा प्रसार केला.

पंधरा कोटी स्त्रियांच्या शिक्षणाचे कार्य आपल्या हातून घडावे अशी त्यांची महत्त्वाकांक्षा होती. या आपल्या आकांक्षेबाबत ते कसे व्रतधारी होते, हे त्यांच्याच उद्‌गारांतून आपणाला दिसेल-

**"निदान १५ निरक्षर स्त्रियांना साक्षर करून या महत्कार्याचा एक कोट्यांश तरी मी आपल्या श्रमाने साध्य करीन व हे घडून आल्यावर एक लहानसे व्रत तरी माझ्या हातून तडीला गेले, म्हणून मला धन्यता वाटेल."**

महर्षी कर्वे यांनी अशाप्रकारे केवळ आपलेविचार व्यक्त केले नाहीत तर प्रथम त्यांनी आपल्या बहुतेक सर्व विचारांना मूर्त रूप दिले. त्यातूनच त्यांचा तो विचार आणखी नव्या विचारांना जन्म देत असे. अनाथबालिकाश्रम, निष्काम-कर्म-मठ, महिला विद्यालय, महिला विद्यापीठ अशी त्यांच्या कार्याची एक साखळीच मग तयारझाली. त्यातच कोठेतरी समता संघही होता. या सर्व संस्था म्हणजे जीवनव्रती अण्णासाहेबांच्या ध्येयनिष्ठ चिंतनशीलतेची मूर्तिमंत व कृतिप्रवण प्रतीके आहेत.

अनुक्रमणिका

**भारतरत्न अण्णा**

"दुर्लभं भारते जन्म मानुष्यं तत्र दुर्लभम्"या संस्कृत सुवचनात सांगितले आहे-

'भारतात जन्म होणे हे दुर्लक्ष, त्यातही मनुष्याचा जन्म मिळणे जास्त दुर्लभ'....

अर्थातच भारतात जन्माला येणे भाग्याचे आणि त्यातही मनुष्यजन्माला येणे भाग्याचे. असे आपण सारेच भाग्यवंत आहोत. पण जन्माने मिळालेले भाग्य ज्यांनी आपल्या अमोल कर्तृत्वाने उजळून टाकले, अशा व्यक्तींना 'भारतरत्न' या पदवीने गौरविले जाते.

-अण्णा अशा भारतरत्नांपैकी एक आहेत.

भारताच्या राष्ट्रपतींनी अण्णासाहेबांच्या शतकमहोत्सवाचा योग साधून त्यांच्या कार्याचा गौरव केला; आणि त्यांना 'भारतरत्न' ही पदवी दिली. ही भारतरत्न पदवी मिळण्याआधीच अण्णासाहेबांना बनारस विद्यापीठ, पुणे विद्यापीठ व महिला विद्यापीठ यांनी डी. लिट्. पदवी देऊन सन्मानित केले. १९५५ मध्ये 'पद्मभूषण' ही पदवी मिळाली. १९५७ मध्ये मुंबई विद्यापीठाने त्यांचा सन्मान केला. १९५८ मध्ये ते 'भारतरत्न' झाले. पदव्यांचा वर्षाव त्यांनी आनंदानं स्वीकारला. पण अलिप्तवृत्तीनं.

अण्णासाहेबांचे हे बहुमान झाले, ते त्यांच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानातून आपले कार्य त्यांनी साकार केले त्यामुळे. अण्णासाहेबांचे जीवनविषयक तत्त्वज्ञान त्यांच्या कृतीतून व विचारांतून दिसून येते. पुनर्जन्म, स्वर्ग-नरक इ. कल्पनांवर त्यांचा विश्वास नव्हता. वयाच्या ९० व्या वर्षी एका आत्मचिंतनात त्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. त्यात ते म्हणतात-

**"आत्मा आणि परमेश्वर या केवळ कल्पना असाव्यात. प्राणी जन्माला येतो तो पूर्वजन्माचे पापपुण्याचे गाठोडे बरोबर घेऊन येत नाही. तो आईबाप यांच्या उभय कुलांतील पूर्वजांपासून आनुवंशिक संस्कार बरोबर घेऊन जन्माला येतो. जन्म आणि मरण यांच्या मधला काळ एवढेच त्याचे आयुष्य आणि त्याला मागेपुढे या संस्कारांचा धागादोरा आहे."**

माणसाला आजचे जे उत्क्रांत स्वरूप प्राप्त झाले आहे ते हळूहळू विकसितहोत गेले आहे, असे त्यांचे मत होते. मन बुद्धी व भावना यांचे उत्क्रमण होत होत, न्यायाच्या व नीतीच्या कल्पना बनल्या आहेत, हा विचार महर्षी कर्वे यांनी १९१५ साली प्रसिद्ध झालेल्या आपल्या आत्मवृत्तात प्रकट केला आहे. ते म्हणतात, "माझ्या कल्पनासृष्टीतील चित्र या जन्मीच जड सृष्टीत पाहण्याचे भाग्य जर मला लाभले नाही आणि पुनर्जन्माच्या कल्पनेत जर सत्य असेल, तर या वासनेने युक्त अशा माझ्या जीवात्म्याचे पुनः नवशरीर धारण करून प्रारब्ध कर्म पूर्ण करावे व नंतर जड शरीराचा त्याग करावा; आणि परमात्मस्वरुपी लीन व्हावे एवढीच माझी इच्छा आहे"हाच विचार पुढे सांगताना महर्षी म्हणतात-

"या वाक्यात पुनर्जन्माच्या कल्पनेत जर सत्य असले तर... असे शब्द आहेत. माझे मन साशंक आहे. सृष्टीमध्ये जे घडून येत आहे त्या आज घडणाऱ्या घटनांचा पुढे कोठे फेरविचार होऊन न्याय मिळणार

आहे ही केवळ कल्पना दिसते. माझ्या मनावर कळत नकळत, प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष जे संस्कार घडत गेले, त्यांचा परिपाक म्हणजे माझी आजची मते."

'निष्काम कर्म मठ' स्थापनेसंबंधी आपले विचार व्यक्त करताना अण्णासाहेब म्हणतात-

'कर्म' या शब्दाने या ठिकाणी वर्णाश्रमधर्माची कर्मे समजावयाची नव्हते. 'मी, माझी बायको, माझी मुले' या कल्पना ज्यात विसरून जातील, अशाप्रकारची परोपकाराची समाजोन्नतीची कर्मे म्हणजे कर्म."

"कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः' ही अण्णांची श्रद्धा होती. समाजोन्नतीच्या निःस्वार्थ कर्मांनीच माणसाला जीवनमुक्त होता येईल.

या भारतरत्नानं देश पारतंत्र्यातून स्वातंत्र्यात आलेला पाहिला. आपणही स्वातंत्र्य अनुभवत आहोत. अण्णासाहेबांना खंत होती, ती ही की स्वातंत्र्यानंतर समता आलेली नाही. समता आल्याशिवाय स्वातंत्र्याची खरी गोडी चाखता येणार नाही, असे ते म्हणतात.

महर्षी कर्वे यांनी कधीही तत्त्वज्ञान सांगण्याचा प्रयत्न केला नाही किंवा लोकांना कोणता उपदेश केला नाही. कर्वे यांचे कार्य हाच कर्वे यांचा संदेश होता. 'आकाशावर नेम धर म्हणजे तुझा बाण झाडापर्यंत तरी जाईल' या वचनाप्रमाणे कर्वे कार्य करीत राहिले.

कर्वे यांच्या थोरवीबद्दल आणखी एक मुद्दा महत्त्वाचा आहे. 'मी कोण आहे' असा प्रश्न त्यांनी स्वतःलाच विचारला आणि त्याचे वस्तुनिष्ठ उत्तर स्वतःच शोधूनकाढले. म्हणूनच ते म्हणतात-

"मी समाजकार्याला सर्वस्वी वाहून घेतले नाही. संसारी माणूस व संन्यासी वा त्यागी माणूस या दोघांच्या मधला मार्ग मी स्वीकारला. मी संसार नेटका केला नाही. कसाबसा करीत राहिलो. अजूनही करीत आहे. कुटुंबासाठी घरदार किंवा द्रव्यसंचय मी केला नाही. जरुरीपुरतेच वैयक्तिक व कौटुंबिक स्वार्थाकडे लक्ष देऊन बाकीचे सामर्थ्य व उर्वरित द्रव्य लोकहिताच्या कामी खर्चणे हा माझा स्वभाव बनला आहे."स्वतः विषयीची वस्तुनिष्ठ जाणीव व स्वतःचे यथार्थ मूल्यमापन थोड्याच लोकांना करता आले. महर्षी कर्वे यांनी असे मूल्यमापन स्वतः केले.

धर्म, नीतिशास्त्र आणि तत्त्वज्ञान यासंबंधी त्यांचे विचार पुरोगामी होते. त्यांचे सर्व आचरण धर्माधारित होते. हा धर्म कोणता? सद्‌विचारधर्म. अण्णासाहेबांनी धर्मविचारात आणि कर्माचरणात कर्मकांडाला कधीच स्थान दिले नाही. त्यांचा मानसिक पिंड एखाद्या संन्याशासारखा अविचल आणि निर्विकार होता. त्यांचे थोरले चिरंजीव र. धों. कर्वे यांनी जे संततीनियमानाचे कार्य हाती घेतले होते, ते अण्णांना मनोमन मान्य नव्हते. तरीही अण्णांनी रघुनाथाच्या निर्भयतेचे व अविचल निष्ठेचे कौतुकच केले.

भारतरत्न कर्वे यांच्यासंबंधी विविध क्षेत्रांतील व्यक्तींनी जे उद्‌गार काढले किंवा त्यांच्या संबंधी लिहिले, त्या गौरवोद्‌गारांचा परामर्श घेतला तर कर्वे यांची महनीयता सहज ध्यानी येते.

✷ He saw his goal, he walked, he persisted, he achieved... In doing this, he has served Poona, he has served India; he has served Asia; he has served humanity (ज्ञानप्रकाश)

✷ "मला जे काही थोडेफार महत्त्व प्राप्त झाले ते सर्वस्वी अण्णांमुळेच होय. पहिली धुळाक्षरे मला अण्णांनी शिकविली. माझ्या आईवडिलांनी मला जन्म दिला असला, तरी मला बौद्धिक जन्म अण्णांनीच दिला, असे म्हटल्यास अनुचित होणार नाही ( रॅ. र. पु. परांजपे)

✷ "प्रो. कर्वे यांचे आत्मविसर्जन, त्यांची अव्यभिचारी कर्तव्यनिष्ठा, त्यांचा अश्रांत उत्साह, कोणत्याही परिस्थितीत त्यांनी सांभाळलेली सचोटी, विरोधी वातावरणात त्यांनी टिकवून ठेवलेली श्रद्धा, त्यांचा अदम्य आशावाद ही राष्ट्राची पहिल्या प्रतीची पुंजी आहे" ( म. गांधी-'यंग इंडिया', १९२८)

✷ "महर्षी कर्वे हे एक लोकोत्तर सेवामूर्ती आहेत. मानवतेचा उद्धारकरण्यासाठी प्रत्येक शतकात अशा अद्वितीय सेवामूर्ती जन्माला येत असतात. त्या बोलत नाहीत, त्या लिहीत नाहीत, त्या गात नाहीत. त्या नुसती सेवा करतात. सेवा हीच त्यांची प्रतिभा, सेवा हेच त्यांचे काव्य, आणि सेवा हेच त्यांचे साहित्य. मानवतेच्या सेवेचे व्रत स्वीकारणे हे एक कठोर अग्निदिव्य आहे. या अग्निदिव्यामधून धैर्याने जाण्यास जी माणसे सिद्ध होतात, ती काही सामान्य बुद्धीची आणि साधारण पराक्रमाची माणसे नव्हेत. महर्षी कर्वे ही महाराष्ट्राच्या मोठेपणाची एक चालतीबोलती निशाणी आहे. प्राचीन इतिहासामध्येच केवळ जी विभूती पाहावयास सापडेल, ती आधुनिक काळामध्ये बघावयास मिळत आहे, या दृष्टीने बघता महर्षी कर्वे हा आधुनिक काळातला महाराष्ट्रामधला एक चमत्कार आहे. चांगुलपणा, भलेपणा, सौजन्य आणि साधुत्व यांचा असा मूर्तिमंत पुतळा या काळामध्ये सहजासहजी पाहावयास मिळणार नाही."( आचार्य अत्रे)

"महिला विद्यापीठाची कल्पना फार चांगली आहे. येथील शिक्षण मातृभाषेत देण्यात येणार आहे हे समजल्यावर आनंद वाटला. आज त्याबाबतीत सरकारची विनवणी करीत बसण्यापेक्षा प्रत्यक्ष कामाला लागून प्रगती साधणे आणि मग मान्यता मिळविणे अधिक चांगले."( डॉ. रवींद्रनाथ टागोर)

"स्त्रियांच्या व विशेषतः प्रौढ स्त्रियांच्या शिक्षणाच्या कामात एका बाजूला प्रो. डी. के. कर्वे यांचे व दुसऱ्या बाजूला श्री. जी. के देवधर यांचे प्रयत्न प्रशंसनीय आहेत. प्रो. कर्वे यांच्या ३० वर्षांपूर्वीच्या लहानशा वसाहतीला आता पूर्णतेला आलेल्या हिंदी स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीचे स्वरूप आलेले आहे. मातृभाषेचा बोधभाषा म्हणून उपयोग करणे, अभ्यासक्रम स्त्रियांच्या विशेष गरजांकडे व स्थितीकडे लक्ष देऊन ठरविणे आणि हिंदी राहणीतील साधेपणा कायम ठेवणे, या गोष्टींत विद्यापीठाचे वैशिष्ट्य आहे."( मध्यभागाचे एज्युकेशन इन्पेक्टर : १९२५ -२६ चा अहवाल)

आणखी कितीतरी व्यक्तींचे अण्णांबद्दलचे गौरवोद्गार देता येतील. पण स्थलाभावी ते देणे शक्य नाही. कोकणच्या मातीनं अनेक नररत्नं जन्माला घातली. या नररत्नांनी स्वतः मोठे होत होत या समाजाला व राष्ट्राला मोठे केले. अण्णासाहेब कर्वे अशांपैकीच एक होते. कोकणच्या मातीचा चिवटपणा, काटकसर, वस्तुनिष्ठ दृष्टी आणि चालत राहण्याची अथक क्षमता हे गुण अण्णांच्या ठायी सर्वार्थांनं विकसित झाले होते.


एकादी व्यक्ती शरीरानं लहान की मोठी, यावर तिचं कर्तृत्व मुळीच अवलंबूननसतं. उलट इतिहास असं सांगतो की, जगातली उत्तुंग कर्तृत्वाची माणसं शरीरानं मध्यम बांध्याचीच होती. या मध्यम बांध्याच्या वा कृश व्यक्तींनी उत्तमतेचा, उत्कृष्टतेचा जो ध्यास घेतलेला असतो, तोच त्यांना कीर्तीशिखरावर नेऊन बसवतो.

शतायुषी भारतरत्न महर्षी अण्णासाहेब कर्वे यांचं कार्य म्हणजे पुढील काही शतकांचं महाराष्ट्राचं विचारधन आहे. महाराष्ट्राच नव्हे तर अवघा देश या विचारधनानं संपन्न झाला आहे.

अनुक्रमणिका

# परिशिष्ट क्र. १

**महर्षी धोंडो केशव कर्वे यांचा वंशवृक्ष**




अनुक्रमणिका

# परिशिष्ट २

**महर्षी कर्वे यांचे सहकारी**

| | | |
|---|---|---|
| श्रीमती पार्वतीबाई आठवले (१९०२-१९४१) | : | संस्थेच्या आद्य आजन्म सेविका; ४० वर्षे संस्थेची सेवा केली. अल्पवेतनावर काम करून देणग्या मिळवून दिल्या. परदेशातही संस्थेच्या कामाचा प्रचार केला. त्यांच्या नावे ‘पार्वतीबाई अध्यापिका विद्यालय’ संस्थेच्या आवारात आहे. |
| डॉ. ह. रा. दिवेकर (१९१५-१९३०) | : | विद्वत्ता व कर्तृत्व या दोनही क्षेत्रांतील आघाडीचे कार्यकर्ते. फ्रान्सची डी. लिट्. पदवी. विनोबाजींच्या कार्यातही सहभाग. काही खेदकारक घटनेमुळे संस्थेचा राजिनामा दिला. |
| श्री. ना. म. आठवले (१९१६-१९३१) | : | महिला विद्यापीठाच्या आपत्काली संस्थेचे महत्त्वाचे कार्य. आजन्म सेवक व १९३२ पर्यंत पुणे महिलापाठशाळेचे मुख्याध्यापक. शास्त्रविषयांचे अध्यापक. शास्त्रीय उपकरण निर्मितीची आवड. |
| श्री. गो. म. (बापूसाहेब) चिपळूणकर ( १९१७-१९२९) | : | आजन्म सेवक. इतिहास व मानसशास्त्राचे अभ्यासक. भाऊबीज निधीच्या रूपाने संस्थेला खूप मदत मिळवून दिली.<br>‘The Scientific Basis of Women's Education' या पुस्तकाचे लेखक. |
| श्री. वा. गो. मायदेव ( १९१७-१९३७) | : | सुप्रसिद्ध कवी, शिक्षक व तळमळीचे सामाजिक कार्यकर्ते. अनाथबालिकाश्रमाचे चिटणीस महिलाश्रम व अध्यापिका विद्यालयाचे मुख्याध्यापक. |
| श्री. वि. आ. मोडक (१९१७-१९५२) | : | सातारा येथील कन्याशाळेस आकार देणारे शिक्षणतज्ज्ञ . हिंगणे- ‘स्त्री शिक्षण संस्थेची ६० वर्षे’ हा संस्थेचा इतिहास त्यांनी लिहिला.<br>हिंगण्याच्या माळावर प्रथमदर्शनी त्यावेळी दिसणारी भारतमातेची प्रतिकृती श्री. मोडक यांनीच तयार केली हेती. |
| श्रीमती वारुताई शेवडे (१९१९-१९४३) | : | लहानपणापासून संस्थेत वाढलेल्या. शिक्षण घेतलेल्या, अण्णांचे कार्य पुढे नेण्याचा ध्यास असलेल्या कार्यकर्त्या. ‘आश्रमकन्यका’ या पुस्तकाच्या लेखिका. आजन्म सेविका. |
| श्रीमती गंगूताई तांबोळे (१९१९-१९४४) | : | श्रीमती शेवडे यांच्याप्रमाणेच संस्थेवर प्रेम असलेल्या व संस्थेतच वाढलेल्या आजन्म सेविका. |
| प्रो. वा. म. जोशी (१९२०-१९४३) | : | सुप्रसिद्ध लेखक, साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ , पत्रकार, संस्थेचे आजन्म सेवक. संस्थेच्या कीर्तीमध्ये यांच्यामुळे भर पडली. |
| प्रो. रामचंद्र ह. केळकर ( १९२०-१९४२) | : | इतिहास राज्यव्यवस्था व समाजशास्त्र यांचे प्राध्यापक. पुण्यातील कन्याशाळेचे मुख्याध्यापक. |
| डॉ. कमलाबाई देशपांडे (१९२१-१९४२) | : | कृतिशील शिक्षिका. अण्णांबरोबर युरोपात जाऊन Ph. D.पदवी मिळविली. महिला पाठशाळेच्या प्राचार्य. ‘स्मरणसाखळी’ हे |

अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| | | आत्मचरित्र लिहिले. पुणे विद्यापीठातही उत्तरआयुष्यात व्याख्यात्या व मार्गदर्शक |
| श्रीमती सीताबाई अण्णेगिरी (१९२२ ते निवृत्तीपर्यंत) | : | संस्थेच्या आजन्म सेविका. सामाजिक, शैक्षणिक चळवळीत सहभाग. शासनात मान्यता. जे. पी. पद मिळाले. हिंगणे संस्थेचा आधारवड. |
| श्री. ना. म. पटवर्धन (१९२२ ते १९४२) | : | आजन्म सेवक व उत्कृष्ट अध्यापक. सर्वसंग्राहक वृत्ती. |
| श्रीमती बनूबाई अहो (१९२३-१९४९) | : | बालविधवा म्हणून हिंगण्यात दाखल झाल्यानंतर शिक्षण घेतले व निष्कामकर्ममठात दाखल झाल्या. बेळगावला जाऊन महिला महाविद्यालयाची स्थापना केली. पुण्या-मुंबईबाहेरच्या स्त्रीशिक्षणप्रसाराला मोठा हातभार. |
| श्री. भा. धों. कर्वे (१९३७ पासून निवृत्तीपर्यंत) | : | अण्णाचे सुपुत्र. संस्थेचे चिटणीस. उत्तम प्रशासक. संस्थेच्या कार्याची घडी बसविण्यात पुढाकार. शिक्षणविषयक साहित्याचे लेखन. |
| श्रीमती बाळुताई खरे (श्रीमती मालतीबाई बेडेकर) | : | प्रसिद्ध लेखिका. आजन्म सेविका. |
| डॉ. इरावती कर्वे | : | अण्णासाहेबांच्या स्नुषा. प्रसिद्ध लेखिका. |
| श्रीमती शारदाबाई साठ्ये (१९३३-१९५४) | : | अण्णासाहेब व वामनराव जोशी यांच्यापासूनस्फूर्ती घेऊन वैधव्यानंतर संस्थेत दाखल झाल्या. आजन्म सेविका. परदेशातही गेल्या. |
| श्री. श्री. शं. पतके (१९४० पासून) | : | संस्थेचे आजन्म सेवक. शैक्षणिक पुस्तकांचे लेखक. |
| श्री. के. रा. पालकर (१९४६ पासून): | : | आजन्म सेवक. शिक्षणतज्ज्ञ. |

याशिवाय श्रीमती कावेरी कर्वे (अण्णासाहेबांच्या सूनबाई), श्रीमती येसूबाई बर्वे, श्री. पं. वि. गोळे, काशीताई नातू, नयनाबाई मोघे, ताराबाई परांजपे, यांनीही अण्णांच्या कार्याला मोठा हातभार लावला.

अनुक्रमणिका

# भारतरत्न डॉ. धोंडो केशव कर्वे यांच्या जीवनाचा कालपट

| | | |
|---|---|---|
| १८ एप्रिल | १८५८ | जन्म ( शेरवली : रत्नागिरी) |
| | १८७३ | राधाबाईंशी लग्न. |
| | १८७६ | मराठी ६ वीची परीक्षा पास |
| | १८८१ | मॅट्रिक्युलेशन परीक्षा |
| | १८८४ | बी. ए. परीक्षा |
| | १८८५ | शिक्षक, एल्फिन्स्टन हायस्कूल, मुंबई |
| | १८८७ | एम. ए. परीक्षा ( अनुत्तीर्ण) |
| | १८८८ ते १८९१ | शिक्षक, मराठा व इतर हायस्कुलें |
| | १८९१ | पहिल्या पत्नीचा मृत्यु |
| १५ नोव्हेंबर | १८९१ | प्राध्यापक, फर्ग्युसन कॉलेज |
| ११ मार्च | १८९३ | आनंदीबाईशी पुनर्विवाह |
| ३१ डिसेंबर | १८९३ | विधवाविवाहोत्तेजक मंडळीची स्थापना |
| २० ऑगस्ट | १८९५ | विधवा-विवाह-प्रतिबंध-निवारक मंडळी असा बदल |
| १४ जून | १८९६ | अनाथबालिकाश्रमाची स्थापना |
| १ जानेवारी | १८९९ | पुण्यात आश्रमाची सुरुवात |
| जून | १९०० | आश्रमाचें हिंगण्यास स्थलांतर |
| ४ मार्च | १९०७ | महिला विद्यालय स्थापना |
| ४ नोव्हेंबर | १९०८ | निष्काम-कर्म-मठ स्थापना |
| डिसेंबर | १९११ | महिलाविद्यालयांचे हिंगण्यास स्थलांतर |
| ३ जून | १९१६ | महिला विद्यापीठाची स्थापना |
| जून | १९१७ | अध्यापिका शाळेची स्थापना |
| एप्रिल | १९१८ | पुणे कन्याशाळेची स्थापना |
| १८ एप्रिल | १९१८ | ६१ वा वाढदिवस |

अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| | १९२० | सर विठ्ठलदास ठाकरसींची देणगी |
| १८ एप्रिल | १९२८ | ७१ वा वाढदिवस |
| | १९२९-१९३० | त्रिखंड प्रवास |
| | १९३०-१९३२ | आफ्रिकेचा प्रवास |
| | १९३२ | ठाकरसी ट्रस्टींविरुद्ध दावा |
| | १९३५ | ठाकरसी ट्रस्टींशी तडजोड |
| | १९३६ | महाराष्ट्र-ग्राम-प्राथमिक-शिक्षण मंडळाची स्थापना |
| १८ एप्रिल | १९३८ | ८१ वा वाढदिवस |
| | १९४२ | बनारस हिंदु युनिव्हर्सिटीची डी. लिट्. पदवी |
| | १९४४ | समता-संघाची स्थापना |
| | १९४६ | अनाथबालिकाश्रमाचा सुवर्णमहोत्सव व हिंगणे स्त्री-शिक्षण संस्था हे नामकरण |
| १८ एप्रिल | १९४८ | ९१ वा वाढदिवस |
| | १९४९ | श्री. ना. दा. ठा. महिला विद्यापीठ कायदा |
| २९ नोव्हेंबर | १९५० | बायाचा मृत्यू |
| | १९५१ | पुणे विद्यापीठाची डी. लिट्. पदवी |
| | १९५४ | महिला विद्यापीठाची डी. लिट्. पदवी |
| | १९५५ | पद्मविभूषण पदवी |
| २३ ऑक्टोबर | १९५६ | हिंगणे स्त्री-शिक्षण संस्थेचा हीरकमहोत्सव |
| | १९५७ | मुंबई विद्यापीठाची एल्. एल्. डी. पदवी |
| १८ एप्रिल | १९५८ | भारतरत्न पदवी, मुंबई महानगरपालिकेचे मानपत्र व शताब्दीमहोत्सव |
| ९ नोव्हेंबर | १९६२ | निधन (पुणे) |

अनुक्रमणिका

# संदर्भग्रंथ सूची


१) धोंडो केशव कर्वे : आत्मवृत्त व चरित्र : धों. के. कर्वे : ना. म. पटवर्धन : हिंगणे स्त्रीशिक्षण संस्था, १९५८.

२) आधुनिक भारताचे शिल्पकार धोंडो केशव कर्वे : ग. ल. चंदावरकर, प्रकाशन विभाग भारत सरकार, १९७४

३) अण्णासाहेब कर्वे यांचे चरित्र : अनाथबालिकाश्रम मंडळी, हिंगणे, १९३८

४) महर्षी कर्वे : संपादक, राष्ट्रीय चरित्रमाला : शुक्रवार पेठ, पुणे २, १९७६

५) आपले अण्णा : व्यंकटेश वकील : अभिनव प्रकाशन, मुंबई, १९४८

६) तपोमूर्ती कर्वे : दा. न. शिखरे : केदार प्रकाशन पुणे २, १९६९

७) Looking back : D. K. Karve: Hingne Streeshikshan Sanstha, Pune, 1958

८) १०१ श्रेष्ठ मानव : रा. प्र. कानिटकर : उत्कर्ष प्रकाशन : पुणे ३०, १९८९.



अनुक्रमणिका

## महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

### महाराष्ट्राचे शिल्पकार योजन अंतर्गत मालिकेतील चरित्रग्रंथ

| | | | |
|---|---|---|---|
| १) | एस. एम. जोशी | श्री. ग. प्र. प्रधान | रु. ४०/- |
| २) | साने गुरुजी | श्री. राजा मंगळवेढेकर | रु. ४०/- |
| ३) | दादा धर्माधिकारी | श्रीमती तारा धर्माधिकारी | रु. ४०/- |
| ४) | क्रांतिसिंह नाना पाटील | श्री. भारत पाटणकर | रु. ४०/- |
| ५) | डॉ. विठ्ठलराव विखेपाटील | श्री. शिवाजी सावंत | रु. ३५/- |
| ६) | शंकरराव किर्लोस्कर | श्रीमती शांता किर्लोस्कर | रु. ४०/- |
| ७) | मामासाहेब जगदाळे | श्री. व. न. इंगळे | रु. ४५/- |
| ८) | तंट्या भिल्ल | श्री. बाबा भांड | रु. ४५/- |
| ९) | यशवंतराव चव्हाण | श्री. विठ्ठलराव पाटील | रु. ४०/- |
| १०) | दादासाहेब फाळके | श्री. बापू वाटवे | रु. ३५/- |
| ११) | ताराबाई शिंदे | श्री. इंद्रजित भालेराव | रु. २५/- |
| १२) | तेजस्विनी अहिल्याबाई होळकर | सौ. विजया जहागीरदार | रु. ४५/- |
| १३) | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी | डॉ. अरुंधती खंडकर | रु. ४०/- |
| १४) | स्वातंत्र्यवीर सावरकर | श्री. सुधाकर देशपांडे | रु. ४०/- |
| १५) | बॅ. राजाभाऊ खोब्रागडे | श्री. व्ही डी. मेश्राम | रु. ३५/- |
| १६) | स्वामी रामानंद तीर्थ | श्री. प्रकाश मेदनकर | रु. ४५/- |
| १७) | पठ्ठे बापूराव | श्री. चंद्रकुमार नलगे | रु. ४५/- |
| १८) | भाई उद्धवराव पाटील | श्री. व. न. इंगळे | रु. ५५/- |
| १९) | धोंडो केशव कर्वे | डॉ. न. म. जोशी | रु. ४०/- |
| २०) | लोकहितवादी | डॉ. निर्मलकुमार फडकुले | रु. ४०/- |
| २१) | यदुनाथ थत्ते | डॉ. मु. ब. शहा | रु. ४०/- |
| २२) | गोविंदभाई श्रॉफ | डॉ. विजय दिवाण | रु. ४५/- |
| २३) | लोककवी शाहीर रामजोशी | श्री. शिरीष गंधे | रु. ४५/- |
| २४) | वसंतराव नाईक | डॉ. उत्तम रुद्रवार | रु. ३५/- |
| २५) | महात्मा फुले | श्री. श्रीराम गुंदेकर | रु. ४०/- |

अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| २६) | स्वातंत्र्यसेनानी तुळशीदास जाधव | श्री. व्यंकटेश कामतकर | रु. ४६/- |
| २७) | ना. ग. गोरे | श्री. ग. प्र. प्रधान | रु. ३५/- |
| २८) | शंकरराव चव्हाण | डॉ. सुरेश सावंत | रु. ४५/- |
| २९) | पंडिता रमाबाई | डॉ. सिसिलिया कार्व्हालो | रु. ४५/- |
| ३०) | बॅ. नाथ पै | श्री. जयानंद मठकर | रु. ४०/- |


***मंडळाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे***

सर्व शासकीय ग्रंथ भांडार
मुंबई/पुणे /नागपूर/औरंगाबाद व
महाराष्ट्रातील प्रमुख ग्रंथविक्रेते

***अधिक माहिती/चौकशीसाठी***

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
पु. ल. देशपांडे कला अकादमी,
दुसरा मजला, रवींद्र नाट्य मंदिर इमारत,
सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०० ०१४
दूरध्वनी - २४२२६१५६/२४३२५९२९

अनुक्रमणिका



**डॉ. न. म. जोशी** ( M. A.M.Ed. Ph.D)
लेखक, शिक्षणतज्ज्ञ व वक्ते

- ✿ (माजी) प्राध्यापक टिळक शिक्षण महाविद्यालय, पुणे / पुणे विद्यापीठ शिक्षणशास्त्र शाखा. ५० पुस्तकांचे लेखक (निःस्पृह, प्रेषित, या चरित्रात्मक कादंबऱ्या) डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र : ३ वेळा महाराष्ट्र शासनाचा उत्तम वाङ्मयनिर्मितीचा पुरस्कार. याशिवाय किर्लोस्कर फाउंडेशन, नासिक सार्वजनिक वाचनालय, बालकुमार साहित्यसभा, कोल्हापूर, अशा अनेक संस्थांचे साहित्य पुरस्कार.
- ✿ (माजी) कार्यवाह महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, (माजी) कोषाध्यक्ष अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ; संस्थापक विश्वस्त : महर्षी शांडिल्य प्रतिष्ठान पुणे.
- ✿ पुणे महापालिकेच्या वतीने उत्तम शैक्षणिक व सांस्कृतिक कार्याबद्दल विशेश गौरव.
- ✿ अनेक विद्यापीठांचे संशोधन तज्ज्ञ व मार्गदर्शक - शिक्षणशास्त्र शाखा.
- ✿ इंग्रजी, मराठी, हिंदी व सिंधी या चारही भाषांवर प्रभुत्व.
- ✿ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या दोन खंडांचे मराठीत अनुवाद. अनेक सिंधी कथांची मराठीत भाषांतरे.
- ✿ निगडी, पुणे येथील १७ व्या अ. भा.बालकुमार साहित्य संमेलनाचे अध्यक्ष.
- ✿ १ले कोयना साहित्यसंमेलन (पाटण, सातारा) अध्यक्ष.
- ✿ संपर्क: १०१३ सदाशिव पेठ, गंधाली निवास, पुणे-४११०३, दूरध्वनी ( ०२० ) ४४७६८६८.

अनुक्रमणिका